# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शु
भ
दी
पा
व
ली

सप्रेम नमस्कार,
सोबत ग्रंथाली इ-दिवाळी
दुबई विशेषांक
पाठवत आहोत.
आपली प्रतिक्रिया जाणण्यास
उत्सुक आहोत.
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छांसह!
आपले स्नेहांकित
मेघना वर्तक, अतिथी संपादक
सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त
अरुण जोशी, संपादक
आणि
योगिता मोरे
धनश्री धारप
संजय कुलकर्णी



ग्रंथाली परिवार

granthali01@gmail.com
granthali02@gmail.com

॥ग्रंथाली॥❋॥


इ-दिवाळी अंक - दुबई

अतिथी संपादक
**मेघना अशोक वर्तक**

# वाळवंटातिल वटवृक्ष

दिवाळी अंक
२०१४, दुबई

समाज, उद्योग, संस्कार, कला, साहित्य, व संस्कृतिने समृद्ध
वाळवंटातिल वटवृक्ष.




**Deira Gold Souq Stores** - The Gold Centre, Tel 04 226 2975 • Near Tradition Gold Souq Entrance, Tel 04 235 1114 • Opposite Gold Souq Bus Station, Tel 04 235 0419, **Bur Dubai Stores** - Al Fahidi St, Tel 04 351 1174 • Near Temple, Tel 04 353 2786. **Head Office** - Suite# 63, The Gold Centre, Zone II, 3rd floor, Gold Souq, Deira, P.O. Box: 1167, Dubai, UAE 04 229 0190 / 04 225 3621, 04 225 9410, Email : jeweltrd@eim.ae

# ॥ग्रंथाली॥

## दुबई इ-दिवाळी अंक

ऑक्टोबर २०१४

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

अतिथी संपादक : **मेघना अशोक वर्तक**

सहसंपादक : **अजित आचार्य**

मुखपृष्ठ : **शैलेंद्र साठे**

आतील रेखाचित्रे : **सतीश खानविलकर**

मांडणी : **संजय कुलकर्णी**



## कार्यालयीन संपर्क

कॉम्प्युटर युनिट - **योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

मुंबई प्रतिनिधी - **धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

इ-जाहिरात प्रसिद्धी - **संजीवनी पाटील**

### पत्रव्यवहारचा पत्ता

ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

मेघना अशोक वर्तक
पी.ओ.बॉक्स ८७७६
दुबई, यु.ए.ई.
meghana.sahitya@gmail.com
meghana_vartak@yahoo.com


अंकाच्या मुखपृष्ठावरील 'वाळवंटातिल वटवृक्ष' येथे 'वाळवंटातील वटवृक्ष', तसेच 'समाज, उद्योग, संस्कार, कला, साहित्य व संस्कृतिने समृद्ध वाळवंटातिल वटवृक्ष' येथे 'समाज, उद्योग, संस्कार, कला, साहित्य व संस्कृतीने समृद्ध वाळवंटातील वटवृक्ष' असे वाचावे. - संपादक

## संपादकीय



नमस्कार मंडळी,

प्रथम तुम्हा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! "नूतन वर्ष हे तुम्हा सर्वांना भरभराटीचे सुखसमृद्धीचे व स्वप्नपूर्तीचे जावो."


गेली ४० वर्षे मराठी प्रकाशन क्षेत्रातील चळवळीकरिता, सामाजिक दृष्टिकोनातून साहित्यासाठी कार्यरत असलेल्या 'ग्रंथाली' या संस्थेने या आधी अमेरिका, कॅनडा, सौदी अरेबिया येथील त्यांच्या त्यांच्या जीवनावर ई-दिवाळी अंक काढला आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मला सांगितले की, यंदा दुबईच्या जीवनावर 'ई-दिवाळी अंका'चे तुम्ही संपादन करा.

प्रदीर्घ काल दुबईत वास्तव्य झालेल्या मराठी माणसांचे जीवन हे एखाद्या वटवृक्षाप्रमाणे आहे. त्याच्या पारंब्या भूमीला स्पर्श करत आहेत व आलेले नवांकुर हे सूर्य प्रकाशाकडे झेप घेत आहेत.

आणि म्हणूनच दुबईकरांच्या जीवनावरील 'वाळवंटातील वटवृक्ष' हे नामाभिधान सार्थ करणाऱ्या 'ग्रंथालीचा इ दिवाळी अंक' वाचकांपर्यंत पोहोचवताना मला अतिशय आनंद होत आहे.

कारण, एकतर ह्या निमित्ताने जगभर पसरलेल्या हजारो वाचकांशी पुस्तकरुपाने का होईना, पण सुसंवाद साधण्याची संधी मला मिळाली.

'ई' मासिकाच्या, मराठी अक्षरांच्या या देवाणघेवाणीतून, जगाच्या कानाकोपऱ्यात राहाणाऱ्या मराठी बांधवांच्या कार्याची, त्या त्या देशाच्या जीवनपद्धतीची एकमेकांना ओळख होऊन मराठी व्यक्ती खचितच जवळ येतील....मनाने व साहित्याने!



दुसरी गोष्ट म्हणजे, ३९ वर्षे जिथे आमचे वास्तव्य झाले, जिने सुखसमृद्धीचे माप आमच्या पदरात भरभरून टाकले, भारतभूमीतील लाखो बांधवांच्या घरांना प्रकाशाचा मार्ग दाखवला, त्या संस्कृती व आधुनिक सौंदर्याने नटलेल्या दुबईबद्दलची कृतज्ञता ही शब्दांद्वारे व्यक्त करून, दुबईकरांच्यावतीने

भावफुलांची माला अर्पण करता आली.
दुबईमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक मराठी व्यक्तींनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. वेळेअभावी व मासिकाच्या पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे या मालेतील अनेक पुष्पे गुंफायची राहून गेली. संपादनाची अशीच संधी पुन्हा मिळाली तर नक्कीच इतर फुलांची दुसरी माला गुंफता येईल!
या 'ई' दिवाळी अंकातील लेख हे केवळ माहितीवजा न लिहिता, त्याला कथेचे स्वरूप देऊन मनोरंजक करण्याचा प्रयत्न केला आहे. दुबईत प्रदीर्घ काळ वास्तव्य केलेल्या व्यक्तींच्या अनुभवांची शिदोरीच वाचकांसाठी आणली आहे. त्यात उद्योगपतींचे अनुभव आहेत, तसेच गरिब कामगारांची मनोगतं आहेत. दुबईतील सामाजिक-सांस्कृतिक जीवन, अरबी भाषा, अरबी लोकांचे आलेले



अनुभव, रूक्ष वाळवंटात हिरवळ फुलवणारे कविमन, ऐहिक सुखाला परमार्थाची जोड देणारे दुबईतील अध्यात्मिक जीवन, याबरोबरच दुबईच्या अंतरंगात शिरून, बारिकसारिक बारकावे टिपून, दुबईच्या शांत जीवनाची ओळख करून दिली आहे.
अरबी लोकांना भारतीयांबद्दल काय वाटते याबद्दल एका स्थानिक व्यक्तीचे मत व भारतीय तरुणांना केलेले मार्गदर्शनही आहे. अखेरीस भारतीय संस्कृतीशी
मिळतीजुळती संस्कृती असलेल्या दुबईमध्ये येण्यासाठी ''चला रे दुबई'' म्हणून घातलेली सादही ऐकू येते!
असे हे दुबईतील बहुरंगी, बहुढंगी अनुभव हे केवळ दुबईत येणाऱ्या तरुणांनाच नव्हे, तर भारत सोडून जगाच्या पाठीवर जाणाऱ्या सर्वांनाच मार्गदर्शक आहेत. स्थलकालानुरूप नियम, वातावरण बदलेल एव्हढेच, पण नोकरीधंद्यातील खा-चाखोचा, टक्केटोणपे, जिद्द, मानवी स्वभाव, मेहनत, स्पर्धा, एकमेकांचे पाय खेचायची वृत्ती....हे सर्वकडे सारखेच!
आज देशाबाहेर पडणारी प्रत्येक व्यक्ती, मग ती कोणत्याही जाती-धर्माची असो, जगाच्या पाठीवर कोठेही जावो, तेथील परिस्थितीशी झगडून, मेहनत करून, जिद्दीने आपल्या कार्याचा ठसा उमटवते.
ह्यातीलच दुबई एक आहे हे आपल्या लेखांतून लेखकांनी दाखवले आहे.
ह्यातून स्फूर्ती घेऊन मराठी पाऊल खरोखरच जर 'पुढे' पडले तर ह्या अंकाचा हेतू सफल झाला असे म्हणता येईल! या अंकाच्या निर्मितीमध्ये प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आभार. पुन्हा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**- मेघना वर्तक**
meghana.sahitya@gmail.com






**Deira Gold Souq** : Shop no 36, Ground Floor, The Gold Centre, Dubai, UAE. Tel: 04 235 0409,
**The Dubai Mall** : Shop no GS64, Gold Souk, Dubai, UAE. Tel: 04 434 0796
Email: jeweltrd@emirates.net.ae

# दुबई VIA U.S.

**U.S.मध्ये ८/१० वर्षे वास्तव्य झाले, मुले मोठी होऊ लागली की, बहुतांशी भारतीयांना Here or to go हा प्रश्न भेडसावू लागतो. अमेरिकन कल्चरमध्ये मुलांना वाढवायचे नाही....पण भारतात पण परत जायचे नाही.... दुसरा पर्याय पण माहीत नाही....अशा या मानसिक द्वंद्वामध्ये ते आयुष्य जगतात....नव्हे रेटतात!**

**अशा भारतीयांसाठी, U.S.मध्ये शिक्षण घेऊन नंतर ८-१० वर्षे नोकरी करून, आता दुबईत आलेल्या रोहित व अनघा ओगले या पतीपत्नींनी स्वानुभवातून, स्थलांतरासाठी 'दुबई' हा पर्याय सुचविला आहे. त्यासाठी दुबईच्या अंतरंगात शिरून त्यातील बारकाव्यांसह दुबईची माहिती ह्या लेखाद्वारे करून दिली आहे.**

**Here or to** go? गहन प्रश्न! जीवन बदलून टाकणारा, परतीचा मार्ग नसलेला....to be or not to be ह्या प्रश्नाइतकाच उत्तर मिळायला कठीण! risk घ्यायची तयारी होती....मेहनतीची तयारी होती....पण तरीही निर्णय घेताना धाकधूक होतीच. भारतातून जेव्हा U.S.ला आलो तेव्हा मनाची ही ओढाताण नव्हती. फक्त डोळ्यांसमोर ध्येय होते....Masters करायचे.... पुढचा विचारच केला नव्हता. पण आता १०-१२ वर्षे U.S.मध्ये राहून नोकरी करून U.S. सोडून परत जायचे मनात होते....कुठे....भारतात तर जायचे नाही....मग दुबई....सिंगापूर....?

साहजिकच दुबईलाच प्राधान्य मिळाले. कारण माझी पत्नी अनघा हिचे बालपण दुबईतच गेले होते....तिचे आईवडील गेली ३९ वर्षे दुबईत आहेत. तसेच माझे वडील सौदीला होते. आम्ही दुबईला गेलो असतो तर ते पण दुबईला move झाले असते. मुलींना आजी-आजोबा भेटतील व आजी-आजोबांना नातवंड! हा विचार प्रबळ ठरला व दुबईला जायचे....U.S. सोडायचे नक्की झाले. आम्ही U.S. सोडतोय हे कळल्यावर सर्वांचेच हजार प्रश्न.... चौकशा....सल्ले सुरू! प्रत्येकाला एकच काळजी....जॉबचा काही problem झाला का?....कारण त्याशिवाय कोणी U.S. सोडणार नाही....सर्वांना शंका, आम्ही काहीतरी लपवतोय....खरं म्हणजे शिक्षणं झाली....नोकरीत थोडेसे सेटल झाले....मुले मोठी व्हायला लागली की U.S.मध्ये सर्वांच्याच पुढे एक प्रश्नचिन्ह असते....आता पुढे काय....मनात तर असतं की मुलांना तेथील culture मध्ये वाढवू नये....पण पर्याय नाही....दोघांची दिवसभराची नोकरी....घरात कोणी मदतीला नाही....इंडियात परत जायचे तर risk घ्यायची तयारी नाही....आयुष्य enjoy करायला वेळच नाही....परतीचा मार्ग नाही.... ना घर का, ना घाटका अशी अवस्था होते सर्वांची!



रोहित ओगले
rogale@vt.edu



अनघा वर्तक ओगले
anagha5182@yahoo.com

त्यामुळे आम्ही U.S. सोडून दुबईला move होतोय हे कळल्यावर सर्वांच्याच भुवया उंचावल्या गेल्या. दुबई मुसलमानांचा देश....सुरक्षित नाही....नंतर पस्तावाल. इथल्यासारख्या सुखसोई नाहीत....वगैरे वगैरे! पण आमचा निश्चय पक्का झाला व आम्ही आपापल्या नोकरीच्या ठिकाणी नोकरी सोडत असल्याचे सांगितले. दुबईच्या प्रगतीमुळे जगाच्या कानाकोपऱ्यात दुबईचे नाव सर्वांना माहीत झाले आहे. आमच्या दोघांच्याही कंपनीतून आम्हाला सांगण्यात आले की, तुम्ही job सोडू नका, work from home करा....त्यामुळे आम्हाला तर दुधात साखर पडल्यासारखे झाले.

पूर्वी एक काळ असा होता की, U.S.ला गेलेला माणूस परत भारतात येतच नसे. गेला की तिकडचाच होत असे. पण आता काळ बदलला. इंटरनेटमुळे जग जवळ आले. भारत तसेच इतर देशही प्रगत झाले; नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत व हळूहळू U.S.मध्ये शिकून, २-४ वर्षे नोकरी करून परत भारतात येण्याचे, इतर देशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे. मग त्यातल्यात्यात दुबई, सिंगापूर हे आपल्या संस्कृतीशी मिळती, जुळती संस्कृती असलेल्या शहराकडे ओढा वाढत चालला आहे. त्यामुळे U.S. बद्दल ज्यांच्या मनात द्वंद्व चालू असते त्या अनेकांना आमच्या अनुभवांवरून आम्ही सांगू की, विचार करत आयुष्यातील महत्त्वाची वर्षे चाकोरीबद्ध कामामध्ये घालवू नका, बाहेर पडा, थोडी risk घ्या, संधी हात जोडून तुमच्या समोर उभ्या आहेत.

दुबईच्या प्रगतीला भारतीयांनी नक्कीच हातभार लावला आहे. देशाची पण प्रगती झाली....तसेच भारतीयांची कुटुंबेही सावरली गेली. केरळ, तमिळनाडू ही उत्तम उदाहरणं आहेत. तेथील लोकं मिळेल त्या कामांची तयारी ठेवून वर्षानुवर्षे दुबईत काम करतात व कुटुंबाचे स्वरूपच बदलतात, बांधवांना आधार देतात, राज्याचा उद्धार करतात. सिंधी, पंजाबी, गुजराथी कोणी आफ्रिकेतून आली, कोणी देशाची फाळणी झाली तेव्हा इथे आले....पिढ्यान्‌पिढ्या इथे राहून उद्योगधंदे स्थापन केले व दुबईचेच झाले. मराठी माणूस मात्र काम काय करावे लागेल....पगार किती मिळेल....देश कशाला सोडायचा....मुस्लिम देशात संरक्षण नाही....इत्यादी विचार करत राहीला....व मागे राहीला! जे रिस्क घेऊन धडाडीने इथे आले त्या मराठी माणसांनी आपल्या कर्तृत्वाने स्वतःचा ठसा उमटवला आहे.

आज इंटरनेटमुळे दुबईतील नोकरीच्या संधी तुम्ही online बघू शकता. पण जास्त करून लोकं इथे एकदोन महिन्याचा Visit Visa काढून येतात. कोणाचे नातेवाईक असतात किंवा हॉटेलवालेही Visa देतात. तुम्ही इथे येऊन, तुमच्या क्षेत्रातील ऑफिसेस मध्ये जाऊन प्रत्यक्ष नोकरी शोधू शकता.

तसेच, दुसरी पद्धत म्हणजे भारतात मोठ्या शहरात agents आहेत. त्यांच्याद्वारे सुद्धा वेगवेगळ्या क्षेत्रासाठी माणसे येतात. पूर्वी विशेषतः लेबर वर्गाची फसवणूक ह्या एजंटकडून होत असे. पण आता हे प्रमाण खूपच कमी झाले आहे. कारण आता दुबईतच कायदेकानू सुधारले आहेत. पूर्वी १९७०च्या काळात दुबईचे जे चित्र होते ते व आताचे दुबईचे चित्र ह्यात जमिनअस्मानाचा फरक आहे.

आता U.S. मधील अनेक कंपन्यांच्या शाखा दुबईत उघडल्या आहेत. त्यांच्या through सुद्धा तुम्ही दुबईत नोकरी मिळवू शकता. तुमचे शिक्षण, तुमचा अनुभव ह्यावर सुशिक्षित....व्हाईट कॉलर job, salary अवलंबून असते. नोकरीचे नक्की झाल्यावर कंपनीच तुमचा Visa काढते व तुम्ही familyचे sponser होता. येथे U.S. प्रमाणे H1, H4 असले प्रकार नाहीत. एकदा इथे resident visa झाला की, काही परमिशन्स काढून कोणीही लागलीच job करू शकतो. कंपनीच्या नियमाप्रमाणे, इन्शुरन्स, ॲकॉमोडेशन, मुलांचे स्कूलिंग, मेडिकल, वर्षातून एक महिना पगारी रजा, air-fair अशा प्रकारच्या सुविधा मिळतात.

U.S.मध्ये medical facilities खूपच आहेत. तेथील science advanced आहे यात प्रश्नच नाही. दुबईत आता अद्ययावत हॉस्पिटल्स् होत आहेत. दोन अमेरिकन हॉस्पिटल्स् बांधली आहेत. इथे U.S. प्रमाणे प्रोफेशनल वर्क कल्चर नाही. एकमेकांप्रती आदरभावना कमी दिसते. काम चोरपणा, फसवाफसवी थोडीफार आढळते. आता हळूहळू international कंपन्यांच्या शाखा इथे उघडत आहेत. त्यामुळे आपोआप work culture मध्ये पण फरक होत आहे. U.S.मध्ये तुमच्या सॅलरीतील ३०% टॅक्सेस मधेच कापले जातात. इथेही indirect taxes भरपूर आहेत. पण तरीसुद्धा सर्व विचार केला तर इथे saving नक्कीच जास्त होते.

इथे नोकरीधंद्याच्या संधी भरपूर आहेत. करिअर चेंज करायची तयारी ठेवलीत, नवीन परिस्थिती adopt

(स्वीकारायची) करायची तयारी असेल, त्यासाठी मेहनतीची तयारी असेल तर, देता किती....घेशील दो कराने! असे यश मिळू शकते. आज सिंधी-गुजराथी लोक म्हणून तर यशस्वी उद्योगपती झाले आहेत! U.S.मध्ये green card असेल तरी global income वर tax भरावा लागतो. इथे तुम्ही NRI असलात तरी tax भरावा लागत नाही.

स्वतःचा उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने येथील सरकारने खूप सोई केल्या आहेत. U.S. किंवा भारतापेक्षा इथे अडचणी कमी आहेत. देशाची प्रगती हे येथील सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने कायदे सुकर केले आहेत. लायसन्स व्यवस्था सुकर केली आहे. एका ठिकाणी अर्ज केलात की प्रोसिजर सुरू होते. दहा ठिकाणी नाचवत नाहीत. कमी वेळात लायसन्स मिळते.

दुबई हे फार पूर्वीपासून व्यापार केंद्र होतेच. जगातून छोट्या छोट्या बोटीने इथे माल येत असे व नंतर रोडने किंवा बोटीने आजूबाजूच्या प्रदेशात पोचवला जात होता. अशाप्रकारे दुबई tradingसाठी प्रसिद्ध होते.

जसजशी दुबई समृद्ध होत गेली तसतसे येथील सरकारने दूरदृष्टिने ह्या tradingचे स्वरूप बदलले. त्यासाठी आवश्यक ती दळणवळणाची साधने उपलब्ध करून दिली आहेत. दुबईत जाबल अली पोर्ट म्हणजे 'जाब्जा' असे खूप मोठे पोर्ट बांधले असून, तिथे मुंबईपेक्षाही अधिक birth-बोटी उभ्या करण्याची सोय केली आहे. तसेच दुसरा अल मक्तुम इंटरनॅशनल एअरपोर्ट बांधला आहे. आलेला माल ठेवण्यासाठी logistic cities उभारल्या आहेत. येथून विमानाने, बोटीने माल जगभर पोचवला जातो. रस्ते, ब्रीजेस तयार करून पूरक अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

जगातील सर्व लोकांनी इथे येऊन व्यापार करावा, त्यांना आपल्या मालाच्या जाहिरातींसाठी लोकांपर्यंत पोहोचता यावे यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे exhibition halls बांधले आहेत. इथे वर्षभर विविध क्षेत्रातील exhibitions होतात. ह्यातून व्यापारधंद्याची वाढ व्हावी यासाठी सर्व सुविधा देण्यास सरकार तत्पर आहे. जगातील उच्च प्रतीचे सामान व कुशल कामगार दुबईत उपलब्ध असून दुबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर झाले आहे.

पूर्वी दुबईत तुम्हाला स्वतःची प्रॉपर्टी घेता येत नव्हती. पण आता free zone मध्ये लीजवर स्वतःच्या नावावर प्रॉपर्टी खरेदी करू शकता. दुबईतील शांत जीवन, धार्मिक स्वातंत्र्य, taxes नाहीत; त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यातून लोकं investment म्हणून जागा खरेदी करतात. न्यू यॉर्क इत्यादी सारख्या मोठ्या शहरांप्रमाणे येथे जागेचा भाव आहे.

गगनचुंबी, मॉडर्न आर्किटेक्चरचे दर्शन देणाऱ्या उंच टॉवर्सची रांग, बैठे व्हिले, ५-६ मजली इमारती ही दुबईची खास वैशिष्ट्ये! जगातील सर्वात उंच टॉवर 'बूर्ज खलीफा' हा दुबईच्या अद्ययावत प्रगतीचे उदाहरण म्हणता येईल! खाडी खालून जाणारे टनेल, समुद्रस्थित 'बूर्ज अल अरब' हे हॉटेल, समुद्रामध्ये पामवृक्षाच्या आकृतीप्रमाणे रेखाटलेले, प्रत्येक पर्णावर बांधलेले व्हिले, सौंदर्य व आधुनिकता यांच्या संगमाचे दर्शन घडवितात.

दुबईच्या प्रगतीत transport चा वाटा फार मोठा आहे. दुबईचे पूर्वी दोन भाग होते. डेरा दुबई व बर दुबई. डेरा दुबईला जायला खाडीतून 'तरी' बोटी आहेत. अतिशय स्वस्त! किंवा खाडीखालून टनेल केले आहे. त्यातून मोटारीतून जाऊ शकता. पूर्ण दुबईभर बस सर्व्हिस आहे. नवीन वसलेल्या डाऊन टाऊन दुबई मध्ये ट्रॅम सर्व्हिस सुरू झाली आहे. २००९ मध्ये जगप्रसिद्ध, चालकविरहीत दुबई मेट्रो सुरू झाली व दुबईचे रूपच पालटले. अद्ययावत स्टेशन्स उतरल्यावर एस्कलेटर्स, जास्तीतजास्त सुखकर मेट्रोचा प्रवास केला आहे. ही मेट्रो सर्व्हिस एअरपोर्टस्, दुबईतील मोठे मॉल्स ह्यांच्याशी जोडलेली आहे.

जून ते सप्टेंबर हे ४ महिने हवामान अतिशय गरम असते. ४७-५०°c पर्यंत तपमान असते. जुलै व ऑगस्ट हे दोन महिने अधिक गरम! बाकी वर्षभर हवा उत्तम असते. दुबईभर सर्व ठिकाणी A.C.ची उत्तम व्यवस्था आहे. वीज व पाणी या दोन जीवनावश्यक गोष्टी दुबईत मुबलक आहेत. येथील शेखने ॲल्युमिनियम स्मेलटर plant टाकले. 'दुबाल' या नावाने ही कंपनी जगभर ओळखली जाते. समुद्राच्या पाण्याचे desalination करून ह्या पाण्याचा वापर दुबईला पाणीपुरवठा करण्यासाठी केला जातो. ड्रेनेज वॉटर समुद्रात न सोडता आधुनिक तंत्रज्ञान वापरून त्यातील घनपदार्थ बाजूला करून ते पाणी झाडांसाठी वापरले जाते. लँडस्केपिंग करून रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली आहेत. रंगीबेरंगी फुलांनी ह्या वाळवंटाला नंदनवनाचे रूप दिले आहे. स्प्रींक्लस् लावून पाण्याची व्यवस्था केल्याने भर उन्हाळ्यातसुद्धा फुललेली रंगीत फुले पाहून मन प्रसन्न होते.

अर्थातच U.S.मध्ये जसे नैसर्गिक सौंदर्य आहे ते इथे नाही. U.S. हा अतिशय मोठा देश आहे. पूर्ण U.S. भर निसर्गाची

कृपा जाणवते. त्यामुळे तिथल्यासारखे picnic spots, out door activities इथे नाहीत. दुबई ही man made सिटी आहे. दोन्हीकडील सौंदर्यात फरक आहे. जसजशी दुबई प्रगत होत आहे तसतसे अनेक नवनविन उपक्रम तयार होत आहेत.

Cleanliness हा दुबईचा मानबिंदू आहे. मुलानी टिशू जरी रस्त्यात टाकला तरी आईवडिलांना fine होतो. स्वच्छ टॉयलेट्स, स्वच्छ रस्ते, स्वच्छ हॉटेल्स अशी स्वच्छता दुबईप्रमाणे कोठेच आढळत नाहीत. road trips करताना ठिकठिकाणी वाटेत टॉयलेटस्‌ची सुविधा U.S. मध्ये अधिक आढळते. तशा प्रकारची सुविधा इथे मात्र कमी प्रमाणात दिसते.



दुबईत महाग आहे ती गोष्ट म्हणजे घरे! घरांची rents खूपच आहेत. तशीच दुसरी गोष्ट मुलांचे शालेय शिक्षण! U.S. मध्ये public schools मधून १०वी पर्यंत शिक्षण फुकट आहे. पण इथे तसे नाही. इथे शाळांच्या फिया खूपच आहेत. जगातील सर्व देशांतील शाळा आहेत. प्रत्येकाला आपल्या देशातील अभ्यासक्रमाप्रमाणे त्या त्या शाळेत घालता येते. under graduateलाच काही मुले U.S., U.K.ला जातात; काही Masters करायला जातात. इथे जगातील काही प्रसिद्ध युनिव्हर्सिटीजच्या शाखा उघडल्या आहेत.

इथे आईवडील दोघेही नोकरी करणारी आहेत. बहुतांशी नवीन पिढीत तर नक्कीच! त्यामुळे 'day care' हा concept वाढतो आहे. इथे पण day care महाग आहेत व अजून त्यांचे स्वरूप pre school type आहे. त्यात हळूहळू बदल होत आहे. U.S. मध्ये day care well organised आहेत.

U.S. ला असताना Indian रेस्टॉरंटमध्ये जायचे म्हणजे मोठे अप्रूप असायचे. कारण तिथे जास्त रेस्टॉरन्ट नव्हतीच. पण इथे जगातील प्रत्येक ठिकाणची cuisine तुम्हाला मिळते. अगदी बारीकसारिक वैशिष्ट्यांसह! भारतात अनेक भाषा-धर्मांची माणसे रहातात. प्रत्येकाच्या खाण्यापिण्याच्या पद्धती वेगळ्या. पण अक्षरशः मराठी, केरळी, राजस्थानी, मारवाडी, पंजाबी, बंगाली जे पदार्थ म्हणाल ते दुबईत मिळतात.

आज इथे जगभरातील सर्व लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. प्रत्येकाला आपला धर्म, देव जपायचे स्वातंत्र्य आहे. मशिदींबरोबर चर्चेस व देवळेही आहेत. सर्व प्रकारचे सणवार होतात. प्रत्येक भाषिकांची आपापली मंडळे आहेत. त्यांच्यातर्फे सांस्कृतिक कार्यक्रम होतात. दुबईचे महाराष्ट्र मंडळ हे यंदा ४० वे वर्ष साजरे करीत आहे. ५ दिवसांचा गणेशोत्सव असतो. त्यावेळी सामुहिक सहस्रावर्तनाचा कार्यक्रम होतो. दसरा-दिवाळी साजरी होते. पुढची पिढी नकळत आपल्या संस्कृतीशी धागे जोडते.

दुबई म्हणजे मुंबई-पुण्याचीच छोटी आवृत्ती आहे. फरक हा की, अतिशय स्वच्छ व प्रदूषण विरहित, वीजपाणी मुबलक, खाण्यापिण्याची सुबत्ता, कोणत्याही गोष्टींसाठी रांगा नाहीत, गर्दी नाही, चोऱ्यामाऱ्या नाहीत, दंगेधोपे नाहीत, संप नाहीत! मुंबईच्या एकदम जवळ. २ तास ३० मिनिटांचा विमानाचा प्रवास! अमेरिकेतून इंडियात जाणे हे खर्च व वेळ दोन्ही दृष्टीने त्रासदायक! त्यामुळे आपली माणसे वर्षावर्षांत भेटत नाहीत. हळूहळू संबंध दुरावतात. पण दुबई एवढी जवळ आहे ही कल्पनाच मनाला शांतता देते.

सर्वांच्याच दृष्टीने सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इथे घरकामाला माणसे मिळतात. U.S. मध्ये अक्षरशः प्रत्येक काम तुम्हाला करावे लागते. कोणी माणूस कामाला मिळाले तरी ते एवढे महाग असते की शक्यच नसते. इथे २ तासांसाठी, दिवसभरासाठी माणसे मिळतात, तुम्ही त्यांचा visa काढू शकता. अर्थात काही नियम तर पाळावेच लागतात. नोकरांच्या दृष्टीने सुद्धा येथील सरकारने काही नियम केले आहेत.

पतिपत्नी दोघांच्याही दिवसभराच्या नोकऱ्या झाल्यानंतर जर मदत मिळत असेल, तर त्यासारखे सुख नाही. आपण कष्ट कशासाठी करतो? पैसे मिळवण्यासाठी... पण त्या पैशाचा उपभोग घेता आला नाही तर काय अर्थ आहे?

भारतातून direct U.S. जाणाऱ्याना U.S. मध्ये पाऊल टाकले, की स्वर्ग गवसल्याचा आनंद होतो. कारण भारतीय जीवनपद्धतीत व U.S. मधील जीवनपद्धतीत जमिनअस्मानाचे अंतर आहे. पण जरा सेटूल झाल्यावर तेथील खाचखळगे जाणवू लागतात. भयंकर taxes, सेव्हिंग नाही, नोकरचाकर नाही, अमेरिकन कल्चरमध्ये मुलांना वाढवायचे नाही ही इच्छा... पण भारतात पण परत जायचे नाही. समस्यांना सामोरे जायचे नाही... रिस्क घ्यायची तयारी नाही... नव्याने सुरुवात करायची इच्छा नाही. 'अमेरिका' या शब्दाचे डोळ्यांवर झापडं असल्यामुळे इतर जगाकडे डोळे उघडून कधी पाहिलेच नाही... त्यामुळे इतर पर्यायच माहीत नाहीत. त्यामुळे मानसिक रस्सीखेच चालू होते. या तणावाखाली आयुष्य सरू लागते. मग आपण आयुष्य जगत नाही, तर... आयुष्य रेटत राहतो.

जगाच्या पाठीवर कोठेही गेलो तरी काही कमी काही जास्त हे असतेच. आज U.S.ची economy एवढी मोठी आहे की, कोणत्याही वादळाने तिच्यावर परिणाम होत नाही व त्या वादळातही तरून जायची तिच्यात क्षमता आहे. पण एवढ्या मोठ्या economyतून आपल्या नशिबाला किती वाटा येतो?

यात जर तुम्ही समाधानी असाल तर प्रश्नच नाही; पण जर तसे नसेल... अन्य मार्गाचा विचार असेल तर 'अमेरिका' नावाच्या कोशातून बाहेर पडून आजूबाजूला नजर टाकलीत तर अनेक पर्याय दिसतील.

त्यातील एक पर्याय... दुबई!

जर या पर्यायाची निवड केलीत तर 'तोरणावर' शेलारमामाने जसे पळून जायचे दोरखंडच कापून टाकले त्याप्रमाणे सर्व दोरखंड कापून जिद्दीने उडी घ्या... लढा... यशाची गुरुकिल्ली नक्कीच सापडेल!




# मनोगत....एका कामगाराचे!

**रामप्रसाद रेड्डी! ५५ वर्षांचा आंध्रप्रदेश तमिळनाडूचा एक लेबर! वयाच्या २०व्या वर्षी दुबईत पहिले पाऊल टाकले. ३५ वर्षे वास्तव्य करून आंध्रप्रदेशला परत जाण्याऐवजी इथल्या वाळूतच.... मातीतच अखेरचा श्वास घेण्याची....मिसळून जाण्याची इच्छा करणारा एक भारतीय कामगार! ३५ वर्षांच्या वाळवंटातील प्रवासाचे साद्यंत वर्णन त्याच्याच शब्दात! त्याच्यासारख्या, लेबर म्हणून 'site'वर येणाऱ्या अनेक तरुणांना मार्गदर्शक ठरावे असे उदाहरण! शब्दांकन केले आहे मेघना वर्तक यांनी!**

**आंध्रप्रदेशातील**, एका अतिशय छोट्याशा गावात जन्माला आलेला मुलगा म्हणजेच मी रामप्रसाद रेड्डी! गाव तरी कसं म्हणता येईल त्याला? खरं तर जमिनीचा एक तुकडा! त्यावर २५-३० झोपड्या उभारलेल्या. ना वीज, ना पाणी, ना कसदार जमीन! अठरा विश्वे दारिद्र्य....सर्वकडे अंधार.... आशेच्या किरणाला प्रवेश करताच येत नव्हता त्या गडद अंधारातून! घरात खाणारी तोंडे अनेक. हाता-तोंडाची गाठ दिवसादिवसात पडत नव्हती. जरा मोठा झाल्यावर बरोबरीच्या मित्रांबरोबर मीही मुंबईच्या महासागराला येऊन मिळालो. रोजगाराचा शोध घेऊ लागलो!

त्याचवेळी एका एजंटशी ओळख झाली. दुबईला लेबर म्हणून तो लोकांना घेऊन जात असे. विमानाचे तिकीट, त्याची फी द्यायला पैसे नव्हते; पण त्या एजंटने प्रत्येक गोष्टीसाठी मार्ग सांगितला व शेवटी शिक्षण नव्हते, लिहिता वाचता येत नव्हते, त्यामुळे नंदिबैलाप्रमाणे हो ला हो म्हटले व तो सांगेल तेथे अंगठा लावला.

अखेर बोटीतून दुबईच्या वाळवंटात पहिले पाऊल टाकले. त्या एजंटने ज्याच्याकडे कामाला म्हणून लावले तो पण इंडियन माणूसच होता. त्याची कसलीतरी ट्रेडिंग कंपनी होती. दिवसरात्र काम करावे लागे. जेवणाच्या वेळेचा ठिकाणा नव्हता. एका छोट्याशा खोलीत आम्ही दहाबारा माणसे राहायचो. महिना पूर्ण झाला. आता पगार मिळेल व घरी पाठवता येईल या एकाच आशेने काम करत राहिलो. पण त्याने आमचा पेपरवर अंगठा घेतला व हातात पैसे ठेवले फक्त १०० दरहॅम! माझ्या बरोबरच्या सर्वच लोकांची हीच अवस्था होती की, कशासाठी आपण देश, आपली माणसे सोडून दूर आलो? १०० दरहॅम साठी? कंपनीच्या मालकाला विचारायला गेलो तर त्याने धाकधपटशा केला, भीती दाखवली. त्या काळात लेबर लॉ इत्यादी दुबईत काही नव्हते. लक्षात आले की, आपली मोठी फसवणूक झाली आहे. तिकडे एजंटने पैसे घेतले व इकडे आता



मेघना वर्तक
meghana.sahitya@gmail.com

हा मालक! एका मोठ्या जाळ्यात आम्ही सर्व अडकलो होतो. आम्ही सर्वचजण भारतात पळून जाण्याचे मार्ग शोधत होतो. बघता बघता ४ महिने गेले व अखेर एक दिवस मला संधी मिळाली; तसा मी भारतात परत आलो....बोटीने लपत छपत!

१९७० ते ८० या काळातील गोष्टी. दुबईचे लोकांचे वेड वाढत होते. दुबई व गल्फ कंट्रीज तेलामुळे समृद्ध होत होत्या. साहाजिकच प्रगतीही सुरू झाली. त्यासाठी सर्व क्षेत्रातील कामगारवर्गाची जरूरी होती. भारत व पाकिस्तान या देशांतून जास्तीतजास्त लोकं तिथे नोकरीधंद्यासाठी येऊ लागली. सुशिक्षित लोकं जात होती, तशीच आमच्यासारखी अशिक्षित गरीब लोकही जात होती. आमच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा एजंट लोकं घेत होती. खोटी आमिषे दाखवून पैसे उकळून दुबईला पाठवत होते; व तिथेही त्यांची फसवणूक होत होती....माझ्यासारखी! सर्वात दुःखाची गोष्ट होती ही की, फसवणूक करणारे होते ते आपले भारतीयच! एका भारतीयाने दुसऱ्या भारतीयाची परदेशात केलेली फसवणूक...!!

अशा अनेक गोष्टी ऐकू येत होत्या. पण दुबईचे वेड वाढतच चालले होते. मुंबईत परतल्यानंतर एका मोठ्या हॉटेलमध्ये मी साफसफाईचे काम करू लागलो व तिथेच मला एक अरबी माणूस भेटला....देवदुतासारखा! त्याने मला त्याच्या घरी कामाला येतोस का म्हणून विचारले व मी पटकन् 'हो' म्हटले....इथूनच माझ्या आयुष्याला वेगळे वळण लागले.

मागच्या फसवणुकीच्या आठवणी ताज्या होत्या....मनात एक प्रकारची धाकधूक होती....पण का कुणास ठाऊक एक विश्वास वाटत होता त्या अरबी माणसाबद्दल....माझ्या अरबाब बद्दल! त्यानेच माझ्या visaची वगैरे व्यवस्था केली; व त्याच्याचबरोबर दुबईच्या वाळवंटात पुन्हा पाऊल टाकले.... पण ह्यावेळेचे पाऊल योग्य ठिकाणी पडले! त्याच्याच बरोबर त्याच्या व्हिलात आलो. घर कसले मोठा राजवाडाच होता तो. आलिशान गाड्या....सर्वकडे मार्बल.... गुळगुळीत.... दारांची हँडल्स सोन्याची....मला राहायला सुद्धा वेगळी स्वतंत्र खोली....त्याला टॉयलेट....माझ्यासारखे ८/१० नोकर होते. सर्वांच्याच राहण्याची सोय होती. पोटभर जेवण....जेवणाचा पहिला घास तोंडात घातला तेव्हा आठवले....आशाळभूतपणे कचऱ्यातही खायला काही मिळतंय का याचा शोध घेणारे असंख्य चेहेरे....मोठ्या कष्टाने ते चेहेरे डोळ्यांपुढून घालवले व तेव्हाच निश्चय केला की इथे प्रामाणिकपणे कष्ट करायचे व त्या भुकेल्या मुखांमध्ये चार घास पाठवायचे. अरबाबने जो विश्वास माझ्याबद्दल दाखवलाय त्याला पात्र ठरायचे.

मनाचा निश्चय झाला व दिवस जाऊ लागले. अरबाबच्या vilaचे साफसफाईचे काम करू लागलो. माझी कामातील चपळता, स्वच्छता, सर्वांशी मिसळून राहणे व प्रामाणिकपणा यामुळे मी आख्ख्या घराचे मन जिंकून घेतले व त्यांच्या कुटुंबातील एक कधी होऊन गेलो ते समजले नाही!

एकदीड वर्ष त्यांच्या घरातच राहिलो. अरबाबची contracting company होती. तिथेच हळूहळू काम करू लागलो. खरं म्हटलं तर मी अशिक्षित! कसलेच ज्ञान नव्हते....इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, प्लंबिंग....पण मी ठरवले 'अथ'पासून सुरुवात करायची....जितक्या गोष्टी शिकता येतील तितक्या शिकायच्या....मेहनत करायची....बघता बघता शिकत गेलो....आज एवढ्या वर्षांच्या अनुभवांनंतर एखाद्या इंजिनिअरच्या तोडीचे काम करू शकतो!

म्हणूनच इथे येणाऱ्या प्रत्येक तरुणाला माझे सांगणे आहे की, एकदा दुबईत आलात की मेहनत करा प्रामाणिकपणे....यश तुमच्या पाठीशी आहे.... इच्छा असेल तर मार्ग नक्कीच मिळेल!

साईटवर फोरमन म्हणून काम करू लागलो....लेबर कॅम्पवर राहू लागलो....लेबर कॅम्पची व्यवस्था बघू लागलो.

लेबर कॅम्प....आमची घरे! तो काळ असा होता की, दुबईतील प्रगतीला नुकतीच सुरुवात होत होती. त्यामुळे कायदेकानून काहीच नव्हते. कित्येक लेबर कॅम्पमध्ये छोट्याशा खोलीत १०-१२ माणसे राहायची. सकाळी उठून डबे घेऊन कंपनीच्या बसमधून सर्व कामगार साईटवर जायचो. थंडीत....उन्हातानात काम करायचे....दुपारी डब्यात आणलेले सुके-कोरडे खायचे....संध्याकाळी बसमधून लेबर कॅम्पमध्ये परत जायचो. रात्रीचे जेवण....दुसऱ्या दिवशीचा डबा बनवायचा व घरची आठवण काढत निद्रेच्या आधीन व्हायचे. डोक्यावर रणरणते ऊन, वाऱ्याची झुळूक आली तरी ती अंगाला चटके बसवणारी....समोर पसरलेली तप्त रखरखती वाळू....सर्व वातावरणात मनाला थंडावा देई ते घरून येणारे पत्र....! त्यावेळी मोबाईल नव्हते....फोनसुद्धा महाग होते. खर्च करून गावाला फोन करणं शक्यच नव्हते. त्यामुळे कंपनीचा माणूस जेव्हा पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन, कंपनीच्या पोस्ट बॉक्स मधून पत्र घेऊन येई, तेव्हा त्याची अक्षरशः चातकाप्रमाणे वाट बघत असायचो. पत्रे आली की, ज्यांची पत्रे असत त्यांचा आनंद चेहऱ्यावर दिसे. ज्यांची पत्रे

नसत त्यांचे दुःखी चेहेरे पाहून वाईट वाटे. मी जाऊन सर्वांना दिलासा देई....अरे येईल पत्र....काळजी करू नकोस! पत्र वाचण्याची आतुरता सर्वांनाच असे. लंच-टाईम मध्ये बसून प्रत्येकजण पत्र वाचायचा....कोणाच्या डोळ्यात हसू....तर कोणाच्या आसू! कुटुंबापासून वर्षांनुवर्ष दूर राहाणाराच ही अवस्था....ही तगमग जाणू शकतो! वर्षांनुवर्ष.... अख्खं आयुष्यच!

दुबईत 'शुक्रवार' हा आठवड्याच्या सुट्टीचा दिवस आहे. साईटवर काम असेल तर ओव्हर टाईम मिळे. शुक्रवारी साईट अर्धा दिवस चालू राही! दुपारी साडेअकरा वाजता सर्व दुकानं बंद व्हायची....आठवड्याच्या नमाजासाठी!

कंपनीची बस सुट्टीच्या दिवशी सर्वांना गावात....बाजाराच्या जवळ आणून सोडायची. दिवसभर तिथे फिरायचे.... आठवड्याला लागणाऱ्या जरुरीच्या वस्तू घ्यायच्या व संध्याकाळी बसमधून परत लेबर कॅम्पमध्ये जायचे. दुबईत नवीन येणारा प्रत्येक कामगार पहिले चार महिने तर अतिशय अस्वस्थतेत काढायचा. कधीकधी परत जाण्याच्याच गोष्टी करायचा. नवीन ठिकाणी, आपल्या माणसांपासून दूर राहायचे....मनावर दगड ठेवून....खरंच खूप कठीण गोष्ट आहे. ह्या सर्व नवीन कामगारांना गोडीगुलाबीने राहण्यासाठी मी खूप प्रयत्न करायचो. कारण मला फक्त असे दिसायचे की, जर ते परत भारतात गेले तर त्यांचे होणारे हाल....!

असेच दिवस गेले....महिने गेले....वर्षं उलटली! माझ्या आयुष्याची सुद्धा! माझ्या मुलीचे लग्न झाले....ती लहानाची मोठी कधी झाली ते समजलेच नाही....तिचे बालपण मी कधी पाहिलेच नाही. मुलगा मोठा झाला....त्याची अभ्यासातील प्रगती पाहून, देवाचे सतत आभार मानायचो मी! इथून मी पैसे पाठवायचो व तिथे मुलांची काळजी बायको घ्यायची. मुलगा बघता बघता इंजिनीअर झाला. लग्न झाले....माझ्या अरबाबने त्याला दुबईत आणले.... नोकरीस लावले....त्याचे आयुष्य बदलून गेले. पण कधी लक्षातच आले नाही....मुलांच्या भावना....कुटुंबाला चांगले दिवस दाखवायचे या वेडानेच झपाटले होते.

३५ वर्षे झाली मला दुबईत राहून....पैसे मिळवले....चार घास घरी पाठवले! देवदूतासारखा अरबाब भेटला. त्याच्या कुटुंबियांनी त्यांच्यात मला सामावून घेतले. माझ्या सुखदुःखात ते सहभागी झाले. पण एक रुखरूख मात्र कायम मनात राहिली....माझी बायकामुले माझ्यापासून दुरावली!

मला आठवतंय....फार पूर्वी तीन वर्षांनी पहिल्यांदा मी जेव्हा बायकामुलांना भेटायला गेलो भारतात तेव्हाचा आनंद काही वेगळाच होता. आपल्या देशात जायचे....आपल्या माणसांना भेटायची ओढ वेगळीच होती. आता जाणार होतो ते कामात यशस्वी होऊन! मागच्यावेळी परत गेलो ते पळून....बोटीने लपत छपत....परत गेल्यावरही लोकांची बोलणी सहन केली. पण आता तसे नाही....ताठ मानेने जाणार होतो. वेड्यासारखी खरेदी केली होती. नातेवाईक मित्र या सर्वांना द्यायला वस्तू घेतल्या. शेवटी थोडे कर्ज घेऊनच गेलो. विचार पण केला नाही. मुंबईच्या एअरपोर्टवर पाऊल टाकले. त्याकाळी प्रत्येक बॅग उघडावी लागे. माझ्यासारखे अशिक्षित कामगार बघून कस्टमवाले खूप त्रास द्यायचे. ड्युटी भरा नाहीतर त्यांना फुकट वस्तू द्या. अक्षरशः रडकुंडीला यायचे सर्व! कुटुंबापासून दूर राहून कष्ट करून तिथे पैसे मिळवायचे व इथे यांना फुकट वाटायचे! पण इलाज नसायचा. तिथून बाहेर पडायचे तर ते म्हणतील त्या वस्तू द्याव्याच लागायच्या. एअरपोर्टवरून बाहेर पडलो की नातेवाईक! त्यावेळी डायरेक्ट


Peshwā
Maharashtrian cuisine for the world
DUBAI & SHARJAH

The Peshwas means the 'foremost'.
They carried forward the Maratha Dynasty with great respect & confidence.
So anything attached to the name Peshwa can never disappoint.
Peshwa specializes in nutritiously balanced maharashtrian cuisine.

We have been serving homely maharashtrian food for the last 7 decades.
It's a promise we made and we still keep it!

| | |
|---|---|
| Puneri | Nagpuri |
| Kolhapuri | Goan |
| Malvani | Konkani |



Outdoor Caterings, Lunch & Dinner Packs Available

04 379 5520, 06 5345489, 055 6940776, 055 8564661

Dubai - Karama, Near General Post Office, Opp. Civil Defence, Next to Al AdilSuper Market

Sharjah - Al Yarmook, Near Kuwait Roundabout, Between Jesco Supermarket & Adnoc Petrol Station

www.peshwarestaurant.com

फ्लाईट नव्हती, माझ्या गावाला जायला आंध्राला! एक दिवस तरी मुंबईला मुक्काम करावा लागे.

तिथे प्रत्येकाची आशाळभूत नजर! अक्षरशः बॅग उघडून सर्व वस्तू संपणार! प्रत्येकाची कल्पना हीच....तू काय दुबईत राहतोस....पुन्हा घे!

बायकामुलांसाठी द्यायला काही शिल्लकच राहायचे नाही. गावाला पोचून मुलांची समजूत काढावी लागे. बायको मात्र समजूतदार! मी एवढ्या वर्षांनी भेटायचो यातच ती बिचारी आनंदी असायची. बघता बघता ४५ वर्षे गेली....एक दिवस मुलाचा फोन आला. आई खूप आजारी आहे....लागलीच या! गेलो पण भेट झालीच नाही. अक्षरशः आयुष्य असे गेले. कुटुंब म्हणून कधी राहिलोच नाही आम्ही. आमची मुलं.... नवराबायको....आमची सुखदुःखं....असे क्षण कधी आलेच नाहीत आयुष्यात! सणवार....वाढदिवसही असेच गेले! आणि....आणि एक दिवस माझी सहचारिणी गेली.

मुलगा बोलला....काय सुख दिलेत माझ्या आईला? दिवस दिवस वाट बघत होती....तिला पैसे नको होते....तुम्ही हवे होतात....तिथे गेलात....कष्ट केलेत....पैसे मिळवलेत.... पण नातेवाईकांना वाटलेत....आज हा म्हणाला 'थोडे पैसे हवेत'....उद्या तो म्हणाला 'घर बांधायला पैसे दे'....सर्वांना वाटून टाकलेत....आज आईला हॉस्पिटलमध्ये ठेवायला पैसे राहिले नाहीत....कोणीही एक छदाम दिला नाही. सर्वांनी तुम्हाला फसवले....खरंच खाडकन डोळे उघडले....पण वेळ गेली होती.

इथे दुबईत येणाऱ्या सर्वांना मी सांगेन,- दुबईत या.... मेहनत करा....पैसे कमवा....पण साठवा....कुटुंबासाठी खर्च करा....आजूबाजूच्या गिधाडांसाठी नाही....लोकांना वाटतं दुबईत झाड हलवलं की पैसे पडतात....पण जो राहतो त्याला माहीत....घाम गाळून पैसे मिळतात....कुटुंबाला पारखे होऊन पैसे मिळतात....फार मोठी किंमत मोजावी लागते या पैशांसाठी!

बघता बघता दुबईचे रूप पालटले. चढउतार आले. पण दुबईच्या शेखच्या दूरदृष्टिमुळे दुबई त्यातून तरून गेली. प्रथम साईटवर काम करणारे भारतीय, पाकिस्तानी कामगारच असायचे. पण हळूहळू दुबईचा चेहरामोहराच बदलला. नेपाळी, फिलिपिनो, आफ्रिकन, इराणी सर्व देशाधर्मांची माणसे साईटवर काम करू लागली. प्रत्येकाचे आचारविचार वेगळे! देशधर्मप्रेम वेगळे! या सर्वांना सांभाळून घेऊन भांडणतंट्याशिवाय काम करवून घ्यायची जबाबदारी माझी होती. दुबईचे कायदे कडक. त्यामुळे चोरी हा प्रकार इथे नाही. चोरी करील त्याला कडक शिक्षा....अगदी हातही तोडले जातात! मारामाऱ्या करणाऱ्याला जेलमध्ये टाकले जाते. 'स्वच्छता' हा दुबईचा अभिमान बिंदू आहे. कायदे न पाळणाऱ्यास डिपोर्ट केले जाते. दुबईत....परदेशात.... कायद्याच्या कक्षेत राहीलात तर जीवन सुखकारक होईल!

बघता बघता दुबईच्या लेबरकॅम्पची स्थितीही बदलत चालली आहे. इतर प्रगतीबरोबरच कामगारांची काळजीही घेतली जाते. अलगोज व सोनापूर या दोन ठिकाणी बहुतांश लेबरकॅम्प आहेत. हल्ली नियमाप्रमाणे प्रत्येक लेबरला ४० चौरस फूट दरडोई जागा ह्याप्रमाणे खोलीत माणसे असतात. ए.सी., पाणी, वीज ह्या सर्व गरजेच्या वस्तू कंपलसरी आहेत. प्रत्येक कामगाराचा हेल्थ इन्शुरन्स कंपनीला काढावा लागतो. साप्ताहिक सुट्टी व दर दोन वर्षांनी भरपगारी १ महिना रजा.... विमानाचे तिकीट! जास्त काम असेल तर ओव्हर टाईमही मिळतो.

हे असे सर्व असले तरी लेबरकॅम्पमध्ये खोलीमध्ये भांडण चालतात. अगदी मारामारीपर्यंत वेळ येते. पण त्याचबरोबर वेळेला जीवाला जीवही लावतात. कोणी आजारी पडले तर रात्र रात्र त्याच्या उशाशी बसून त्याची शुश्रूषा करतात; त्याला चार घास भरवतात. घरचे पत्र आल्यानंतर कोणाच्या डोळ्यांतील अश्रू स्वतःच्या रुमालाने पुसतात. एकमेकांचे सणवार एकत्र साजरे करतात. ना जातीचा ना पातीचा, ना देशाचा ना धर्माचा! पण एका अनामिक धाग्याने बांधला गेलेला हा कामगार वर्ग....एक मानवतेचा धागा....एक माणुसकीचा बंध!

ह्या धाग्याच्या बंधनातच माझे पाय अडकताहेत. म्हटलं तरी इंडियात जावेसे वाटत नाही....शेवटी तिथे तरी आता आपलं म्हणून कोण आहे....लेबर कॅम्प हेच माझं कुटुंब आहे....त्यांची सुखदुःखं माझी सुखदुःखं आहेत. ह्या अरबाबने मला आधार दिला....येथील वाळू माझी कर्मभूमी आहे....म्हणून या देशाच्या वाळूतच....मातीतच मिसळून जायची माझी इच्छा आहे....!

मराठीमाणूसहाखरातरनोकरीधार्जिणीचा, आपलीनोकरीबरीअन्आपलासंसार, यापुढेएखाद्याव्यवसायात उतरावं असं शंभरातल्या २ % लोकांना वाटतं, त्यामुळे इतकं मोठं धारिष्ट्य कसं करू? ह्या प्रश्नाने सदैव ग्रासलेला, तरीसुद्धा काही मंडळींनी साहस दाखवलं व सिद्धंही केलंय की, व्यवसायात अधिक यश मिळवता येतं.

सर्व परिस्थिती अनुकूल असतांना व्यवसाय यशस्वी होऊ शकतो, मात्र ते स्व-भूमीत व आप्तसोयऱ्यांसह जवळ असतांना. म्हणूनच कौतुक वाटतं ते परदेशात, तेथील प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन, तेथील कायदा व नियमांचा बडगा सांभाळत वाटचाल करणे अत्यंत कठीण बाब आहे.

व्यवसायात सर्व दृष्टीकोनांत विचार करणे जसे गरजेचे असते तसे मालाची विक्री पासून ते उद्योगधंद्यातील प्रतिस्पर्धी पर्यंत सर्वांशी स्पर्धा ही आलीच. यातून मार्गक्रमण करून यशस्वी ठरलेल्या काही दुबईतील व्यावसाइकांचा / उद्योगपतींचा अनुभव, कौशल्य व निग्रह 'मी आणि माझा व्यवसाय' यात समाविष्ट आहे. यांचा अनुभव पुढील पिढीला मार्गदर्शक नक्कीच ठरेल. यात सहभागी आहेत -

**डॉ. पैठणकर, अशोक वर्तक, श्रीपाद गोखले, अशोक काळे, हेमंत झोटिंग, प्रज्ञा पाठारे, ज्योती जव्हाळकर, दिलीप खेडेकर.**

# मी आणि माझा व्यवसाय




# समाजसेवा....
# आगळी वेगळी!

**एक यशस्वी व्यावसायिक, कुशल डॉक्टर व संवेदनशील मन या त्रयींचा संगम असलेली व्यक्ती म्हणजेच डॉ. संजय मुकुंद पैठणकर! कमी उत्पन्न असलेल्या दुबईतील कामगार वर्गासाठी देवदूत असलेल्या डॉ. पैठणकरांच्या आगळ्या वेगळ्या समाजसेवेची गाथा उलगडली आहे मेघना वर्तक यांनी!**

**आज** जगाचा एकही कानाकोपरा असा नाही की जिथे, भारतीय माणसाने आपले पंख पसरले नाहीत; जिथे त्यांच्या कर्तृत्वाची छाप पडली नाही....मग ते कोणतेही क्षेत्र असो....संशोधन....समाजकारण....राजकारण....अर्थकारण ....वैद्यकीय क्षेत्र....प्रत्येक क्षेत्रात भारतीयांचे योगदान महत्त्वाचे आहे.

असाच सेवावृत्तीने झपाटलेला, ध्येयपूर्तीसाठी वेडा झालेला एक योगी म्हणजे डॉ. संजय पैठणकर! आपण जे काही कमावतो, त्यातील काही हिस्सा तरी समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करून, समाजाप्रती असलेले ऋण फेडायचे ह्या विचारांचे वेड लागलेला डॉक्टर! आखातातल्या उन्हाळ्याशी झुंजत काम करणाऱ्या, भविष्याची सुंदर स्वप्ने बघणाऱ्या....कमी उत्पन्न असलेल्या कामगार वर्गासाठी देवदूत असलेले डॉ. पैठणकर!

एक दिवस त्यांच्या क्लिनिकमध्ये तापाने फणफणलेल्या व चक्कर आलेल्या एका कामगाराला आणले होते. रणरणत्या उन्हात सतत काम केल्याने त्याला डीहायड्रेशन झाले होते व तातडीने औषधोपचाराची गरज होती. डॉक्टरांच्या क्लिनिक मधील सर्व टीम तातडीने कार्यरत झाली. सहा तासांच्या अथक् प्रयत्नांनंतर तो कामगार बोलायला लागला....पण पहिले वाक्य त्याने सांगितले....डॉक्टर, तुमची फी देण्यासाठी माझ्याकडे पैसे नाहीत हो.... डॉक्टरांनी त्याच्या खांद्यावर आश्वासक थोपटले व सांगितले...तुझा पुढील महिन्याचा पगार आला की त्यातून दे....व तेही नाही जमले तरी काळजी करू नकोस.... नाही दिलेस तरी चालतील....!



डॉ. संजय पैठणकर
drsanjay@eim.ae

दुसऱ्याच महिन्याच्या सुरुवातीला तो कामगार बरा होऊन आला; फी दिली व म्हटले, 'तुम्ही केवळ माझा जीव वाचवला नाहीत तर माझ्या पूर्ण कुटुंबाला जीवनदान दिले. घरात कमावणारा मी एकटाच आहे. पूर्ण कुटुंब माझ्यावर अवलंबून आहे. तुमचे हे उपकार मी कधीच विसरू शकणार नाही.'

आणि एक संवेदनशील मन इथेच हेलावले गेले. कमी उत्पन्न असलेल्या कामगारांसाठी क्लिनिक उभे करायचे व कमी शुल्क घेऊन वैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्यायची. इतकेच नव्हे तर, तेही शक्य नसलेल्या कामगारांना पूर्ण मोफत सेवा द्यायची हे स्वप्न इथेच आकार घेऊ लागले.

नागपुरचे सुप्रसिद्ध डॉक्टर मुकुंद त्र्यंबक पैठणकर यांचे सुपुत्र म्हणजेच डॉ. संजय पैठणकर! नागपुरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे गोल्ड मेडॅलिस्ट. एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केल्यानंतर डॉ. संजय यांनी पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण मुंबईत घेतले व दुबई गाठली. डॉ. पैठणकर दुबईत नोकरी करू लागले. त्याचवेळी दैवयोगाने रोझीशी ओळख झाली व तिच्याशी विवाह झाला. आज वटवृक्षाप्रमाणे पसरलेल्या डॉक्टरांच्या व्यवसायाचा प्रशासकीय कारभार त्या


सांभाळतात.

१९८८ ते ९४ या काळात अनेक सरकारी व खाजगी हॉस्पिटल्समधून डॉक्टरांनी काम केले. तसेच इमर्जन्सी सर्व्हिसेस मध्येही ते कार्यरत होते. ह्याचवेळी, अनेक कामगार पेशंटशी संभाषण करताना त्यांच्या हे लक्षात आले की, लेबर कॅम्पपासून जवळच जर क्लिनिक काढली तर त्याचा फायदा कामगारांना नक्कीच मिळेल. डॉक्टर म्हणतात, ''एखाद्या पॉश लोकॅलिटीत, एखादे अद्ययावत क्लिनिक मी काढू शकत होतो; पण मग कमी उत्पन्न असलेल्या कामगार वर्गासाठी, त्यांना परवडेल अशी उत्तम वैद्यकीय सेवा त्यांच्या दारापर्यंत पोचवायची, हे स्वप्न पूर्ण करता आले नसते!''

दुबईत कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. दुबईच्या प्रगतीत त्यांचा वाटा फार मोठा आहे. पण त्यामानाने त्यांना मिळणाऱ्या सुविधा त्याकाळात कमी होत्या. आज त्यांच्यासाठी येथील सरकारने अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. पण १९८०-९० चा काळ असा होता की, दुबईची प्रगती सुरू झाली होती....कायदेकानून तयार होत होते. पण म्हणूनच कामगार वर्गाला हाल सहन करावे लागत होते. ५० डिग्री सेल्सिअस तापमानाच्या भट्टीत काम करणारा हा कामगार! छोट्याशा खोलीत, बंकबेड घालून १०/१२ माणसे राहायची....आवश्यक सुविधा नव्हत्या....कामाच्या ठिकाणी साईटवरही तीच परिस्थिती....त्वचेच्या समस्या.... आरोग्याच्या समस्या....लहान जागेत राहात असल्याने डोक्याला होणाऱ्या जखमा सतत भेडसावत होत्या.... घरापासून आपल्या माणसांपासून दूर रहाणारा हा कामगार वर्ग केवळ चार पैसे मिळवून कुटुंबाच्या तोंडी निवारा घालण्यासाठी हे सर्व कष्ट सहन करीत होता.

पण जेव्हा तो स्वतःच आजारी पडतो, तेव्हा हॉस्पिटलपर्यंत पोहोचणे अशक्य होते. हॉस्पिटल कामाच्या ठिकाणाहून लांब....त्यामुळे टॅक्सीभाडे....कामावर रजा.... त्यामुळे तिथे पगार कापला जायचा....घरी भारतात पैसे पाठवायचे....७००/८०० दरहॅम पगार मिळणाऱ्या काम गाराला शक्य होत नव्हते. ही स्थिती एक कार्पेंटर कामगार रामप्रसाद व ए.सी. टेक्निशिअन महंमद घोष यांच्या तोंडून डॉ.नी ऐकली व मनाशी निश्चय केला.


१९९३ मध्ये डॉ. पैठणकरांनी अजमान येथे 'न्यू सानिया ग्रूप' या नावाने पहिले क्लिनिक व फार्मसी सुरू केली. तिथे एक मोठी garment industry होती व मोठ्या प्रमाणावर




कामगार वर्ग रहात होता. फी फक्त घेतली १० ते १५ दरहॅम! कन्सलटेशन व औषधे! लवकरच हे क्लिनिक लोकप्रिय झाले. या भरघोस प्रतिसादातूनच त्यांना स्फूर्ती मिळाली व बघता बघता इवल्याशा रोपट्याचा वटवृक्ष झाला. त्यांच्या शाखा चौफेर पसरल्या. त्याच्या सावलीत असंख्य कामगारांना आधार मिळाला. दुबईत ५, अजमान येथे ४ व शारजाला १ अशी १० क्लिनिक्स व फार्मसीज डॉक्टरांनी सुरू केल्या.

त्या काळात कामगारांच्या आरोग्याविषयी कंपनीचे मालक काळजी घेत नसत. त्यांचा विमा उतरवणे, आरोग्यविषयक सर्व सुविधा पुरवणे ह्याबद्दल ते उदासीन होते. तसेच दुबई प्रशासनाने सुद्धा आरोग्य सेवा सक्तीची केली नव्हती. ५ टक्क्यांपेक्षा कमी कामगार आरोग्यविम्याचा लाभ घेत. ज्यांना कंपनीकडून ही सुविधा मिळे ते नशिबवान समजले जात. 'हेल्थ इन्शुरन्स' कंपन्या कामगारांच्या विम्यासंबंधी उदार नव्हत्या. इन्शुरन्स कंपनीचे कार्यालय कामगारांच्या घरापासून लांब असल्याने, कामगार लोक विम्याचा लाभ घेत नव्हते, कारण टॅक्सीभाडे परवडत नव्हते. त्यामुळे क्लेम्स नसल्याने इन्शुरन्स कंपन्या खूश! कंपनीच्या मालकाला विम्याचे पैसे भरावे लागत नव्हते. त्यामुळे तोही खूश! मधल्यामधे भरडला जात होता तो कामगार!

हे विदारक सत्य हेरून डॉ. पैठणकरांनी 'bulk



booking'च्या तत्त्वावर कामगारांसाठी विमा योजना उपलब्ध करून दिली. त्यासाठी जिथे खूप कामगार काम करतात अशा मोठ्या ऑर्गनायझेशन्सना 'group insurance package' दिले. त्यामुळे प्रीमिअम भरण्याचा भार कामगारांवर आला नाही. डॉ. पैठणकरांनी आरोग्यविमा पुरविणाऱ्या २०० क्लिनिक्स व फार्मसीजचे नेटवर्क तयार केले आहे. या नेटवर्कच्या माध्यमातून ६ महिन्यात २५० दरहॅम मिलिअन बिझिनेस केला असून ४०,००० लोकांना आरोग्यविम्याचा लाभ मिळवून दिला आहे. त्यासाठी Alliance Insurance, Dubai Insurance, Noor Takaful, Union Insurance अशा सारख्या ३० विमा कंपन्यांशी त्यांचे करार झाले आहेत. डॉक्टरांनी हेल्थ इन्शुरन्सची सुविधा उपलब्ध करून दिल्याने कामगारांना औषधे व वैद्यकीय सेवा मोफत मिळतातच, त्याचबरोबर मोठे ऑपरेशन करावे लागले तरी त्यातही सूट मिळते. U.A.E. मध्ये २०० क्लिनिक्समध्ये कोठेही मोफत वैद्यकीय सेवा मिळते. तसेच या इन्शुरन्स स्कीमचा लाभ इंडिया, पाकिस्तान, श्रीलंका, फिलिपाईन्स या देशातील नाम वंत इस्पितळात ते घेऊ शकतात.

वर्षातून दोनदा लेबर कॅम्पवर 'मेडिकल कॅम्प्स' आयोजित केले जातात. गरजू कामगारांना मोफत तपासणी व औषधे दिली जातात. इतर सर्व महागाई वाढल्यामुळे कन्सलटेशन फी ३० दरहॅम केली आहे. पण डॉ.च्या लक्षात आले आहे की, कामगारांना ही फी भरणे कठीण जात आहे. डॉक्टर आपल्या कामगारांना चिंतीत बघू शकत नाहीत. त्यांनी इतर सर्व खर्च कमी केले.

डॉ. पैठणकर यांची सर्व क्लिनिक्स एकदम साधी! सर्व एकाच साच्याची एकाच ढंगाची! साधे इंटिरिअर! त्यात कोणत्याही प्रकारचा भपका नाही, झकपक फर्निचर-मार्बलच्या भिंती नाहीत की गुळगुळीत टाईल्स नाहीत, किंमती पडदे नाहीत, कोणतेही ग्लॅमर नाही, पण स्वच्छता व अद्ययावत उपकरणे ही त्यांच्या क्लिनिकची प्रमुख वैशिष्ट्ये! येणाऱ्या कामगाराला मोकळेपणा वाटेल असे क्लिनिकचे वातावरण. कमीत कमी खर्चात उच्च प्रतीची वैद्यकीय सेवा देणे हे एकमेव उद्दिष्ट! त्यासाठी डॉ. पैठणकर स्वतः जागरूक! क्लिनिक्समधील डॉक्टर्स उच्चशिक्षित असून गरिबांसाठी कळकळ असलेले असे आहेत आणि म्हणून पैठणकरांच्या क्लिनिकमधे येणाऱ्या पेशंट कामगारांना, जरी ते घरापासून लांब असले तरी, मायेचा ओलावा मिळतो, परदेशात आधार मिळतो!

डॉ. पैठणकर हे समाजसेवेचे व्रत घेऊन दुबईला आले नाहीत, हे जेवढे खरे आहे; तेवढेच ते पैशाच्या मागे लागलेले डॉक्टरही नाहीत. वैद्यकीय सेवा ही मानवसेवा असून केवळ धंदा करणे हा उद्देश नाही. तर ही सेवा पुरवताना कमीत कमी नफा मिळवून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणे यावर जास्त भर दिला जातो. अर्थात हे करत असताना तारेवरची कसरत करावी लागते. अनेक अडचणी येतात. त्यात महत्त्वाची म्हणजे सेवावृत्तीने काम करणारे डॉक्टर आजकाल मिळत नाहीत. पण कामगारांच्या आशीर्वादामुळे ह्याही अडचणीतून ते मात करतात, त्यामुळेच त्यांच्या कार्याची नीव अधिक पक्की होते.

डॉ. पैठणकरांना वाटते की, दुबईच्या प्रगतीत कामगार वर्गाचा वाटा मोठा आहे. प्रत्येक कंपनी हे एक कुटुंब आहे व कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या सुरक्षिततेची, आरोग्याची, शारीरिक व मानसिक विश्रांतीची जबाबदारी कुटुंबाचा मुख्य ह्या नात्याने त्या कंपनीच्या मालकाची आहे.

तसेच, कुटुंबातील सदस्याची म्हणजेच प्रत्येक काम गाराची सुद्धा जबाबदारी आहे की कंपनी म्हणजे आपले घर समजून १०० टक्के योगदान देणे. त्यासाठी सर्वार्थाने स्वतःला शारीरिक व मानसिक तंदुरुस्त ठेवणे! अशा विचारांचा एक यशस्वी व्यावसायिक, एक कुशल डॉक्टर व सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक संवेदनशील मन असलेला माणूस.... असा त्रिवेणी संगम डॉ. संजय पैठणकरांच्या रूपात दुबईतील कामगार वर्ग अनुभवत आहे. डॉ. पैठणकरांच्या स्फूर्तीदायक अशा कार्याचा दुबईतील मराठी मनाला नक्कीच अभिमान आहे!!!

# आणि म्हणूनच....चला रे दुबई!

**पुण्यनगरी मध्ये संस्कारित जिद्द, आत्मविश्वास व महत्त्वाकांक्षा या त्रयींच्या बळावर, दुबईत येऊन शून्यातून व्यवसायाचा डोलारा उभे करणारे एक उमदे व्यक्तिमत्त्व म्हणजेच अशोक गोविंद वर्तक! दुबईतील ३८ वर्षांच्या प्रवासात आलेल्या सर्वांगीण अनुभवांचे साद्यंत वर्णन त्यांनी आपल्या लेखात केले आहे. त्यांच्या अनुभवांची शिदोरी दुबईत येणाऱ्या पुढच्या पिढीला नक्कीच मार्गदर्शक आहे!**



**अशोक गोविंद वर्तक**
ashdub12@yahoo.com

**माझा जन्म** एका मध्यम वर्गीय कुटुंबात पुण्यात झाला. घरात पाच भावंडे. त्या सर्वांत मी लहान! घर बाळबोध वळणाचे. नोकरी करायची, महिना अखेर पगार घ्यायचा. त्यात घर चालायचे. आहे त्यात समाधानी राहायचे ही वृत्ती! माझी आई चार बुकंच शिकली होती. पुस्तकी ज्ञान फारसे नव्हते पण व्यवहारज्ञान खूपच होते. तिच्या गोष्टी ऐकण्यात बालपण सरले. त्या गोष्टींचा परिणाम की काय कोण जाणे, पण मी अतिशय महत्त्वाकांक्षी झालो. आहे त्यात आनंद मानणे मला जमत नव्हते. अल्पसंतुष्ट मी राहू शकत नव्हतो. लहानपणी मला नेहमी वाटे, हिमालयासारखी महत्त्वाकांक्षा असावी. काही मिळाले नाही म्हणून रडायचे नाही. पण ते मिळवण्यासाठी शक्य तेवढी मेहनत जिद्दीने करायची. यशाची एक एक पायरी चढत तेथेच न थांबता चढतच जायचे! कदाचित एव्हरेस्टवर नाही पोहोचणार पण निदान टेकडीवर तरी चढायचे व यशाचा 'तोरणा' जिवंतपणी मिळवायचा ह्या जिद्दीने आयुष्याची वाटचाल केली.

परमेश्वर कृपेने व सर्व थोरांच्या आशीर्वाद व शुभेच्छांमुळेच स्थापत्य शाखेतील पदवी प्राप्त केली. पुण्याच्या शासकीय महाविद्यालयातून, COEPतून! त्यानंतर स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगमधील पदव्युत्तर पदवी मिळवली. सर्व शिक्षण पुण्यातच, शिक्षणाच्या माहेरघरी झाले. भक्कम पाया तयार झाला. पण त्यावर यशोमंदिर बांधण्यासाठी अधिक मोठ्या क्षितिजाची आवश्यकता भासली. कूपमंडूक वृत्ती ठेवायची नाही, नवीन धाडस करायचे व पुण्याबाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

प्रथम संधी मिळाली ती भारताची व्यावसायिक राजधानी मुंबईमध्ये! भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटरमध्ये. ज्या पदासाठी अर्ज केला व मुलाखत दिली त्यापेक्षा वरच्या पदावर मला संधी मिळाली. कामावर रुजू झाल्यावर उत्कृष्ट दर्जाचा अनुभव व त्याचबरोबर एक नवे मित्रमंडळ मिळाले. तारुण्याच्या सुरुवातीलाच ज्येष्ठ व अनुभवी मित्रांचे मार्गदर्शन लाभले. खऱ्या अर्थाने व्यावसायिक शिक्षणाची



सुरुवात झाली. ४ वर्षे तिथे जो अमूल्य असा अनुभव मिळाला त्याचा फायदा आजही होत आहे.

त्या काळात सर्वांनाच अमेरिकेला जाण्याचे वेड होते. सहजासहजी संधीही मिळत होत्या. पण माझा स्वभाव जरा वेगळा! जे सर्व करतात तेच आपण करताना मला मेंढरांच्या कळपात असल्यासारखे वाटायचे. त्यापेक्षा वेगळा मार्ग निवडण्याची ऊर्मी यायची. म्हणूनच की काय, अभियांत्रिकीच्या शिक्षणात सुद्धा मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल या शाखांची निवड न करता स्थापत्य शाखा निवडली. त्याशिवाय स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी ह्या शाखेत अधिक संधी (भांडवलाशिवाय) मिळेल ही पण भावना होतीच. तसेच आता झाले. अमेरिकेपेक्षा नवीन समृद्धी लाभत असलेल्या आखाती देशाची निवड करायचे ठरवले.

हे सर्व ठरले, पण आखाती देश म्हणजे कुठे जायचे याची काहीच कल्पना नव्हती. कुवेत, कतार, मस्कत, बहारिन, दुबई....? तिथे पाणी नाही. आपल्या लोकांना अन्यायकारक, पिळवणूक करणारी वागणूक मिळते इत्यादी दंतकथा! निव्वळ योगायोगानेच मी दुबईला येण्याचे ठरवले. कदाचित मी नव्हे तर परमेश्वराने बहुदा पुढील भविष्य माझ्यासाठी आधीच पाहून ठेवले होते. आपण माणसं फक्त वर्तमानच बघतो व त्याप्रमाणे आनंदी-दुःखी होतो. पण ईश्वराला फार दूरचे दिसते. भविष्य दिसते. याचा प्रत्यय आज - दुबईतील यशस्वी वाटचालीनंतर भूतकाळात डोकावताना पुन्हा एकदा येतोय.

मी दुबईला येण्याचे ठरल्यावर सर्वांचाच भरपूर विरोध झाला. 'BARCतील चांगली नोकरी सोडून कुठे चाललास. नंतर पस्तावशील.' घरात आईची कल्पना होती की, माझ्या डोक्यावर परिणाम झाला. एक ना अनेक. माझा निश्चय पक्का झाला होता. उडी घ्यायचीच. त्यात साथ दिली पत्नीने. ती साथ दुबईच्या प्रवासातील अनेक चढ-उतारात आजतागायत कायम आहे.

वयाच्या २८ व्या वर्षी, १९७६ मध्ये माझे दुबईत आगमन झाले. तेही अगदी जून अखेरीला! भयानक उन्हाळ्याला सुरुवात झाली होती. वातावरण म्हणजे भट्टी पेटल्यासारखे वाटत होते. तपमान होते ४७-४८°c. त्यासोबत ७०-७५% आर्द्रता! घामाच्या धारांनी अक्षरशः आंघोळ होत होती. जणू नरकात आहोत असेच पहिले काही दिवस वाटत होते. निसर्ग

सत्त्वपरीक्षा घेत होता. एकाही व्यक्तीच्या स्नेहाची शिदोरी नव्हती. आधार तर नव्हताच! तेथील स्थानिक लोकांसंबंधी दूषित पूर्वग्रह होते. त्यामुळे मनात धाकधूक! येथील अरबी क्रूर आहेत हीच कल्पना! सर्व बाजूंनी कोंडीत सापडल्यासारखे झाले होते. पण मनाचा निश्चय कायम होता की, काय वाटेल ते झाले तरी चालेल, पण पराभूत होऊन दुबईतून पळून जायचे नाही!

हळूहळू दिवस जाऊ लागले. येथील सामाजिक जीवनाची सवय होऊ लागली. स्थानिक लोकांचा अनुभव येऊ लागला. त्यांच्या संपर्कात हळूहळू लक्षात येऊ लागले की, भारतात जशी बरी-वाईट लोकं आहेत तशीच इथे पण आहेत. त्यांच्याकडेही उत्कृष्ट समाजव्यवस्था व भिन्न पण चांगले संस्कार आहेत. ते खोटे बोलत नाहीत. शिव्या तर अजिबात देत नाहीत. परमेश्वरावर (अल्लावर) नितांत श्रद्धा! प्रत्येक घटना तोच घडवतो अशी भावना. त्यामुळे 'इन्शाल्ला' म्हणजे परमेश्वराची इच्छा असेल तर करीन. हे विचार. अर्थात काही जण त्याचा दुरुपयोगही करतात. पण त्यात दोष त्यांचा आहे; त्या भावनेचा नाही.

त्या काळात दुबईत कामाचा प्रचंड ओघ होता. तुमची ताकद असेल तेवढे काम व त्या अनुषंगाने अर्थार्जनाची संधी उपलब्ध होती. हळूहळू स्थानिक लोकांचा अधिकाधिक अनुभव येऊ लागला.

माणुसकी व सर्व माणसे समान ही भावना ते अगदी मनापासून जाणतात व मानतात. १९८०-८२ च्या सुमारास तेलाचे भाव भडकले. पण स्थानिक लोकांना पेट्रोल स्वस्तात मिळायचे. सरकार पेट्रोल व वीजेसाठी खर्चाचा काही भार उचलत होती (सबसीडी). त्यामुळे स्थानिक लोकांना स्वस्त तर इतरांना महाग भावात तेलाचा पुरवठा करावा अशी हुशार (?) कल्पना एका महाभागाने आणली. २-३ दिवस ती लागू झाली. पण येथील सहृदयी शेख परत आल्यावर त्याने ती रद्द केली. एक तर सर्व प्रजा समान व दुसरी गोष्ट बाहेरची लोकं ही आपल्या समृद्धीसाठीच काम करत आहेत तर त्यांना वेगळा भाव का?

खरोखर आपल्या राज्यकर्त्यांनी शिकण्यासारखे हे विचार नाहीत का? दैनंदिन जीवनात बरेवाईट अनुभव येत होते. त्यावेळी सर्वकडे वाळू होती. रस्ते कमी होते. वाळू तापून कोरडी व्हायची व त्यामुळे गाडी रुतायची. तापलेल्या उन्हात ती बाहेर काढणे किंवा पायी तुडवत जाणे फार कठीण. पण जर तुमची गाडी रुतली तर एक नैसर्गिक आपत्ती समजून सर्वजण मदतीला धावून यायचे. अक्षरशः गाडी उचलून बाहेर काढायचे व कोणताही मोबदला नम्रपणे नाकारायचे. त्याकाळात हे चित्र ठिकठिकाणी दिसायचे.

एकदा माझ्या घराखाली वाळूमध्ये चावी पडली. काही केल्या सापडेना. बाजूच्या अरबी घरातून एक वृद्ध गृहस्थ बाहेर आले. घरातील इतर पुरुषांना बोलावले, वाळूत बसून चावी शोधली. माझे मन उपकारच्या भावनेने भरून आले. पण ते सर्वजण आभार मानण्यापूर्वीच निघून गेले.

असे अनेक प्रसंग अनुभवास आले व हळूहळू जे दुषित पूर्वग्रह होते ते नाहीसे झाले. एकदा भर उन्हाळ्यात गाडीचे चाक पंक्चर झाले. जॅक, स्पॅनर घेऊन मी झगडत होतो. एवढ्यात बाजूला एक मर्सिडिज थांबली. त्यातील अरबी खाली उतरला. मला मदत केली. पंक्चर काढले व तो निघून गेला. तो एक कोट्यधीश अरबी होता. तो मला ओळखत होता. मी त्याचे काम करत होतो. त्याला पैशाचा, मोठेपणाचा यत्किंचितही गर्व नव्हता. तो अगदी सामान्यमाणसाप्रमाणे वागला आणि माझ्या मनात सामान्यातील असामान्य माननीय व्यक्ती ठरला!

असे अनेक अनुभव आले व नकळतच येथेच काही काळ तरी वास्तव्य करावे असे वाटू लागले.

प्रथम दुबईला येताना त्यावेळच्या दरमानाप्रमाणे पगार तुटपुंजा होता. ऑफिस लहान होते. त्यामुळे सर्वच कामांची जबाबदारी घ्यावी लागत होती. पण त्याबाबत तक्रार करत राहण्यापेक्षा मी ती संधीच मानली. Consulting Office मध्ये लागणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या स्वीकारल्या. नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळाली. त्या साहेबांनीही माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून हळूहळू सर्व ऑफिस माझ्याच ताब्यात दिले. परंतु त्याचा पुरेसा आर्थिक मोबदला देण्यास तो तयार नव्हता.

त्याच काळात नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. येथील Visaच्या नियमांचा गैरफायदा घेऊन, मला नोकरी सोडू न देण्यासाठी शक्य तेवढ्या सर्व अडचणी निर्माण केल्या. पण तरीही न डगमगता नोकरी सोडली व एका आंतरराष्ट्रीय कन्स्ट्रक्शन कंपनीत रुजू झालो. पण त्यावेळीही स्वतःचा व्यवसाय करण्याचे स्वप्न स्वस्थ बसू देत नव्हते.

या नवीन पदावर अनेक वेगवेगळे अनुभव व त्या अनुषंगाने नवीन तपशील शिकण्याची संधी मिळाली. ह्या कंपनीत

अर्थार्जन व इतर सवलतीही चांगल्या होत्या. आयुष्य ठीक चालले होते. पण तरीही स्वतःचेच काही करावे ही इच्छा मनात घर करून होतीच. आणि....आणि अचानक ही संधी नकारात्मक मार्गाने पुढे आली. माझ्या कंपनीने माझी बदली जॉर्डनला केली. मी तिथे जाणे शक्य नाही असे सांगितले. अखेर मी नोकरीचा राजीनामा दिला.

आणि मित्राच्या मदतीने स्वतःचे स्वतंत्र लायसन्स काढण्याच्या धडपडी चालू केल्या. माझे स्नेही व मी मिळून १९८२ मध्ये नवीन Consulting Office सुरू केले. निर्णय कठीण होता. तीन मुलांची जबाबदारी होती. पिढ्यानुपिढ्या घरात नोकरी करून दर १ तारखेला पगार घरी आणायचा ही सवय! आता शाश्वत उत्पन्न बंद होणार. त्यातच, 'धंदा करतो आहेस, जपून, त्यात नुकसानही होते' असा सल्ला काही हितचिंतक देत होते. मी त्यावेळी एकच म्हणायचो - अरे न चालता येणाऱ्या अर्भकाला बोट धरून कसे चालावे, काय काळजी घ्यावी हे शिकवा. पण चालताना पडशील म्हणून चालूच नको किंवा कधी कधी पडशील ही भविष्यवाणी ऐकवून नाउमेद करू नका. कारण त्याने चालले हे पाहिजेच. ह्याच भरवशावर व्यवसाय चालू केला. आर्किटेक्चरल व स्ट्रक्चरल डिझायनिंग व कन्सलटंट म्हणून ऑफिस सुरू केले.

स्वव्यवसायात पदार्पण केल्यावर सुरुवातीला सर्वच गोष्टी स्वतःलाच सांभाळाव्या लागतात. वेळेला झाडू मारण्यापासून टंकलेखनापर्यंत! सुरुवातीच्या काळात माझ्या सुदैवाने मला पितृतुल्य आधार देणारी काही स्थानिक मंडळी भेटली. त्यांनी त्यांची कामे तर दिलीच पण त्यांच्या परिचितांकडे माझ्या नावाची शिफारस सुद्धा केली. आज ती मंडळी हयात नाहीत; पण आजन्म मी त्यांचा ऋणी राहीन. त्यांनी केवळ कामाची नाही तर विश्वासाची ही भावना दिली. १९८४ मध्ये भारतात बाबरी मस्जीद प्रकरण झाले. येथील काही लोकांनी त्याचे भांडवल करून काही काळ आमच्याविरुद्ध द्वेष पसरविण्याचे प्रयत्न केले. पण त्या काळातही ही मंडळी खंबीरपणे पाठीशी उभी राहिली. विश्वास दिला. दिलासा दिला.

ह्या वाटचालीत एक गोष्ट मनावर ठसली व ती म्हणजे तुमचे समाधानी Clients च पुढील यशाचे शिल्पकार व उत्तम जाहिरातदार असतात. त्यांच्याशी वागताना अगदी नम्रपणे वागायचे. पण अपमान पण सहन करायचा नाही. कोणाचे अयोग्य वर्तनही ऐकायचे नाही. त्यामुळे तुम्ही सबल आहात ह्याची त्यांनाही जाणीव होते. शेवटी दुर्बल व्यक्तीपेक्षा सबल संपर्कच सर्वांना आवडतो. पण सबल व उर्मट यांच्यामध्ये जी पुसट सीमारेषा आहे ती ओलांडायची नाही. आपल्या सर्व Clients ना यथाशक्ती उत्तम सेवा द्यायची. गुणवत्तेत नेहमी सुधारणा करत राहायची, जाणारे प्रत्येक वर्ष हे अधिक काहीतरी देऊन गेले पाहिजे. कारण समाधानी Clients हाच पुढील यशाचा पाया आहे.

या तत्त्वावर मार्गक्रमण करताना ३२ वर्षांचा काळ लोटला आहे. स्वव्यवसाय चालू करताना फक्त २ इंजिनीअर होते. आज ह्या रोपट्याचा वटवृक्ष झाला आहे. त्याच्या काही पारंब्या जमिनीतही रुजल्या आहेत.

व्यवसायाच्या दीर्घ प्रवासात काही प्रवासी आले, काही वाटेत उतरून गेले, काही नवीन आले. पण परमेश्वर कृपेने, दुबईत कितीही चढउतार आले तरी मला कोणालाही काम वरून काढावे लागले नाही किंवा त्यांचे मासिक वेतन ठरावीक दिवशी देण्यामध्ये कधी कुचराई झाली नाही. माझे ऑफिस हे माझे कुटुंब आहे. ही माझी भावना आहे. १९९० मध्ये जेव्हा इराक-कुवेतचे युद्ध चालू झाले तेव्हा दुबईतून लोक भारतात परत जात होते. आम्हालाही घरून सारखे सर्वजण सांगत होते की, तुम्ही परत या. माझे उत्तर एकच होते, ज्या दिवशी माझ्या ऑफिसचा शेवटचा staff मेंबर परत जायला विमानात बसेल, त्यानंतर last माणूस मी असेन दुबई सोडायला! कारण office हे माझे कुटुंब आहे व त्यांच्या सुरक्षिततेची नैतिक जबाबदारी माझी आहे.

ह्याच भावनेने वेळोवेळी त्यांच्या सुखदुःखात सहाय्य केले आहे. आजचा माझा व्यवसाय यशस्वी करण्यात माझ्या staff चा मोठा वाटा आहे असे मला मनापासून वाटते. समाधानी साथिदार हेच यशाचे गमक आहे. तुमचा staff व clients यांच्या शुभेच्छाच यशाची नवीन शिखरे गाठण्याचे बळ तुम्हाला देतात!

दुबईला Pearl of Gulf म्हणायचे. पण आता दुबई सुवर्णनगरी झाली आहे. येथे लक्ष्मीचा वास आहे. जगात घडणाऱ्या सर्व घटनांचा फायदा दुबईला होतो. येथील सुरक्षितता, स्वच्छता व स्वातंत्र्य या गोष्टी जगात कोठेच मिळणार नाहीत. आज कष्ट करणाऱ्या माणसास आकाशापर्यंत भरारी घेण्याच्या संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता दुबईत आहे. म्हणूनच मला असे वाटते की, दुबई ही स्वप्ननगरी नसून 'स्वप्नपूर्ती नगरी आहे' व म्हणूनच....चला रे दुबईला....!

# OM PK TRADING

## *Dubai- til Marathi Chav!*

**Kubal Masale & Pickles**
**Panshikar Namkeen**
**Gauri Ajis**
**Konkun Products**
**Diet Items**
**Instant foods**
**Pooja Samagri**

**Chitale Bandhu**
**Kepra Masale & Pickles**
**Sohum Products**
**Sakar Products**

**OMPK Special Atta!**

**Diwali Faral from Panshikar & Chitale!**

**Paithani Sarees, Silk Materials, Stoles, Kurtis, gowns, artificial jewellery**

**Decorative items and much more!**

**Catering services are also available!**

**Made with cholesterol free - single use of oil**

**For further Details please visit our shop or contact us @**

Website| ompk.biz
Shop # | 04 3576696
ompktrading@gmail.com

**Sanjivani Patil**
**| Managing Director, OMPK|**
**050 - 6551367**

GAURI AJI'S KITCHEN

# वाटचाल....अर्धशतकाची!

**ज्यावेळी जगाला दुबईचे नाव अपरिचित होते, दुबई कोणाच्या खिजगणतीतही नव्हती, अशावेळी म्हणजे १९६२ मध्ये बाळासाहेब (श्रीपाद) गोखल्यांनी दुबईत पहिले पाऊल टाकले. त्यांच्या लेखातील, अर्धशतकाच्या वाटचालीत त्यांना आलेले अनुभव वाचताना आपणही ६०-७०च्या काळात जाऊन पोहोचतो. दररोजच्या व्यवहारात आपण एवढे अरबी शब्द वापरत असतो, पण आपल्याला याची जाणिवही नसते की, हा शब्द 'अरबी' आहे. अरबी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व खरोखरच वाखाणण्याजोगे आहे!**

**माझे नाव** श्रीपाद गोखले. १९६२ साली मी इंजिनीअर झालो व त्यानंतर ७-८ महिन्यात दुबईला आलो. ग.दि. माडगुळकरांच्या गीतातले 'जो आला तो रमला' हे शब्द दुबईच्या बाबतीत यथार्थ ठरतात. येथे ५० हून अधिक वर्षे राहिल्यानंतरही अजून माझा पाय U.A.E. मधून निघत नाही. आज दुबई हे एक अत्याधुनिक आणि अद्ययावत सुखसोयींनी परिपूर्ण असे शहर आहे व त्याची कल्पना सर्वांना आहे. परंतु मी ह्या देशात आलो त्यावेळी येथे काय परिस्थिती होती याची कल्पना फारच थोड्यांना असेल. त्यामुळे माझ्या दुबईच्या प्रथमदर्शनी अनुभवांचे वर्णन जरा विस्तारपूर्वक करतो.

ह्या भूतलावर दुबई नामक नगरी वसत आहे ह्याची मला सुतराम कल्पना नव्हती. एका अद्‌भुत योगायोगामुळे माझी व दुबईची गाठ पडली. मुंबईच्या एका रुग्णालयात मी काविळीच्या विकाराने बिछान्याला खिळून होतो. जमेल तेव्हा घरून जेवणाचा डबा येत असे. एकदा डबा फस्त केल्यावर सहज त्याच्यावर गुंडाळलेल्या जुन्या दैनिकाच्या वेष्टनावर नजर गेली. त्यात दुबईसाठी इंजिनिअरच्या नोकरीची जाहिरात होती. परिचारिकेकडून एक पोस्टकार्ड मागविले व त्यावर अर्जी भरली. पत्ता अर्थातच घरचा दिला होता व त्यात मुलाखतीसाठी पंधरा दिवसांची मुदत मागितली होती. आश्चर्य म्हणजे माझी विनंती मान्य करण्यात आली. लटपटत्या पायांनी मी मुलाखतीसाठी गेलो. पण माझी निवड झाली. मला उपलब्ध असलेल्या सर्व नकाशात दुबई शहर शोधशोध शोधले पण सापडेना! शेवटी एका सिंधी गृहस्थांनी माहिती पुरवली की, नकाशात शारजा नावाचे जे शहर दाखवले आहे त्याच्या जवळपास दुबई हे गाव आहे. १३ ऑगस्ट १९६२ रोजी मुंबई ते बाहरीन हा प्रवास एअर इंडियाच्या मोठ्या विमानाने व त्यानंतर शारजाचा प्रवास एका छोट्या थरकापणाऱ्या विमानाने करून मी सायंकाळी शारजाला पोहोचलो. तिथून दुबईला मालकाकडे फोन केला. 'नाऽम' अशी पृच्छा आली. 'गोखले' असे उत्तर



श्रीपाद गोखले
gokhale@emirates.net.ae

दिल्यावर पुन्हा 'नाऽम नाऽम'. परत गोखले-गोखले! मला कल्पना नव्हती की नाऽम म्हणजे नाव नसून अरबी भाषेतील 'हॅलो' आहे. शेवटी हा गुंता सुटला व एका अरबी चालकासह जीपने दुबईला कूच केले. क्षितिजावर भला मोठा वाटोळा चंद्र काहीसा विलक्षण दिसत होता. मी कौतुकाने तो चालकाला दाखवला. अत्यंत मिस्किलपणे त्याने हिंदुस्थानात हा नमूना (चंद्र) नसतो का असे विचारून माझा पचका केला. हा माझा तेव्हाचा सारथी आज एका मोठ्या उद्योगसमूहाचा मालक आहे!

अशातऱ्हेने माझा दुबईत प्रवेश झाला. माझी राहण्याची सोय डेरामधील एकमेव कादर हॉटेलमध्ये केली होती. तिथला गलिच्छपणा व ढेकणांचा सुळसुळाट पाहून तिथे राहायला मी नकार दिला. माझ्यासाठी पहिल्या मजल्यावरील एक फ्लॅट भाड्याने घेतला होता, पण तिथे वीज आलेली नव्हती. तरीही तिथेच राहायचे मी ठरविले कारण भूगोलात मी असे वाचल्याचे आठवले की, वाळवंटात रात्रीच्या वेळी हवा थंड होते. प्रत्यक्षात मात्र काँक्रिटच्या भयानक तापलेल्या भिंती आणि छतांमधून उष्णतेच्या जोरदार झळा रात्री येऊ लागल्या. दमट हवेत कसलीही हालचाल नव्हती. झोपणे केवळ अशक्य होते. डोके हातात धरून मी बसलो होतो.

'अनुदिन अनुतापे तापलो रामराया' ह्या धर्तीवर मी दुबईला का आलो आणि आता इथे जगू कसा शकणार, ह्या प्रश्नांनी डोक्यात थैमान घातले होते. अशा सुन्न अवस्थेत कित्येक तास गेल्यावर शेजारच्या बिल्डिंगच्या छतावर काही मलबारी निजलेले पाहिले. तिथे जाऊन पथारी पसरली व खूप वेळाने तासभर झोप कशीबशी मिळाली.

दुसऱ्या दिवशी मालकाला भेटून त्यांचे बांधकामाचे प्रकल्प आणि एकूण कार्यपद्धती समजून घेतली. त्यातून असा साक्षात्कार झाला की, त्याच्या भावी इमारतींसाठी आर्किटेक्ट, ड्राफ्टस्‌मन, स्ट्रक्चरल इंजिनीअर, सर्विसेस इंजिनीअर, क्वालीटि सर्वेअर, साइट इंजिनीअर, पर्चेसर, साइट सर्वेअर अशा कामांमध्ये येथे काही भेदभाव नसून ही सर्व कामे मलाच करावी लागणार आहेत. इंजिनीअर हा असा अष्टपैलू असला पाहिजे हे गृहीतच धरले होते. B.E. झाल्यावर माझ्या गाठीला जेमतेम सहा महिन्यांच्या अनुभवाची शिदोरी होती. तिच्यावर हा गाडा मला हाकायचा होता. असा गाडा हाकतांना काही प्रमाणात चुका अटळ होत्या. परंतु सुदैवाने त्या कुणाच्या फारशा लक्षात आल्या नाहीत. कुरकुर करायला वाव नव्हता. दुबईला आलेला मी पहिला भारतीय पदवीधर इंजिनीअर. त्यामुळे दुसऱ्या कोणाचे उदाहरण देऊ शकत नव्हते.

आल्याआल्याच कामावर काही मजेदार अनुभव आले. पातळी दर्शविणारी दुर्बीण तिच्या तिकाटण्यावर उभी केली की, आसमंतातला प्रत्येकजण 'जरा बघू' म्हणत त्यातून डोकावून जात असे. दुबईतली पहिली गगनचुंबी (पाच मजली) इमारत मी बांधली. स्लॅबखालील लाकडाचे टेकू काढायच्यावेळी बरीच गर्दी जमायची. हे टेकू काढल्यावर स्लॅब जर कोसळली तर ती गंमत बघायची संधी त्या लोकांना गमवायची नव्हती. सुदैवाने तसे काही झाले नाही.

दुबईला आलो तेव्हा मला ड्रायव्हींग येत नव्हते. त्यामुळे मला साइटवर पायीपायीच २ किलोमीटर जावे लागे. ऐन उन्हाळ्याचे दिवस. एकदा कामावर पोहोचल्यावर एव्हढी तहान लागली की, कितीही पाणी प्यायलो तरी ती भागेना. जिवाची घालमेल होत होती. कदाचित हा उष्माघात असावा. अखेर एका अरबी माणसाने सुलेमानी (लाल) चहा पाजला. त्या गरम पेयाने जीव थंड झाला.

त्यावेळी पक्के रस्ते अजिबातच नव्हते. सबखा नावाची माती रस्त्यावर टाकली जायची व त्यामुळे कठीण असे कवच बनत असे. परंतु त्यावर पावसाचे किंवा दंवाचे पाणी पडले की हा सबखा लोण्यासारखा मऊ होई व गाड्या त्यांत रुतत असत. एखादी गाडी रुतली की तिला आजूबाजूच्या सर्व लोकांनी धक्का मारलाच पाहिजे असा अलिखित संकेत होता. त्यामुळे गाडीची चाके रुतली तर ती हक्काच्या भावनेने मोकळी करून घेतली जात. आभार मानणे, पैसे देऊ करणे असला औपचारिकपणा नव्हता. मनोरंजनाच्या साधनांचा अभाव व मालकाला खूष ठेवणे हे ध्येय ह्यांच्यामुळे दर शुक्रवारी मुसाफी येथे जाऊन मालकाचा बंगला बांधायचे काम मी राजिखुशीने अंगावर घेतले. कधी भुसभुशीत वाळू तर कधी दगडधोंडे व खाचखळगे यांनी भरलेली वादी यामुळे मुसाफीच्या प्रवासात शरीराला संपूर्ण मालिश होऊन सांधे मोकळे होत असत. एकदा तर आमची गाडी मोजून सहा वेळा पंक्चर झाली. सकाळी निघालेली आमची पालखी कशीबशी संध्याकाळी पंढरीला पोहोचली.

त्याकाळच्या दुबईतील सुबत्ता काय वर्णावी! ज्या थोड्या भाज्या मिळत त्या तीन-चार आठवड्याच्या शिळ्या असत. भारतात पावसाळा आल्यावर बोटी बंद होत. त्या तीन-चार महिन्यांत फक्त हवाबंद डब्यातल्याच भाज्यांवर गुजराण


करावी लागे. ह्या डब्यांवर कसलीही तारीख नसल्यामुळे ते किती महिन्यांचे किंवा वर्षांचे जुने असतील हे सांगता येणे कठीण. ह्या शंकेमुळे ते वापरताना धाकधूक वाटे. दुधाचा एकमेव पदार्थ म्हणजे आटविलेल्या दुधाचे रेनबोचे डबे. खाण्यापिण्याच्या चैनीची परमावधी म्हणजे जशनमलच्या खोपटीवजा दुकानात अइसक्रीम खाऊन जीवाची दुबई करणे! बहुतेक भारतीय बरदुबईला राहात व बरदुबईला जायचा एकमेव मार्ग म्हणजे 'वल्हव रे नाखवा' ह्या पद्धतीचा. एका सिंधी गृहस्थाने घरात गाय पाळली होती. मोठ्या कौतुकाने त्याने मला प्यालाभर दूध दिले. नाक मुठीत धरून ते प्यावे लागले, कारण त्याला माशाचा तीव्र वास येत होता. गवत नसल्यामुळे गायीच्या आंबोणात माशाची भुकटी घालून हे non-veg दुध बनत असे.

बाहेरच्या जगाशी संपर्क हा मेघदूतातल्या यक्षाला लाजवील एवढा दुरापास्त होता. भारतात पाठविलेल्या पत्राचे उत्तर यायला दीड ते दोन महिने लागत. पावसाळ्यात तर पत्रव्यवहार संपूर्ण बंद. त्यावेळी पैसे हवाल्याने सर्रास पाठविले जात. त्यामुळे पत्रांमध्ये 'चाल हातरुमाल पाठवीत आहे', 'दोन शर्ट मिळाले' असला पारदर्शक सांकेतिक मजकूर असे. भारतात फोन बुक केल्यावर ४-५ तासानंतर केव्हातरी लाइन मिळाली तर नशीब. सुदैवाने फोन ही फक्त आणिबाणीच्या वेळीच वापरण्याची सोय आहे ह्यासंबंधी एकमत होते. त्यामुळे परदेशी फोन करायची गरज भासत नसे. वर्तमानपत्रे अजिबातच नव्हती. करमणुकीचे मुख्य साधन म्हणजे a.m. रेडिओ. खरखर आवाज सहन करत बातम्या व गाणी जेमतेम ऐकायला येत. दुबईला एकमेव सिनेमा माझ्या घरासमोर होता. माझ्या गॅलरीमधून पडद्यावरील दृश्य दिसायचे, पण आवाज अस्पष्ट येई. कुठलीही जुनीपुराणी फिल्म - इंग्रजी, हिंदी, अरबी, इराणी, उर्दू - दाखवली जाई. एकदा अनवधानाने शिवाजीची फिल्म दाखवली व बरेच प्रेक्षक प्रक्षुब्ध झाले. दर शुक्रवारी सकाळी दुबईचे संपूर्ण पोलीस दल - म्हणजे सुमारे ४०-५० लोक गोऱ्या अधिकाऱ्यांसह बँडच्या तालावर लेफ्टराइट करीत मकतूम रुग्णालयापासून अलनासर मैदानापर्यंत येत. ते दृश्य फारच मनोरंजक असे.

माझ्या जिवावर बेतलेला एक प्रसंग आठवतो. धाऊ (बोटी)तून समुद्रात मोती वेचण्याच्या क्षेत्रात एक सहल आयोजित केलेली होती. आजचे दुबईमधील बहुतेक अब्जाधीश त्या बोटीवर होते. सुमारे तीन तासांच्या प्रवासानंतर अरबी आखातात बोट थांबली. सर्वजण पाण्यात उतरले. काहीजण बुड्या मारून शिंपले काढत होते. तीन-चार तास तिथेच मुक्काम असणार असे ऐकले. मला पोहोण्याचे वेड असल्यामुळे ही सुवर्णसंधी मिळाली होती. मी बोटीपासून दूर एक तासभर पोहत गेलो व आता परत फिरावे असे ठरवले. पाहतो तो कुठेही दृष्टिपथात बोट नाही. पाण्यात असतानाही माझे पाणीपाणी झाले. मागाहून कळले की, त्या मंडळींना तेथे कंटाळा येऊन दुसऱ्या एका मोतीशेतात जायचे ठरले. तासभर बोट गेल्यावर मालकाच्या मुलाच्या ध्यानात आले की, बोटीवर मी नाही. बोट परत फिरवून त्यांनी खूप शोधाशोध केली, पण खुल्या समुद्रात असा शोध करणे कठीण. माझ्या सुदैवाने कित्येक तासानंतर बोटीच्या पाकिस्तानी नावाड्याला मी दुर्बिणीतून क्षितिजावर दिसलो. नाहीतर हा लेख आपल्या वाचनात आला नसता!

त्यावेळी U.A.E. नसून Trucial States होते. सत्ता उघडपणे ब्रिटिश लोकांच्या हातात असून 'हम करेसो कायदा' ही त्यांची वृत्ती होती. भारतीय इंजिनीअर म्हणजे नगण्य असे त्यांच्या इंजिनिअर्सच्या वागण्यात दिसून येत असे. हा न्यूनगंड मला डाचत असे.

त्यामुळे परिश्रमपूर्वक मी इंग्लंडमधील M.I.C.E. आणि M.I.Struct.E. ह्या परीक्षा उत्तीर्ण केल्या व त्यांच्यापेक्षा काकणभर सरस अशी गुणवत्ता मिळवली. त्यानंतर मात्र त्यांचा



दृष्टिकोन बदलला.

मालकाबरोबर वेगवेगळे शेख आणि इतर बडी धेंडे ह्यांच्याकडे जाण्याचे प्रसंग - 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' या न्यायाने वारंवार यायचे. त्यांचे संभाषण तासन्तास अरबी भाषेत चालू असे व मी त्यात सहभागी होऊ शकत नव्हतो. त्यामुळे अरबी भाषा शिकायचीच असा मी निश्चय केला व त्यासाठी भरपूर परिश्रम घेतले. मला अरबी भाषा लिहिता, वाचता व बोलता येते.

अरबी भाषेसंबंधी थोडेसे विवेचन करतो. अरबी भाषा ही मराठी-हिंदीसारखी इंडो-युरोपीय भाषा नसून ती हिब्रूप्रमाणे सेमिटिक भाषा आहे. त्यामुळे अरबी भाषेचे व्याकरण व शब्दरचना मराठीहून खूप वेगळ्या आहेत. अरबी भाषेचा उगम वेगळा असल्यामुळे बरीच अरबी मुळाक्षरे व त्यांचे उच्चार आपल्या भाषांत आढळत नाहीत. मराठीत बाराखडी अर्थात बारा स्वरांची असते. अरबी भाषेतल्या बाराखडीत - उदाहरणार्थ कच्या बाराखडीत के, को व कः हे उच्चारच नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे बाराखडीऐवजी नवखडी असते. ह्या सर्व भाषेत प आणि ग ही मुळाक्षरे अजिबात नाहीत. तसेच ट, ठ, ड, ढ, ण ही कठोर व्यंजने नाहीत, आणि जोडाक्षरे नाहीत. त्यामुळे हातोड्याचा आवाज ज्याचे वर्णन आपण 'ठकठक' असे करतो तेच वर्णन अरबी माणूस 'ताख्खताख्ख' असे करेल. Prescott असे इंग्रजी माणसाचे नाव अरबीत उच्चारायचे असेल तर त्याची 'बरीसकूत' इतकी दुर्दशा होते.

आणखी एक अजब प्रथा अशी आहे की, अरबी भाषेत फक्त प्राथमिक शाळांतील पुस्तके वगळता बाकी सर्व लिखाणात सर्व ऱ्हस्व स्वर वगळण्याचा म्हणजे न लिहिण्याचा रिवाज आहे. त्यामुळे अरबीत कोठलाही शब्द वाचण्यासाठी तो आधी 'गेलेला' असला पाहिजे. उदाहरणार्थ, समजा इजिप्तमधील एका गावात एक अरबी माणूस राहात आहे. त्याला अरबी भाषा उत्तम प्रकारे लिहिता वाचता येत आहे. परंतु त्याने जर आपल्या आयुष्यात दुबई हे नाव कधी ऐकलेले नसेल, तर दुबई असे लिहिलेली पाटी त्याला वाचता येणार नाही. कारण सर्व ऱ्हस्व स्वर न दाखविल्यामुळे तो लिहिलेला शब्द दबई, दिबई, दबी, दिबी, दुबी व दुबई यांच्यापैकी नेमका कोणता हे त्याला समजणार नाही. या उलट आपल्या देवनागरी लिपित लिहिलेला मजकूर अर्थ समजत नसतानाही धडाधड वाचता येईल.

अरबी भाषा ही फारसी, उर्दू ह्याच्याप्रमाणेच उजवीकडून डावीकडे लिहिली जाते. पण विस्मयाची गोष्ट म्हणजे, अरबीत संख्या मात्र डावीकडून उजवीकडे लिहिल्या जातात. माझ्या मते शून्य आणि दशांक पद्धती हे भारतातले शोध जेव्हा अरब देशात पोहोचले, तेव्हा ते त्यांना इतके धक्कादायक वाटले असावेत की, लिपीनुसार फेरफार न करता ते त्यांनी जसेच्यातसे उचलले असावेत.

वरील विवेचनावरून अशी समजूत होईल की, मराठी माणसाला अरबी शिकणे अवघड आहे. परंतु जमेची बाजू अशी की, हजारो अरबी शब्द आपल्या रोजच्या व्यवहारात आपण सर्रास वापरतो व त्याची जाणीव सुद्धा आपल्याला नसते. उदाहरणादाखल काहीशब्द येथे नमूद करतो. अव्वल, अखेर, अस्सल, अननस, अफलातून, अर्ज, अर्क, अल्कोहोल, अल्जिब्रा, अत्तर, अजब, इब्लीस, इशारा, इज्जत, इसम, इरादा, ऊद, उस्ताद, किरमिजी, किंमत, कर्ज, किमया, करार, कायदाकानून, किल्ला, कुव्वत, कसाब, खंदक, खास, खुलासा, खरीफ, खराब, तबक, तारीफ, तालीम, तफावत, ताजा, ताकद, दफ्तर, दवा, दौलत, दर्जा, दावा, दलाल, नौबत, नक्कल, नियत, नाखुदा, नुकसान, नफा, फक्त, फत्ते, फुरसत, फायदा, फरक, फरार, बुरुज, बुरणुस, बदल, मयत, महसूल, मसूदा, मालक, मोहीम, मोसम, मोका, मुबादला, रब्बी, वाली, वजन, वसूल, वकील, वायदा, शर्त, सबब, सराफ, सनद, सफर, सदरहू, सवलत, सदरा, हुकूम, हद्द, हवा, हमाल, हक्क, हुकूमत, हिंमत, हलवा, हालहवाल, हरकत इत्यादी इत्यादी.

ह्या देशात आलेल्या मराठी लोकांची मजल दोन-चार अरबी शब्द आणि एक-दोन मोडकीतोडकी वाक्ये यांच्यापलीकडे सहसा जात नाही. याउलट पाश्चिमात्य लोक परिश्रमपूर्वक अरबी भाषा शिकतात. ह्या देशात राज्यकारभाराची भाषा अरबी आहे. अनेक प्रकारचे फॉर्म अरबीत असतात व अरबी येत नसल्याने अनेकदा त्यांना आंधळेपणे सही करावी लागते. तसेच अरबी भाषा अवगत झाल्यामुळे अनेक बंद दरवाजे कधीकधी उघडू शकतात. यामुळे मराठी लोकांनी फावल्या वेळात अरबी शिकायचा प्रयत्न करावा असे आवाहन करावेसे मला वाटते. दुबईत काही वर्षांपूर्वी झालेल्या विश्व मराठी साहित्य संमेलनात 'मराठी व अरबी भाषांचे ऋणानुबंध' ह्या विषयावर माझे भाषण झाले होते. काही उत्साही मंडळींनी ते U-Tube वर टाकले आहे. जिज्ञासूंनी ते अवश्य ऐकावे.

या देशात दीर्घकाळ राहिल्यामुळे अरबी लोक व त्यांची

स्वभाववैशिष्टे यांचे जवळून निरिक्षण करण्याची संधी मला मिळाली. Tale of Two Cities ह्या पुस्तकाच्या सुरुवातीच्या परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे जगातले सर्वच लोक बहुतांशी सारखेच असतात. तरीही अरबी लोकांची काही स्वभाववैशिष्टे समोर येतात. जगाच्या पाठीवर कोठेही दोन अरब भेटले, तर त्यांना दुसऱ्या अनेक भाषा उत्तम अवगत असल्या तरी ते हमखास फक्त अरबीतच बोलतील. आपल्याप्रमाणे अधूनमधून इंग्रजी वाक्ये ते पेरीत नाहीत. जुन्या पिढीतल्या अरबी नागरिकांमध्ये सायंकाळी उघड्या लाकडी बाकांवर बसून गप्पा हाणणे हा अतिशय आवडता उपक्रम होता व अजूनही आहे. एकेकाळी समुद्रकिनाऱ्यावर खजुरीच्या झापांच्या झोपड्यात संपूर्ण उन्हाळा काढणारे हे लोक आता प्रचंड ऐषआरामांत राहतात. परंतु भात, मासे व खजूर एवढ्या तीनच पदार्थांवर वर्षानुवर्षे काढलेले दिवस अजूनही जुन्या पिढीच्या स्मरणात आहेत. त्यामुळे त्यांच्यात साधेपणा व निगर्वीपणा अजूनही टिकून आहे. एखादा कनिष्ठ कर्मचारी त्यांच्या बैठकीत येऊन 'सलामआलेकूम' म्हणाला तर सर्व वजनदार वक्तीही उभे राहून त्याचे अभिवादन स्वीकारतात. त्यांच्या मेजवानीला तुम्ही हजर राहिलात तर त्यांनी उष्ट्या हाताने मोठ्या आग्रहाने पुढे केलेला घास तुम्ही नाकारू शकत नाही. त्यांची बिनदुधाची व बिनसाखरेची काहवा देखील उष्ट्या कपांमधून दिली जाते व तुम्ही कप हलवून नकार दर्शविल्याशिवाय ती तुमच्या कपात वारंवार ओतली जाते. त्यांच्या लग्नात स्त्रिया व पुरुष यांचे समारंभ संपूर्णपणे विभक्त असतात. स्त्रियांच्या समारंभात नवरामुलगा ह्या एकाच पुरुषाला प्रवेश असतो. जवळच्या नातेवाईकांत, विशेषतः चुलत भावंडांत लग्ने होत असल्यामुळे आनुवांशिक रोग व विकृती ह्या लोकांत जास्त प्रमाणांत आढळतात. उदाहरणार्थ, ह्या देशातील मूळच्या नागरिकांपैकी ३२ टक्के लोकांना मधुमेह आहे.

ह्यातील बऱ्याच प्रथा आता इतिहासजमा होत आहेत. नव्या पिढीतले लोक, त्यांचे राहणीमान व मूल्ये झपाट्याने बदलत आहेत. अगदी थोड्या अवधीत एका मागासलेल्या देशाचे एका अत्याधुनिक देशात झालेले विलक्षण परिवर्तन अनुभवल्यानंतरही येथील मूळचे लोक गडबडून किंवा डगम गून न जाता हे सर्व बदल अंगवळणी पाडून खंबीरपणे उभे राहिले ह्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

योगायोगाने का होईना परंतु मला ह्या देशात पाठविल्याबद्दल मी परमेश्वराचा ऋणी आहे. मध्यपूर्वेमध्ये सुरक्षित व सुखावह असा हा एकच देश आहे. येथे राहिल्यामुळे मला जगभर अनेक वेळा फिरता आले व अनेक प्रेक्षणीय व इतिहासप्रसिद्ध जागा पाहता व अनुभवता आल्या. अनेक देशांचे नानाविध लोक भेटले. बांधकाम व उद्योग ह्या क्षेत्रात सुमारे २५ वर्षे काम केल्यानंतर गेली २५ वर्षे मी एका हॉस्पिटल समुदायाच्या व्यवस्थापनेचे काम करीत आहे. हा दिशाबदल अनेकांना अजब वाटतो. ह्या प्रदीर्घ काळात नानाविध लोक भेटले व बहुतांशी बरे व थोड्या प्रमाणात वाईट असे अनुभव आले. ज्या मालकासाठी हाडाची काडे करून काम केले होते त्यानेच मला त्रास देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ह्या अन्यायाचा कडाडून प्रतिकार करण्याचा मी निर्णय घेतला व सुदैवाने त्यात यशस्वी झालो. हा माझा निकराचा प्रयत्न अयशस्वी ठरला असता, तर केव्हाच मला चंबूगबाळे आटोपून देश सोडावा लागला असता. ह्या देशातच माझ्या मुलांची शिक्षणे झाली व मी त्यांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवू शकलो. माझ्या कितीतरी नंतर दुबईत आलेल्या लोकांनी उद्योगधंदे उभे केले व त्यांच्यात प्रचंड यश मिळवले. Hats off to them! परंतु ह्या देशाने मला जे दिले त्याबद्दल मी संतुष्ट आणि कृतज्ञ आहे.

'यथा काष्ठंच काष्ठंच' या न्यायाने अनेक लोकं U.A.E.त एकत्र येतात व आपला आखलेला कार्यभाग साध्य झाल्यावर वेगवेगळ्या दिशांना पांगतात. थोडी अधिक खोलवर मुळे रुजविलेले माझ्यासारखे इतरही काही महाराष्ट्रीय आहेत. कधीतरी कोणीतरी एक खोडसाळ प्रश्न मला फार साळसूदपणे विचारतो, "पण तुम्ही मुळांत दुबईला आलातच का?" "ज्या कारणासाठी तुम्ही आलात त्याच कारणासाठी" असे जिभेवर आलेले परखड उत्तर मी पडजिभेकडे ढकलतो व त्याला सांगतो, "कारण त्याकाळी प्रदूषण नव्हते. रस्त्यांत गाड्यांची आजसारखी खेचाखेच गर्दी नव्हती. उघड्या गाडीत सामान राहिले तरी त्याची चोरी होत नसे. माणूस तेव्हा माणसाला पारखा झाला नव्हता. गप्पा मारायला, वाचन करायला भरपूर वाव होता. लांबलचक हस्तलिखीत पत्रांची देवाणघेवाण नियमित होत असे. आदरातिथ्य करण्याची साधने कमी असली तरी अगत्य अधिक असे. निसर्गाच्या अधिक सान्निध्यात आम्ही राहात होतो. स्पर्धा, ताणतणाव यांचा अभाव होता" इत्यादी इत्यादी. अतीव असमाधानाची पावती पृच्छकाच्या चेहऱ्यावर दिसते. आयुष्य हा असा लपंडावाचा खेळ आहे!!




# मेट्रो मोहिमेतला मी एक शिलेदार!....

**''०९-०९-२००९'' दुबईच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला दिवस! दुबईच्या तुऱ्यात आणखी एक मानाचे पीस खोवले गेले! जगातील चालक विरहित मेट्रो दुबईच्या रस्त्यांवरून धावू लागली व दुबईकरांचा ऊर अभिमानाने भरून आला. अशा या जगप्रसिद्ध मेट्रोच्या कामातील एक शिलेदार म्हणजेच अशोक त्र्यंबक काळे! एक भारतीय व सर्वात महत्त्वाचे म्हणजे मराठी माणूस! दुबईतीलच नव्हे तर महाराष्ट्रातील मराठी मनाला अभिमान वाटावा असे हे व्यक्तिमत्त्व!**

दिवसाचे सर्व काम संपवून आम्ही काही मोजकेच अभियंते नेहमीच्या कार्यालयातील शेजारच्या इमारतीत ११ व्या मजल्यावर स्वतःशीच विचारमंथन करत बसलो होतो. एका नवीन प्रोजेक्टची संकल्पना शिजत होती असं फक्त ऐकिवात होतं. दोन आर्किटेक्ट्स, दोन टाऊन प्लॅनर्स, दोन-तीन सिव्हिल इंजिनीअर्स, मी एकटा इलेक्ट्रीकल इंजिनीअर आणि आमचे डायरेक्टर, असा छोटासाच संच जमला होता. सर्वजण उत्सुकतेने वाट पहात होते की, डायरेक्टर साहेबांनी आपल्या भरभक्कम आणि नेहमीच्या आत्मविश्वासू आवाजात सर्वांना वेलकम केलं आणि थेट विषयालाच हात घातला.

'सज्जन हो', सर्वांकडे शांतपणे नजर टाकत ते बोलत होते. 'माझ्या प्रिय सज्जन हो, आपण या इमारतीत का जमलोय वगैरे, तुमच्या प्रश्नांची लांबलचक उत्तरे देण्यासाठी आपण एखाद्या विकेंडला माझ्या फार्म हाउसवर जमू तेव्हा बोलूच. पण आता मला एवढंच सांगायचय की, तुम्ही सर्व इथं एक महान



**अशोक त्र्यंबक काळे**
ashokkale43@gmail.com



मोहिमेसाठी जमलेले आहात. आणि मला वाटतं हे सांगायला नकोच की तुम्ही सर्व आपापल्या क्षेत्रातील माझे खास आहात म्हणून तुम्ही इथे उपस्थित आहात.'

चेहेऱ्यावर नेहमीच्यापेक्षा जास्त उत्साह ठेवून आणि एक एक शब्दावर भर देत त्यांनी त्या मोहिमेची नाट्यपूर्ण भांडेफोड केली. 'दुबई ला मेट्रोची आवश्यकता आहे आणि ते प्रोजेक्ट पूर्णत्वाला नेण्यासाठी तुम्हा सर्वांची निवड झाली आहे...' खुर्चीत रेलून बसलेले आम्ही सर्व हे ऐकताच नकळत ताठ झालो आणि अंगातून एक आनंदाची, अभिमानाची आणि जबाबदारीची तीव्र लहर दौडत गेलेली सर्वांच्या चेहेऱ्यावर झळकली.

आणि मग त्या क्षणापासून सुरुवात झाली एका कहाणीची. माझ्या कारकिर्दीतील एक अविस्मरणीय कहाणी. साहेब पुढे बोलतच राहिले. 'इथून पुढे तुम्ही बोलणार आणि मी ऐकणार. मी पण असेनच तुमच्या बरोबर या fishtank मध्ये'. आमचा हा बॉस म्हणजे आमचा मित्र, गुरू, निर्णायक, योग्य तेवढाच बोलणारा असा इफेक्टिव executive, हारवर्डचा गोल्ड मेडलिस्ट. तो बोलत राहिला आणि आम्ही ऐकत राहिलो. 'लवकरच प्रोजेक्ट consultants (सल्लागार) आपल्या आजूबाजूचे ऑफिस काबीज करायला येतील. अर्थातच तुमचा consultant counterpart (सल्लागार सरकारी) तुम्हालाच हेरावा लागणार आहे. एक ध्यानात असूद्या, सर्वांना मुख्य कार्यालयातील आपापली नित्य कामे करावी लागतीलच. आणि ती संपल्यावर मगच आपण सर्व या इमारतीत दुपारनंतर जमणार आहोत. तुमच्या क्षमतेप्रमाणे तुम्हा सर्वांचे योगदान अपेक्षित आहे. गुड लक मंडळी.' साहेबांचे हे शेवटचे वाक्य संपवून आम्ही हस्तांदोलन करून बाहेर पडलो तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. एरवी चारला घरी जाणारे आम्ही समजून चुकलो होतो की, आजपासून नऊला घरी जाण्याची वेळ ही फारच लवकरची ठरणार आहे. उद्यापासून दिवसाला कदाचित जमले तर २५ तासपण असू शकतील.

त्या दिवसापासून प्रत्येक जण उद्योगाला लागला. आमच्या छोट्या ग्रुपला दिवसभर आपापल्या विभागातील दिवसाची कामे संपवून कधी एकदा शेजारच्या इमारतीत पोचतोय

असं होऊ लागलं. तेथून पुढच्या प्रत्येक कार्याला, सुत्राला एक विशिष्ट बंधन, एक विशिष्ट कालमर्यादा होती. पुढे पुढे आमच्या core ग्रुपचा आणि हायर कमिटीचा रोजचा संबंध इतका गहरा होत गेला की, काही निर्णय आम्ही घेतले की त्यावर fishtankमध्ये चर्चेनंतर लगेच शिक्का मोर्तब होऊन त्यावरची प्रक्रिया पण सुरू होऊन जात असे.

आम्ही सरकारी माणसे होतो, पण इथल्या सरकारी कामातली होतो. ढिलेपणा हा आमच्या अंगात कधी शिरलाही नव्हता. कदाचित खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्यांपेक्षा काकणभर सरसच असे आम्ही... तर अशी ही झपाटलेली मंडळी कामाला लागली. आपापल्या कार्यालयातील विभागाची माणसं हेरून आम्ही आमची प्रत्येकाची सहकारी मंडळी निवडली. आमच्या core group मधील supporting team बनली. आपापल्या ग्रुप बरोबर चर्चा, मग core ग्रुपच्या बैठका, त्यानंतर डायरेक्टर बरोबर प्रत्येकाची खास मसलत. दिवसाचे तास खरोखर कमी पडायला लागले. रोज डोक्यातून निघणारी कल्पनांची भेंडोळी ब्लू प्रिंट होऊन कागदावर अवतरू लागली आणि त्यांना पाय नव्हे पंख फुटायला लागले. the project started literaly flying...

ज्या ज्या कल्पना स्थिर होत होत्या त्यांचे लगेच tender drawing मध्ये रूपांतर केव्हा व्हायचे ते कोणाला कळायचेही नाही. निविदा (tender) मागवून कंत्राटदार ठरले आणि कामाची गती, चर्चा आणि कागदाची भेंडोळी इथपर्यंत मर्यादित न राहता प्रत्यक्ष जमिनीवर अवतरायला लागली (आणि हो, जमिनीखालीही. कारण मेट्रो underground पण करायची होती ना!) वातानुकुलीत कार्यालयातील चर्चासत्रांबरोबरच आता साईटवर भेटी आणि बैठका सुरू झाल्या. काही महिन्यांपूर्वीच्या दहा जणांच्या ग्रुपचा आकार आता शेकडो लोकांच्या टीममध्ये बदलला होता.

विद्युतशक्ती विभाग, कम्युनिकेशन, सिग्नलिंग, नियंत्रण केंद्र आणि रेल सिस्टिम्स इत्यादी स्पेशालिस्ट विभाग सोडले तर बाकी सगळं नेहमीचेच पण प्रचंड आकाराचे कार्यभाग वेगाने सुरू झाले. नेहमीच्या रस्त्यांनी थोडे थोडे सामावून घेत मेट्रो कॉन्ट्रॅक्टरला जागा करून दिली. शहरातील बऱ्याच अरुंद रस्त्यांमधून मेट्रोचे काम अशक्य होते, तेथून जमिनीखाली ३० ते ४० मीटर्स खालून बोगदे तयार करण्यात आले. हे बोगदे खणणारे अजस्र यंत्र पण अगदी अद्ययावत होते. ते रोज तीन शिफ्टमध्ये काम करायचे आणि रोज १२ मीटर्स लांबीचा बोगदा तयार स्वरूपात मिळायचा. फक्त त्यामध्ये रूळ अंथरून बाकी केबलिंग करायचे बाकी असायचे. ह्या अजस्र मशीनचे नाव फार मजेशीर होते. 'बुगेशा' म्हणजे माती पोखरणारा मोठा थोरला उंदीर. किती साजेसं नाव होतं ते. ह्या उंदराने केलेली कमाल म्हणजे क्रीकच्या पाण्याखालून तयार केलेला भुयारी मार्ग. पात्राच्या दोन बाजूंकडून पाण्याखालचा भूगर्भ ह्या मशीननी पोखरत आणला. दोन बाजूंनी दोन उंदीर हे पोखरत आले आणि एका दिवशी समारंभपूर्वक दोन बाजूंची भूगर्भाखाली भेट झाली. एक तसुचाही फरक न पडता दोन बाजू येऊन भेटल्या आणि बोगदा तयार झाला. मानवाने निर्माण केलेल्या ह्या अजस्र आणि अफाट तंत्रज्ञानाला आम्ही शतशः दंडवत घातले.

स्टेशन्सचे काम पण अगदी वेगळ्या पद्धतीने चालले होते. एखाद्या लहान मुलाचा खेळायचा मेक्यानो असतो ना तशी वाटणारी स्टेशनं रुळाभोवती बसवली जात होती. सगळं कसं एखाद्या परीकथेप्रमाणे उलगडत आमच्या समोर उभं रहात होतं. जगातील सर्वात लांब ड्रायवररहित मेट्रो होणार होती ना! मग सर्वकाही उच्च दर्जाचेच हवे आणि अनेक प्रकारची expertise ओघानीच आली. त्याचसाठी जगातील सर्वोत्कृष्ट त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी ह्या प्रोजेक्टवर म्हणूनच कार्यरत होती.

अशा धमाकेबाज प्रोजेक्टवर काम करायला मजा येत होती. जोरदार काम चालले होते. कामाचे मैलांचे दगड पार होत होते. काम पूर्ण व्हायचे दिवस जवळ आले म्हणता म्हणता तो दिवस येऊन ठेपला. ९.९.२००९ काय दिवस निवडला होता!!! आमचे दुबईचे राजेसाहेब आज प्रथम कमर्शियल ऑपरेशनचे उद्घाटन करणार होते. आणि ते व्यवस्थित पार पडले.

आम्हा सर्व टीमला खूप खूप काही मिळाले. आपल्या मेहनतीला योग्य फळ हे यशस्वीरित्या पूर्ण झालेल्या आणि सर्व जगात वाखाणलेल्या दुबई मेट्रोरूपाने मिळाले. यातच आम्हा सर्वांना अतीव आनंद आहे.

मला दुबई मेट्रोचा आणि त्याच्या उभारणीतील माझ्या खारीच्या वाट्याचा खूप अभिमान आहे. असाच आनंद आम्हाला आपल्या मायभूमीत एखादे प्रोजेक्ट कार्यरत होऊन तिची सेवा करण्यात मिळो, हीच ईश्वरचरणी सदिच्छा आणि प्रार्थना...



# पोटपूजा... अस्सल मराठी

**आज दुबईत अनेक धर्मांचे, जातींचे, भाषेचे, देशाचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. साहजिकच तऱ्हेतऱ्हेचे खाद्यपदार्थ इथे खायला मिळतात. मग त्यात मायेच्या ओलाव्याने बनलेले अतिशय चविष्ट असे आपले मराठी खाद्यपदार्थ कसे काय मागे असतील?**
**दुबईत, मनिषा किचन, पेशवा, सिंधुदुर्ग, बॉम्बे बाईटस्, जिप्सी चाईनिज् अशी अनेक मराठी माणसे चालवत असलेली मराठी उपहारगृहे आहेत. त्यातही हेमंतकुमार झोटिंग यांचे AVON-A1 हे पहिले मराठी रेस्टॉरन्ट होय आणि म्हणूनच हेमंत झोटिंग यांच्या उपहारगृहाची कहाणी त्यांच्याच शब्दात!**




हेमंत झोटिंग
rose16b@hotmail.com


जुलै-ऑगस्ट महिना.... दुबईच्या वाळवंटातील! डोक्यावर तळपणारा सूर्य.... अंगाची काहिली करणारे रणरणते ऊन.... एखादीच येणारी वाऱ्याची झुळुक... पण ती सुद्धा अंग भाजून टाकणारी. बाहेरच्या वातावरणात निसर्गाचे हे रूप! आणि... आणि रेस्टॉरन्टच्या किचनमध्ये पेटलेली भट्टी! छोटेसे किचन, त्यातच सामान, डब्यांच्या रांगा, एका बाजूला गॅस चालू! ए.सी. लावता येत नव्हता, पण पंखा मात्र डोक्यावर गरगर फिरत होता. रेस्टॉरन्टचे कुक... एकजण पुऱ्या लाटत होता, एकजण तळत होता. पुऱ्या डब्यासारख्या फुगत होत्या. आनंदाने नाचत होत्या तेलात. पण पुऱ्या तळणाऱ्या स्वयंपाक्याचा पारा मात्र चढला होता. बाहेरच्या तपमानापेक्षा अधिक! आणि रागाने फुणफुणत अचानक जोराने त्याने झारा खाली ठेवला व मला म्हणाला, 'हमे पुरी बनाना नही आता है। हम काम नही करेंगे। हमारा visa कॅन्सल कर दो। हम वापस जाना चाहते है!'

अक्षरशः पायातील शक्तीच गेली माझ्या... हेमंत लक्ष्मणराव झोटिंग... रेस्टॉरन्टचा मालक भूतकाळात गेला व भरभरून बोलू लागला. अक्षरशः ओसंडून वाहणाऱ्या धबधब्याप्रमाणे...!

त्या कुकला बाबापूता केले, सांगितले अरे तू लक्ष देऊ नकोस. काहीकाही गिऱ्हाईक असतात अशी. त्यांना कळत नाही कसं बोलायचं. ते बोलून जातात. एवढा रागावू नकोस. मनावर घेऊ नकोस. अरे एवढा खर्च केलास visa साठी,

एवढ्यातेवढ्यावरून भारतात परत जायचा विचारसुद्धा मनात आणू नकोस. कुटुंबाला सुखात ठेवायचं आहे ना? संयम ठेव. त्याचा राग शांत झाला. पुन्हा झारा हातात घेऊन तो पुऱ्या तळू लागला. कोणा गिऱ्हाईकाने पुऱ्या खूप लाल तळून काढल्याबद्दल बाहेर बरीच बोंबाबोंब केली होती व म्हणून मी आत जाऊन त्याला सांगितलं व तो एवढा म्हणून चिडला होता...

त्याचक्षणी मनाशी पहिली खूणगाठ बांधली की, काहीही कुणाची तक्रार असली तरी कामाच्या वेळी कुकला, स्टाफला सांगायची नाही. कामे पार पडली की शांतपणे नंतर सांगायची. हॉटेल जर चांगले चालायला हवे असेल तर पहिले तत्त्व हे! व हे तत्त्व पाळत आज २० वर्षे झाली AVON रेस्टॉरन्टला!

१४ जुलै २०१४ मध्ये २० वर्षे झाली. १९९४ मध्ये ॲव्हॉन नावाने रेस्टॉरन्ट सुरू झाले. पण फेमस आहे 'A1' नावाने! हेमंतकुमार लक्ष्मणराव झोटिंग भूतकाळातून बाहेर पडायला तयारच नव्हता. आयुष्यात काहीतरी मिळवल्याचे समाधान त्याच्या तोंडावर होते. आत्मविश्वास बोलण्यात जाणवत होता. मुंबईचा मुलगा मी. बांद्र्याला भाभा हॉस्पिटलसमोर रहात होतो. पाच भावंडे, वडील पोलीस इन्स्पेक्टर. बालपण मजेत चालले होते. माझे काका चंद्रकात झोटिंग त्यावेळी दुबईत आले होते. दुबईच्या इंडियन हायस्कूलमध्ये ते रजिस्ट्रार म्हणून काम करत होते. त्यावेळी सर्वकडे दुबईला जाण्याची लाट आली होती. त्यामुळे माझ्या मनात 'क्रेझ' होतीच. त्यात काकांनी विचारले येतोस का म्हणून! १९८०तील गोष्ट आहे ही. एजंट लोक दुबईला जाणाऱ्यांना कसे फसवतात याबद्दल पेपरमध्ये गोष्टी छापून येत होत्या. दुबईबद्दल अनेक गैरसमज होते. तिथे पाणी मिळत नाही, बायकांना सुरक्षित नाही, एक ना दोन! पण माझे काक तिथे असल्याने ह्या असल्या कथांना मला घाबरण्याचे कारण नव्हते.

काका म्हणजे माझे 'गॉडफादर' आहेत. आज मी, माझे रेस्टॉरन्ट जे काही आहे ते त्यांच्यामुळे आहे. त्यांच्याशिवाय माझे उपहारगृह उभे राहूच शकले नसते.

७ मे १९८० मध्ये व्हिजिट व्हिसावर काकानी मला आणले. काका दिवसभर दोन शिफ्टमध्ये इंडियन हायस्कूलमध्ये काम करायचे व उरलेल्या वेळात ते ट्यूशन्स घ्यायचे. त्याचवेळी केमवर कंपनीचे पर्सनल मॅनेजर भेटले श्री. खरे. त्यांनी टोयोटामध्ये Job दिला. १९८० ते ८४ पर्यंत दुबई शारजा फुजेरा येथील ऑफिसेस मध्ये काम केले. पुढे सर्व ऑफिसेस computerised झाली. ४०० माणसांचा Job गेला. त्यात एक मीही होतो. दोन महिने बेकारी.... पुढे अलफुतेम कंपनीत स्टोअर कीपर, क्लार्क अशा अनेक भूमिका पार पाडल्या. पाकिस्तानी मॅनेजमेंट आली. १९८७ मध्ये पुन्हा काढले. निराश होत होतो. पण काकांची शिकवण होती... आनंदी आशावादी रहायचे व मुख्य म्हणजे घरी मुंबईत कळवायचे नाही. त्यांना कसलीही झळ लागू द्यायची नाही. काळजी करायला लावायची नाही आणि हे तत्त्व पुढील दुबईच्या प्रवासात लक्षात ठेवले, की दुबईत कितीही उलथापालथ झाली तरी त्याची झळ मुंबईत घरी लागता कामा नये.

इरिगेशन कंपनीत नोकरीस असलेल्या कामतांशी ओळख झाली व तिथेच 'अल रहामा' ट्रेडिंग कंपनीत दहा वर्षे काम केले. पण मन रमत नव्हते. स्वतःचे काहीतरी सुरू करायची इच्छा होती. एक तर हॉटेल तरी टाकायचे किंवा परत मुंबईला जायचे विचार येत होते. बिल्डिंग मटेरियल, हार्डवेअर, इलेक्ट्रिकल वर्क या विविध क्षेत्रात खूप माहिती होती; पण मी जेव्हा रेस्टॉरन्ट चालवायचे ठरवले तेव्हा इतर मित्र हसले. अरे, तुला चहासुद्धा करता येत नाही. रेस्टॉरन्ट कसले सुरू करतोस!

पण मनाचा निश्चय झाला. चहाची टपरी तरी नक्कीच चालवता येईल! पहिली तीन वर्षे भरपूर मेहनत घेतली. रेस्टॉरन्ट सुरू करताना वाटलं होतं, काऊन्टरवर उभं राहून फक्त पैसे गोळा करायचे, बाकी सर्व काम स्टाफ करेल! पण कल्पनेपेक्षा सत्य काहीतरी वेगळंच होतं. सकाळी ५ वाजता उठून भाजी आणायची. नंतर सर्व साफसफाई करायची. नाश्ता, लंच, संध्याकाळचा नाश्ता सर्व पदार्थांची तयारी करायची. भाज्या चिरायच्या. काऊंटर सांभाळायचा. ऑर्डर्स् घ्यायच्या. हिशोब ठेवायचा. मालक, नोकर, स्वयंपाकी, साफसफाई करणारा कामगार, सर्व भूमिका पार पाडायच्या. १८-१८ तास duty केली. अंथरुणावर पडलो की हाड न हाड दुखायचे व त्यात दुबईचा उन्हाळा! पण त्या सर्व परिस्थितीला जिद्दीने तोंड दिले. ती जिद्दच हॉटेलचा प्रवास पुढे पुढे करत राहिली व बघता बघता २० वर्षे कधी उलटली ते समजले नाही!


बोलता बोलता मध्येच एखाद्या आठवणीमुळे हेमंतकुमार भावनाविवश होत होते. सकाळी भाजी चिरून झाली की मग कचरा काढणे, चॉपिंग करणे कामे सुरू करायचो. लंडनहून एक वयस्कर व्हिजीटर आले होते. माझा नियम होता हॉटेल बरोबर ८ वाजता सुरू करायचे. एक मिनिट पाठी-पुढे नाही. ते गृहस्थ सात-सव्वासातला यायचे. प्रथम मला



विचारले कधी सुरू करणार? मी सांगितले ८ वाजता. मग म्हणाले, मला आततरी बसू द्याल का? मी नम्रतेने नाही म्हणून सांगितले. दोनचार दिवस हेच नाटक चालू होते. अखेर त्यांनी दुसऱ्या माणसाला विचारले तुमचा मालक कुठे आहे? त्याने माझ्याकडे बोट दाखवले. ते गृहस्थ आश्चर्यचकित झाले. त्यांना कौतुक वाटले व माझ्या पाठीवर वडिलांच्या मायेची कौतुकाची थाप पडली. त्यांनी म्हटले बेटे तुम्हारा रेस्टॉरन्ट अच्छा चलेगा, तुम बहोत आगे जाओगे! तुम्हारी लगन जिद्द ही यश का मार्ग खुला कर रही है। त्यांची ही थाप व कौतुकाचे चार शब्द मी कधीच विसरू शकणार नाही. एवढे मात्र खरे की, या शाबासकीनेच मला उमेद दिली. जिद्द दिली व यशाचा मार्ग खुला केला.

हेमंत म्हणतात, ह्या माझ्या हॉटेल प्रवासातील अनुभवात एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे इथे मालक हा मालक नसतो, तर स्टाफ हा मालक असतो! २० वर्षे जुना स्टाफ आहे. एकत्र कुटुंब होऊन सर्व रहात आहोत. त्यांचे प्रॉब्लेम्स हे माझे प्रॉब्लेम्स आहेत. एखाद्या क्रिकेट टीम प्रमाणे काम चालते आमचे. इथे cook ला सांभाळून घेणे अतिशय जरूरीचे आहे. चार बायकांनी केलेल्या पदार्थाची चव वेगवेगळी असते. तसेच ४ कुक झाले तर टेस्ट ही टेस्ट रहात नाही. तर ट्रायलच चालू राहाते आणि म्हणूनच कुकला सांभाळून प्रेमाने गोड बोलून वळवणे अतिशय महत्त्वाचे आहे. एक नवीन गोष्ट बनवली की दहाजणांना खायला घालतो. घरी बायकोला पाठवतो व नंतरच पदार्थाची 'टेस्ट 'निश्चित होते.

हॉटेल सुरू केल्यानंतर सात महिन्यातच एक कुक निघून गेला. त्यावेळी कामाला माणसे फक्त तीन होती. काय करावे हा मोठा प्रश्न पडला. दुसरा कोणी माणूस visa काढून आणायला वेळ लागणार होता. पण ह्या अवघड परिस्थितीत घरच्यांनी मला आधार दिला. माझे काका, काकू, पत्नी, वहिनी सर्वांनी जबाबदारी घेतली. हॉटेलचे सर्व पदार्थ घरून बनवून येऊ लागले. दिवस-रात्र त्यांनी मेहनत घेतली. एकही दिवस खंड पडू दिला नाही. त्यावेळी आपली... घरची माणसे म्हणजे काय हे समजले. घरची माणसे दोन प्रकारची असतात. जी अडीअडचणीला धावून येतात, आधार देतात ती व जी अशा



वेळीच आपले पाय खेचतात ती. मी अतिशय सुदैवी आहे. म्हणूनच देवाने मला आधार देणारी आपली माणसे दिली व ही जाणीव मला अखेरच्या श्वासापर्यंत राहील!

मी माझे रेस्टॉरन्ट डेरा दुबई येथे गोल्ड सूक मध्ये सुरू केले. माझे काका इथे रहात होते. गुजराथी लोकांच्या तीन पिढ्यांना त्यांनी शिकवले होते. साहजिकच एवढी माणसे जोडली गेली ती माझी कस्टमर झाली. तसेच ह्या भागात होलसेल मार्केट आहे. त्यामुळे गिऱ्हाइके मिळायला त्रास झाला नाही. गेली २० वर्षे माझे उपहारगृह एकाच जागेत आहे व येथील सर्व दुकानदार माझी गिऱ्हाईके आहेत. त्याचबरोबर त्यांच्याकडे माल न्यायला येणारी आजूबाजूच्या देशांमधून आलेली माणसेही माझीच कस्टमर्स झाली आहेत. अरबी, सोमाली, इराणी, लंडन, कॅनडा, अमेरिका, कुवेत, बहारिन!

त्यांना आवडणारे पदार्थ म्हणजे पापडी तिखा, सामोसे व राऊंड राऊंड गरम जिलेबी! अंजिर पाक ही आमची स्पेशालिटी! काजू, बदाम, पिस्ता, अंजिर बर्फी... without sugar हल्लीच्या डाएबिटिक जगात ह्या बर्फीला खूप मागणी आहे. पार्सले घेऊन जगभर लोक जातात... आणि ह्यातून मिळणारा आनंद, समाधान अवर्णनीय आहे.

आज माझ्या उपहारगृहात सकाळचा पदार्थ संध्याकाळी नसतो. सकाळी १२, संध्याकाळी १८ item असतात. उपासाच्या दिवशी साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडा असतो. २४ प्रकारचे फरसाण असते. टोस्टचे वेगवेगळे पदार्थ असतात. वडापाव, पावभाजी तर प्रसिद्धच आहे. वडापाव म्हटल्यावर हेमंतला एक किस्सा आठवला. एक मराठी मुलगा मुंबईहून कामाला आणला होता. तिथे अक्षरशः पाया पडून रडून त्याने नाटक केले. त्याचा visaचा सर्व खर्च स्वतः करून त्याला इकडे आणले. ४ महिने शिकवण्यात गेले व थोडा तयार होताच त्याने रंग दाखवायला सुरूवात केली. एक दिवस थोडे काम जास्त पडले तर रागावून त्याने पावभाजीत खूप मिरची पावडर घातली व गिऱ्हाईकांना दिली. अक्षरशः सर्वांनी रेस्टॉरन्ट डोक्यावर घेतले. नाकातोंडातून पाणी वाहू लागले. साहजिकच अशा प्रकाराने गिऱ्हाईके तुटतात.

रेस्टॉरन्ट बंद करताना त्या मुलाच्या हातात त्याचा पासपोर्ट दिला. स्वतःच्या खर्चाने मुंबईचे तिकीट दिले व त्याला सांगितले तुझा visa कॅन्सल केलाय, परत जा. मग त्याने

पुन्हा रडारड केली. पण एकदा निर्णय घेतला होता. त्यामुळे इतर staff ला पण धाक बसतो. वाईट वाटते ते ह्याचे की गुजराथी, सिंधी, नेपाळी, बिहारी, केरळी सर्व येतात; पडेल ते काम करतात, मेहनतीला मागे नसतात, शिकून घेतात. पण आपली मराठी मुले अंगमेहनतीची तयारी नाही. कोणतेही काम करायला कमीपणा वाटतो. तिथे पाय धरतात व इथे दुबईत आल्यावर आपलेच पाय खेचतात. स्टाफ मिळवणे ही मोठीच कटकट असते. visa चा खर्च, रहाणे, जेवणे, इन्शुरन्स सर्व खर्च करायचा व ४-६ महिन्यात त्यांना करमेनासे होते. कारण काम करायची तयारी नसते. खरंच इतर जातीय लोकांकडून फार गोष्टी शिकण्यासारख्या आहेत व म्हणूनच वर्षानुवर्षे दुबईत मेहनत घेऊन ह्या लोकांनी आपल्या राज्याचे रूप पालटले आहे. 'केरळा' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

हॉटेल स्टाफ मिळवण्याबरोबरच दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे इथे म्युनिसिपालटीचे... बलदीया म्हणतात. ...अरबी भाषेत कडक नियम पाळावे लागतात. त्यांचे वारंवार चेकिंग असते. किचन नेहमी ground floor ला हवे हा हल्ली नियम आहे. माझे जुने लायसन्स आहे. पूर्वी कायदे नव्हते. त्यामुळे माझ्या इथे वर किचन व खाली रेस्टॉरन्ट आहे. स्टाफचा युनिफॉर्म आवश्यक. बूट, डोक्यावर टोपी, हेअर कटिंग ह्याबाबतचे नियम कडक आहेत. तसे नसेल तर मालकाला fine असतो. हॉटेलमध्ये स्वच्छता आवश्यक! एकदा असेच आमच्या रेस्टॉरन्टमध्ये दोन टिशू पडले होते. दुबईला आलेल्या कुणी टूरिस्टने टाकले होते. दुबईत रहाणाऱ्या सर्वांनाच दुबईच्या स्वच्छतेविषयी असलेले कडक कायदे माहीत आहेत. पण टूरिस्टना नसतात. गर्दीची वेळ होती. अचानक म्युनिसिपालटीचे इन्स्पेक्टर चेकिंगला आले. ५०० दरहॅम फाईन झाला. नेहमी प्रथम warning देतात. नंतर दुसऱ्या वेळेस फाईन व नंतर हॉटेल black listed होते व दोन महिने हॉटेलला टाळे! इथे हॉटेलची गटर्स वेगळी असतात. नंतर ती म्युनिसिपालटीच्या गटर्सना जोडली जातात. तेथेही पेस्ट कंट्रोलचे चेकिंग असते. दुबईसारखी स्वच्छता जगात कोठेच बघायला मिळत नाही.

ह्या दुबईनेच सर्व काही दिले. पैसे, मान, यश! आज दुबईत अनेक मराठी रेस्टॉरन्ट निघाली आहेत. पण सर्वात प्रथम मराठी रेस्टॉरन्ट सुरू करून ते यशस्वी केल्याबद्दल Gulf Maharashtra Business Forumच्या वतीने प्रथम पुरस्कार मिळाला. दुबई हीच माझी कर्मभूमी आहे.



जी लोकं आधी मराठी रेस्टॉरन्टवरून हसत होती तीच आज विचारतात- दुसरी शाखा उघड आम्ही भागीदार होतो.

दिवाळीचे दिवस होते. सर्वकडे रोषणाई झगमगाट होता. अक्षरशः मुंबई-पुण्यात दिसणार नाही एवढे lighting इथे असते. दुकानात सुद्धा सर्व वातावरण प्रसन्न होते. दिवाळीचे आठ दिवस रेस्टॉरन्ट बंद असते. फक्त मिठाया व फरसाण बनवले जाते व त्यातच खरं म्हणजे वर्षाचा धंदा होतो.

उन्हाळा संपलेला होता. हवा छान झाली होती. भय्ये आचारी मिठाया बनवत होते. तर राजस्थानी गुजराथी स्वयंपाकी फरसाण बनवण्यात दंग होते. भट्टी पेटली होती. boxes बनवले जात होते. गिफ्ट रॅपरने सजत होते. gift सांगितलेल्या पत्त्यावर पोचवल्या जात होत्या व अचानक ही बातमी आली. U.A.E. चे प्रेसिडेंट शेख झाहिद वारले. पटापट दुकाने बंद झाली. दिवाळीचा उत्साहच मावळला. लोकांनी स्वतःहून lightच्या माळा, रोषणाई बंद केली व दुःखात सहभागी झाले. माझ्या रेस्टॉरन्टमध्ये १५०० किलो मिठाई तयार झाली होती. अक्षरशः मी ती मिठाई बलदियाच्या...म्युनिसिपालटीच्या गार्बेज बॅग्जमध्ये नेऊन टाकली. फायद्यातोट्याचा विचार केला नाही.

हे मला कुणी सांगितलं नाही, शिकवलं नाही; तर उत्स्फूर्तपणे माझ्या हातून घडले! आपल्या घरात अशी घटना घडली तर आपण गोडधोड खाऊ शकतो? गळ्याखाली घास उतरतो? सण साजरे करतो?

दुबई हे माझे घरच आहे. कुटुंबातील कोणा कर्त्या पुरुषाचे निधन झाले होते. ना जातीचा, ना धर्माचा, ना देशाचा... पण एका अनामिक नात्याने बांधलेला! ज्याने आज कित्येकांच्या मुखात निवारा घातला... कित्येक घरातून चुली पेटल्या... कित्येक कुटुंबे सावरली गेली... कित्येकांना उद्याची स्वप्ने दाखवून ती पूर्ण करण्यासाठी मार्ग दाखविला... त्या आपल्या आश्रयदात्याच्याप्रति ही माझी कृती म्हणजे आदरांजली होती! श्रद्धांजली होती!...

# तीस वर्षे दुबईत!

**तीस वर्षे दुबईत 'डेंटल सर्जन' म्हणून प्रॅक्टीस करून, सुप्रसिद्ध कुशल डॉक्टर म्हणून नाव संपादन केलेल्या डॉ. प्रज्ञा पाठारे! एक हसरे उमदे व्यक्तिमत्त्व! डेंटिस्ट म्हणून प्रॅक्टीस करत असताना आलेले अनुभव त्यांनी आपल्या लेखात गुंफलेले आहेत. पेशंट म्हणून येणाऱ्या अरबी-स्त्रीपुरुषांचे आलेले अनुभव... त्यांच्या स्वभावातील बारकावे... चालीरिती... प्रामाणिकपणा यांचे दर्शन या अनुभवांतून होते!**

**डॉ. प्रज्ञा पाठारे यांच्या दुबईतील जवळ जवळ तीन दशकांच्या डेंटल प्रॅक्टीसमधील काही हृद्य आठवणी!**

आम्ही शाळेतल्या वर्गमैत्रिणी ४५ वर्षांनंतर भेटलो आणि लगेचच काहींनी माझ्या घरी येण्याचे आमंत्रण स्वीकारले. आता दुबई सोडून मला ४-५ वर्षे झाली आहेत, मी नियमीत डेंटिस्ट्रीची प्रॅक्टीस करत नाही, त्यामुळे मला भरपूर वेळच वेळ! नव्या-जुन्या मैत्रिणी, शेजारणी, पेशंटस्, नातेवाईक यांच्याबरोबर माझ्या गाठीभेटी होत असतात. पण भेटल्यावर जवळ जवळ प्रत्येकीचा एकदा तरी प्रश्न असतो की, 'कसं वाटतंय पुण्यात? दुबई miss करता की नाही?'

खरं सांगायचं तर मीच काय, माझ्या मुलीसुद्धा दुबई miss करतात. मला आठवते, मुलींना घेऊन मी दुबईला आले तेव्हा एका बॅगेत साखर, मीठ, तांदुळ, चिंच, गूळ, मसाले, भाज्या वगैरे आणि दुसऱ्या बॅगेत आमचे कपडे होते! तीस वर्षांनंतर दुबईहून परत आलो तेव्हा मात्र आमच्या सामानासाठी ४० फुटी मोठा कण्टेनर सुद्धा लहानच वाटला!

दुबईत आल्या आल्या २-३ दिवस घर, सुपरमार्केट, शेजारपाजार, रस्ते वगैरे समजण्यात वेळ गेला. नंतर दुबईतही डेंटल प्रॅक्टीस करायचीच हे ठाम केले आणि त्यासाठी लायसन्स घ्यायच्या तयारीला लागले. लायसन्सची परीक्षा देण्यासाठी अगोदरच ५०० दिरहॅम भरावे लागतात हे मला माहीत नव्हतं. परीक्षेला गेले तेव्हा प्रसादने माझ्या पर्समध्ये बळेच २०० दिरहॅम ठेवले होते. पण तिथला अरबी अधिकारी इतका चांगला की, माझे पैसे त्याने स्वतः भरले आणि 'तू दोन दिवसांनी आणून दिलेस तरी चालतील किंवा लायसन्स न्यायला येशील तेव्हा दे' असं केवळ्या विश्वासाने समजावून त्याने मला परीक्षेला पाठवले! त्यावेळी तो अधिकारी मला वडिलांच्या सारखाच वाटला आणि दोन दिवसात परीक्षेचा रिझल्ट येण्याआधीच मी त्याला पैसे परत करताना, घरी बनवलेला केक त्याच्यासाठी बांधून नेला. त्याच्याबद्दल वाटणारी gratitude मी आणखी कशी व्यक्त करणार होते?



डॉ. प्रज्ञा पाठारे
prajnya11@gmail.com

लायसन्स मिळाल्यानंतर डॉ. फर्नांडीस यांच्या क्लिनिक मध्ये मी कामाला लागले. डॉ. फर्नांडीस दुबईमध्ये १९५२ पासून होते. त्यांच्या इतके नावाजलेले आणि लोकप्रिय असे दुबईत त्यावेळी दुसरे कोणीही डेंटिस्ट नव्हते. दुबईच्या शेख घराण्यातले जवळ जवळ सर्वच त्यांचे पेशंट होते. मी कामाला लागले त्यावेळी ४-५ आणखीही डेंटिस्ट त्यांच्या क्लिनिकमध्ये काम करत. तिथे मी एकटीच Lady Dentist. त्यांचे जुने आणि वृद्ध अरबी पेशंट मला डॉ. फर्नांडीसची मुलगीच समजायचे. त्या क्लिनिकने खऱ्या अर्थाने मला Dentist म्हणून घडवले आणि दुबईत ओळख दिली.

आमच्याकडे दुबईत राहणारे विविध अरबी, आशियायी आणि पाश्चात्त्य देशांचेही नागरिक असणारे पेशंट यायचे. अरबी पेशंट तर फार मान देऊन आणि अदबीने वागत. माझा caring स्वभाव आणि सुरुवातीला अगदी प्रयत्न करत मोडक्या-तोडक्या का होईना पण अरबीत त्यांना समजावण्याचे त्यांना केवढे कौतुक असे. मी इंजेक्शन देताना त्यांना अजिबात त्रास होत नसे म्हणून त्याना मीच डॉक्टर म्हणून हवी असे.

मला आठवतो एक म्हातारा पेशंट - मोहम्मद, ज्याची मी कवळी बनवली होती. तो एकदा त्याच्या दोन नंबरच्या तरुण बायकोला तिचा दात काढण्यासाठी घेऊन आला. मला हळूच बाजूला बोलावून म्हणाला की 'माझ्या या बायकोला सांगू नकोस की माझी कवळी आहे म्हणून!'

त्या काळी नंबर एक, नंबर दोन अशा दोन्ही बायका बरोबरच येत. एकदा तर माझी एक पेशंट फातिमा, आल्या आल्या सरळ माझ्या खोलीत आली आणि मला म्हणाली, 'माझ्या नवऱ्याची बायको मी घेऊन आले आहे. तिचा दात दुखतो आहे. पण जरा सांभाळूनच, कारण ती एकदम घाबरट आहे.' तिचं बोलणं ऐकून मला नवलच वाटले. ती म्हणाली, 'तुम्ही इंडियन बायका खऱ्या भाग्यवान. तुम्ही तुमच्या नवऱ्याच्या एकुलत्या एक बायका असता. आम्हाला ते स्वातंत्र्य नाही.'

आता काळ बदललाय. कोणी शक्यतो दुसऱ्या लग्नाच्या भानगडीत पडत नाही. आणि आपापल्या बायकोची व्यवस्थित काळजीही घेतात. तिला तुसडेपणाने वागवत नाहीत. बऱ्याचशा अरबांच्या हैदराबादच्या मूळच्या भारतीय बायका आहेत. त्यांच्या मुलांना चांगलीच वागणूक, शिक्षण आणि संपत्तीतील वाट्याचा अधिकारही मिळतो.

मला आठवते, एकदा ७७ वर्षांचा अतिशय श्रीमंत असलेला अहमद दात काढायला आला. घाईत असल्यासारखा मला म्हणाला, 'मला BP, sugar वगैरेचा कसलाच त्रास नाही, फक्त माझा दात काढून दे.' त्याच्यावर विश्वास ठेवून मी त्याचा दात काढला. संध्याकाळी त्याच्या मुलाचा फोन की 'माझ्या वडिलांचे bleeding थांबत नाही. त्यांना अमेरिकन हस्पिटलमध्ये ॲडमिट केलं आहे.' मी ताबडतोब क्लिनिक सोडून धावतच तिकडे त्याला भेटायला गेले. त्याचे ७-८ नातेवाईक त्याच्या भोवती जमले होते. तो सगळ्यांना सांगत होता की, माझ्या डेंटिस्टची काहीही चूक नाही, मीच तिला खोटे सांगितले की मला BP, sugar वगैरेचा कसलाच त्रास नाही, पण दात खूप हलत होता म्हणून लगेच काढून टाक.' मला माझ्या पेशंटला दम मारायचा होता आणि त्याच्या नातेवाईकांना मला! शेवटी bleeding थांबले. पण त्यानंतर मी स्वतः BP आणि blood report पाहिल्याशिवाय ५० वर्षे वयावरील कोणाचाही दात काढला नाही.

एकदा डॉ. फर्नांडीसनी सांगितले की, शेख फॅमिलीतली लेडी पेशंट येणार आहे आणि तिला लेडी डॉक्टरच हवी आहे. मी सज्ज होऊन तिची व्यवस्थित ट्रीटमेंट केली. तिने येताना माझ्यासाठी दोन छोट्या पेट्या भरून खजूर आणले होते. खूप छान होते खजूर. ते मी क्लिनिकमधल्या सर्वांना वाटून टाकले.

सत्तरीतल्या मरियमला घेऊन तिचा मुलगा यायचा. मी तिची कवळी बनवली. प्रत्येक वेळी तो तिला हात धरून आणायचा आणि डेंटल चेअरवर पण तिचा हात पकडून असायचा. मी मनात म्हणायचे, धन्य ती माता आणि धन्य तो पुत्र! नंतर त्याच्याच बायकोचे, फातिमाचे मी Root Canal केले. तेव्हा सुद्धा तो बरोबर असायचा.

छोट्या पेशंटसची वेगळीच गंमत. रडत रडतच त्यांची entry व्हायची, 'I hate you' म्हणत असताना कसंतरी त्यांना चेअरवर बसवले जायचे, ट्रीटमेंट करताना कधी कधी दोन नर्सेसकडून त्यांचे हात पाय धरून ठेवायला लागायचे, शिवाय आई किंवा वडील दम मारायला असायचेच. पण जाताना मात्र छोट्यांसह सर्व हसत हसत जात.

माझ्या मुलींना शाळेत अगदी नवव्या इयत्तेत अरबी भाषा हा सक्तीचा विषय होता. मला फक्त बोलायला जमायचे, तेही पेशंटशी माझ्या कामासंदर्भात. पण माझ्याकडे येणाऱ्या तरुण अरबी मुली कधी कधी माझ्या मुलींना अरबी भाषेत छोटे छोटे निबंध लिहायला मदत करत.

कोणालाही आपल्याला दुखणं वेदना कधीच सहन कराव्या लागू नयेत असंच वाटतं. काहींची सहनशक्ती अगदीच कमी असे, तर काहींची त्यामानाने जराशी अधिक असे. त्यामुळे कुठल्याही पेशंटची वेदना आधी थांबवली की त्यांचा डॉक्टरवरचा विश्वास आणि आदर वाढतो. काही पेशंटस् बरेच बोलके असतात, काही अगदीच मितभाषी. पण सुरुवातीला डेंटिस्टच्या instruments ची सर्वांनाच भीती वाटते. तेव्हा त्यांची कशी ट्रीटमेंट करणार ते त्यांना विश्वासात घेऊन सुरुवातीलाच सांगणं हे मला महत्त्वाचे वाटायचे. विश्वास, आदर आणि आपलेपणामुळे पेशंटस् आपल्याकडे आनंदाने येतात.

अरबी पेशंटस्कडे नोकरवर्ग खूप असतो. त्यांना सुद्धा आपल्यासारखीच योग्य ट्रीटमेंट मिळावी अशी त्यांची अपेक्षा असे. ते पैशासाठी कधीही घासाघीस करत नसत. जुने पेशंटस् कधी भेटले तर आदराने आणि प्रांजळपणे म्हणत, 'तू बनवलेले दात फार छान आहेत. पुढच्या वेळी माझ्या बायकोच्या दातांचे काम आहे. तेव्हा आधीच विचारतो आहे की, पुढच्या महिन्यात तू सुटीला वगैरे जाणार नाही ना?' बरीच वर्षे दुबईत स्थायिक झालेले भारतीय पेशंटस् बहुधा आमच्याकडेच यायचे. कारण हे क्लिनिक खूपच जुने आणि लोकप्रिय होते. बऱ्याच जणांना माहीत होते आणि बऱ्याच जणांनी प्रत्यक्ष अनुभवही घेतला होता.

एकदा Air India चे त्यावेळचे डायरेक्टर Mr. Mascarenhas दुबईत असताना माझ्याकडे ट्रीटमेंटसाठी आले होते. त्यांची बायको मराठी आहे. त्यांनी नंतर खास मुंबईहून माझ्यासाठी पुरणपोळ्या आणि हापूसचे आंबे पाठवले होते.

एकदा एक सिरीयन पेशंट दाताचे filling करण्यासाठी आली होती. ती पुन्हा सहा महिन्यांनी दात साफ करून घेण्यासाठी आली. तिची एकूण परिस्थिती लक्षात आली तेव्ही मी तिला म्हटलं की, "तू pregnant आहेस. त्यावर ती चक्क 'नाही' म्हणाली." मी म्हटलं, "please check करून घे." दोन दिवसांनी तिचा फोन आला की ती आठ महिन्यांची pregnant आहे. तिच्या डॉक्टरने confirm केले होते. तिचे वय ४८ होते आणि तिला कसलाच त्रास नसल्याने तिने pregnancy टेस्ट केलीच नव्हती. वीस वर्षांपूर्वी पहिली मुलगी झाली तेव्हा संपूर्ण नऊ महिने तिला bed rest होती. त्यामुळे या pregnancy चे तिला नवलच वाटले. दोन महिन्यांनी ती बाळ घेऊन मला दाखवायला आली. छान healthy होतं बाळ. मी बघूनच खुश! तिने मात्र मला खूप धन्यवाद दिले.

माझ्याकडे नियमीत येणारी एक पाकिस्तानी धोबीण दर वर्षी सुटीनंतर पाकिस्तानहून येताना मला दोन डझन बांगड्या घेऊन यायची. मी तिला लागणारी औषधं द्यायची, माझ्याकडे medical samples म्हणून आली असली तर ती; नसली तर विकत घेऊन. इराणी पेशंटस्शीही मी मोडक्या-तोडक्या इराणी भाषेत बोलायची. ते बऱ्याचदा मला इराणचे पिस्ते घेऊन येत.

त्या ३० वर्षांत किती पेशंट भेटले, ट्रीटमेंट घेऊन गेले आणि जाताना माझ्यासाठी शुभेच्छा आशीर्वाद ठेवून गेले याची काही मोजदादच करता येणार नाही. पण ते सर्व माझ्या आठवणीत आहेत. तो काळ माझ्यासाठी खरोखरच छान होता, मानसिक कार्यपूर्ती करणारा होता, आनंददायी होता!



# शालेयजीवन... दुबईतील!

शालेयजीवन हा मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. दुबईतील शाळांमध्ये दीर्घकालपर्यंत शिक्षिका व पर्यवेक्षक म्हणून कार्यरत असलेल्या ज्योती अविनाश जव्हारकर यांनी आपल्या हलक्याफुलक्या ओघवत्या भाषेत दुबईतील शालेयजीवन व त्यांना आलेल्या अनुभवांचे वर्णन केले आहे. ते वाचताना वाचक खचितच शाळेतील वर्गात जाऊन पोहोचतो...!

५ सप्टेंबर १९७९. दरवर्षीप्रमाणे 'शिक्षकदिन' याहीवेळेस शाळेत अगदी उत्साहाने साजरा झाला. माजी व आजी विद्यार्थी-विद्यार्थिनी भेटायला आले. कोणी गुलाबाची फुले दिली, कोणी पुष्पगुच्छ दिले, कोणी स्वाक्षऱ्या मागितल्या, तर कोणी स्वाक्षरीबरोबर सुविचार लिहा म्हणून विनंती केली. अशा या 'गुरूः देवो भव' किंवा 'गुरूः साक्षात परब्रह्म' अशी ठाम निष्ठा ठेवणाऱ्या मायभूमितून अनोळखी अशा दुबईला दोन दिवसांनी प्रयाण करायचे होते. काही महिने आधी मला कल्पनाही नव्हती की, हा माझा 'बालमोहन विद्यामंदिर' शाळेतील शेवटचा 'शिक्षकदिन' असेल.

७ सप्टेंबर १९७९. एअर इंडियाचे विमान माझ्या तीन वर्षांच्या मुलाला व मला घेऊन दुबई विमानतळावर सुखरूप उतरले. हवाईसुंदरीने घोषणा केली की, बाहेरील तापमान ४०°C व आर्द्रता ६०% आहे. ते ऐकून नागपूरचे लोक उन्हाळ्यात काय करत असतील या विचारात गढून गेल्यामुळे हवाईसुंदरीचे 'एअर इंडिया'ने प्रवास केल्याबद्दलच्या आभारप्रदर्शनाकडे पूर्ण दुर्लक्ष झाले.

माझे पती तेव्हा शारजाच्या एका कॉन्ट्रॅक्टिंग कंपनीत कामाला होते. त्यामुळे त्यांना राहायला घरही शारजातच दिलं होतं. गाडीत बॅगा टाकून आम्ही तिघंजण शारजाच्या रस्त्याला लागलो. दुबई ते शारजा अंतर सुमारे १५ ते २० कि.मी. आहे. दुतर्फा तुरळक इमारती दिसत होत्या व सर्वात उंच इमारत होती फक्त पाच मजली. नजर जिथपर्यंत पोहोचत होती तिथपर्यंत वाळवंट पसरलं होतं. त्या वाळवंटात मशरूम्ससारख्या अधूनमधून दोन-तीन मजली इमारती उगवल्यासारख्या दिसत होत्या. रस्त्यावर फक्त वेगाने जाणाऱ्या-येणाऱ्या गाड्या तेवढ्या दिसत होत्या. पण अजून एकही माणूस रस्त्यावर चालताना दिसला नव्हता. मुंबईच्या पार्श्वभूमिवर ते चित्र जरा वेगळे व विचित्रच वाटत होते. असा निर्मनुष्य व शुकशुकाट असलेला रस्ता मी प्रथमच बघत होते. दुबई व शारजा या दोन एमिरेट्सना जोडणारा रस्ता मात्र दुर्लक्षित होता. खूपच अरूंद, सिंगल लेनचा, एकही दिवा नसणारा. पण आज मात्र या रस्त्याला राजमार्गाचं स्वरूप आलं आहे. भरपूर प्रकाश देणारे उंच खांबावरले दिवे, सिंगल लेनच्या जागी ४-५ लेन्सचे आरशासारखे गुळगुळीत रस्ते व दुतर्फा सोबत करणाऱ्या गगनचुंबी इमारतींची जंगले. याच इमारतींच्याखाली पूर्वी समुद्राच्या खाडीचे



ज्योती जव्हारकर
jyoti.jawharkar@gmail.com

पाणी जमा होत असे. भरती असेल तेव्हा पाण्याची छोटी छोटी तळी दिसायची. ओहोटी आली की पाणी अदृश्य होऊन त्याजागी बुरशीसारखा पांढरट थर पसरलेला दिसत असे. विचारल्यावर समजलं की, खाडीच्या पाण्यामधील ते मीठ असे. पाणी पृष्ठभागावर येऊन सूर्याच्या उष्णतेने सुकत असे व त्यातील क्षार, मीठ सर्वकडे पसरत असे. पण गंमत असी की, इथल्या लोकांना मीठाची आगरं म्हणजे काय असतं याची सुतराम कल्पना नव्हती.

मुंबईहून येताना मी माझे बी.एड्.चे सर्टिफिकेट व शाळेतील अनुभवाचं सर्टिफिकेट आणलं होतं. मुंबईत ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित शिकवायचा जवळजवळ ३ वर्षांचा अनुभव गाठीला होता. ओरिजिनल सर्टिफिकेट्स व त्यांच्या झेरॉक्स कॉपीज यांच्या जोरा-वर शारजाच्या शाळेत शिकवण्याची इच्छा होती. नवीन घरात स्थिरावल्यावर एके दिवशी सकाळी आम्ही तिघे-जण शाळेतील नोकरीच्या शोधार्थ निघालो. आणि काय आश्चर्य! पहिल्याच शाळेतील प्रिन्सिपॉलने सर्टिफिकेट्स पाहून, '१ ऑक्टोबर पासून शाळेत शिकवायला येऊ शकता का?' असं विचारलं. माझ्या मुलालाही K.G. मध्ये अॅडमिशन मिळाली. शिक्षकांच्या पहिल्या मुलाला शालेय फी माफ असते. पण स्कूलबसची फी मात्र भरावी लागते. मला ६ वी ते ८ वीच्या वर्गांना विज्ञान व गणित शिकवायचे होते. मुलाबरोबरच मलाही जायला-यायला शाळेची बस होती. या शाळेत शिकवला जाणारा अभ्यासक्रम होता 'O'level चा व शाळेत K.G. ते ८ वी पर्यंतच वर्ग होते. त्याकाळी 'O'level चा अभ्यासक्रम म्हणजे लिंबूटिंबू मानला जायचा. कारण कोणत्याही देशाच्या सरकारची त्याला मान्यता नव्ह-ती. पण हा अभ्यासक्रम अतिशय लोकप्रिय होता. कारण आपल्या दिल्लीच्या केंद्रीय विद्यालयात शिकवल्या जाणाऱ्या C.B.S.E. च्या अभ्यासक्रमापेक्षा कितीतरी सोप्पा व सुलभ. विविध देशांतून आलेल्या मुलांची सोय पाहून केलेली एक निव्वळ सोयीस्कर तडजोड. या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या होती जेमतेम ४००. म्हणजे ४०० विद्यार्थ्यांची भेळपुरीच म्हणा ना! भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, इंग्लंड, इजिप्त, सुदान, सोमालिया, केनिया, चिली, फिलीपाईन्स वगैरे देशांचे नागरिकत्व असलेली मुलेमुली एकाच वर्गात बसून गुण्यागोविंदाने आपला अभ्यासक्रम पुरा करायचा प्रयत्न करत होती. परीक्षेत कोणाला नापास करायचा प्रश्नच नव्हता. उलट ''जा बाबा पुढच्या वर्गात. परत पुढच्या वर्षी डोकेदुखी नको तुझी'' असा विचार करून शिक्षक प्रत्येकाला पुढच्या वर्गात ढकलायचा प्रयत्न करीत. माझ्या शिक्षकपेशाच्या संपूर्ण कारकिर्दीत एवढ्या सढळ हाताने मार्क देणे हे पुढे दुसऱ्या कोणत्याच शाळेत घडले नाही. वर्गात स्पर्धेचे वातावरण अजिबात नव्हते. शिकवायला जाण्याआधी घरी मला त्या विषयाची पूर्वतयारी कधीही करावी लागली नाही. आराम होता, पण शिकवण्याचे समाधान मात्र नव्हते.

त्यामुळे या शाळेला दोन वर्षांतच रामराम ठोकून १९८१ मध्ये मी दिल्लीच्या केंद्रीय बोर्डाची मान्यता असलेल्या शाळेत शिकवायला सुरुवात केली. आता लुटुपुटुच्या शाळेतून एका खऱ्याखुऱ्या शाळेत ९ वी व १० वीला मी केमिस्ट्री विषय शिकवायला सुरुवात केली. शाळा स्थापन होऊन जेमतेम एकच वर्ष पूर्ण झालं होतं. त्यामुळे शिकवण्याबरोबरच केमिस्ट्री लॅबची व्यवस्थाही मलाच बघावी लागणार होती. या शाळेत K.G. ते १२ वी पर्यंत वर्ग होते व विद्यार्थ्यांची संख्या होती अंदाजे १०००. दिल्ली बोर्डाचा अभ्यासक्रम असल्यामुळे ९९% मुले भारतीय होती. पण शिक्षणाचा दर्जा उत्तम प्रतीचा व दिल्ली बोर्डाची मान्यता असल्यामुळे उरलेल्या १% मध्ये पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, इजिप्त याही देशातील मुले होती. या शाळेत सुमारे १० वर्षे शिकवून जेव्हा मी दुबईतील एका मोठ्या व मान्यवर शाळेत नोकरी करायला लागले तेव्हा मला एका मोठ्या महासागराची आठवण झाली. कारण इथे जवळजवळ ४५०० विद्यार्थी होते. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या ३५ पर्यंतच मर्यादित होती. एकाच वर्गात मुलगे व मुली बसून शिकत होती. पण एक दिवस दुबई शिक्षणखात्याने नवीन



कायदा करून co-education वर बंदी आणली. त्यामुळे मुलींसाठी सकाळी पावणेआठ ते पाऊण व मुलांसाठी दुपारी १ ते ६ अशा दोन शिफ्ट्समध्ये शाळेचं काम चालू झालं. मुलींना शिकवायला फक्त शिक्षिकांना परवानगी होती. पण मुलांना मात्र शिक्षक तसेच शिक्षिकाही शिकवू शकत होत्या. माझ्या काही सहकारी शिक्षिकांना मुलगे असल्याने त्यांनी स्वतःच्या मुलांच्या सोयीसाठी दुपारची शाळा निवडली. दोन शिफ्ट्स मध्ये शाळेचं काम सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट म्हणजे जवळजवळ ९००० झाली. शाळेचा फायदा वाढला.

अशी काही वर्षे गेल्यानंतर दुबई शिक्षणखात्याला वाटू लागलं की, दुपारच्या शिफ्टमध्ये शिकणाऱ्या मुलांवर अन्याय होत आहे. कारण उन्हाळ्यात या मुलांना खूपच त्रास होत असे. प्रत्येक वर्गात जरी एक A/C असला तरी खेळायला जेव्हा ही मुले बाहेर मैदानात जात तेव्हा उष्णतेमुळे / उच्च तापमानामुळे काहींना चक्कर येत असे. त्यामुळे परत एक नवीन नियम अंमलात आला आणि तो म्हणजे मुलगे व मुली या दोघांचीही सकाळच्या शाळेत शिक्षणाची सोय व्हावी. त्यासाठी शाळाचालकांना मुलांसाठी दुसरी नवीन शाळेची इमारत बांधायला दोन वर्षांची मुदत दिली गेली. एवढेच नाही तर, जमीन उपलब्ध करून देण्यात शिक्षणखात्याने मदतीचा हातही पुढे केला. पालकांनाही सोयीचे झाले. बहिणभाऊ एकाच वेळी शाळेत जाऊ लागले व घरी परत यायची वेळही एकच झाली. शिक्षणाचा दर्जाही वाढला. कारण शिक्षकांनी B.Ed.ची डिग्री मिळवणे आवश्यक झाले. शिक्षकांकडे B.Ed. डिग्री तर हवीच पण जे विषय घेऊन B.Ed. कोर्स पूर्ण केला आहे फक्त तेच विषय शिकवायला परवानगी आहे. म्हणून हल्ली इंग्लीश, सोशलस्टडीज, फिजिक्स, गणित शिकवणाऱ्या शिक्षकांना मागणी आहे. आखातात ८०% भारतीय केरळातून येतात. त्यामुळे कुठेही गेलं तरी मल्याळम् भाषाच कानावर पडते. तेच चित्र शाळेतही दिसून येतं. जशी 'मागणी, तसा पुरवठा' अशी केरळी लोकांची पॉलिसी असल्याने हल्ली नर्सिंग क्षेत्राखालोखाल शिक्षणक्षेत्रातही केरळी शिक्षक-शिक्षिकांची गर्दी झालेली दिसते. काही शाळाचालक त्यांच्या राहण्याचीही व्यवस्था करतात.

शाळेत पहिलीपासून मुलांना अरेबिक भाषा शिकावीच लागते. ही भाषा शिकवणारे शिक्षक अधिकतर इजिप्तचे असतात, तोडक्यामोडक्या इंग्रजीत विद्यार्थ्यांशी संभाषण करून अरेबिक शिकवतात. पालकांना जरी ही भाषा शिकणं कठीण वाटत असलं तरी मुलं मात्र घोकंपट्टी करून लिहायला वाचायला शिकतात. पण त्यांचे अरेबिकचे ज्ञान शाळेबाहेर मात्र शून्य असते. विचार करून स्वतःचे एक वाक्यसुद्धा मुले बोलू शकत नाहीत. याउलट इथले अरबी लोक मात्र तोडकंमोडकं हिंदी बोलण्यात तरबेज झाले आहेत. याविषयात पास होण्यासाठी कमीतकमी ५०% मार्क मिळवावे लागतात. नापास झालेल्या विद्यार्थ्याला परत परीक्षेला बसून पास व्हायची आणखी एक संधी दिली जाते. पण त्याही परीक्षेत दुसऱ्यांदा नापास झालेल्या विद्यार्थ्याला परत त्याच वर्गात बसावे लागते. जरी तो विद्यार्थी इतर विषयात पास झाला असला तरी त्या पुढच्या वर्गात प्रवेश नाकारला जातो. पण असं क्वचितच घडतं. कारण यावेळी पालकांच्या व त्या विद्यार्थ्याच्या मनःस्थितीचा विचार केला जातो, वर्षभर भरलेल्या शाळेच्या फीचा, स्कूलबसच्या फीचा विचार केला जातो. त्यांना आर्थिक नुकसानीची झळ पोहोचू नये म्हणून शाळा मदत करते. म्हणजे येनकेन प्रकारेण त्या विद्यार्थ्याला एक छोटी ताकीद देऊन व एक मोठा धक्का देऊन पुढच्या वर्गात ढकलले जाते. पण शाळेत जवळजवळ १० वर्षे अरेबिक भाषा शिकूनही मुलांना अरबी लोकांशी अरेबिक भाषेत संवाद मात्र साधता येत नाही किंवा जुजबी संभाषणही करता येत नाही.

इंग्रजी व अरेबिक भाषांव्यतिरिक्त C.B.S.E. अभ्यासक्रमानुसार मुलांना आणखी एक तिसरी भाषा शिकावी लागते. हिंदी, उर्दू, मल्याळम् किंवा फ्रेंच या चार भाषांपैकी कोणतीही एक भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य त्यांना असते. माझ्या आठवणीत कितीतरी दक्षिण भारतीय विद्यार्थ्यांनी उत्तर हिंदुस्तानी विद्यार्थ्यांना (ज्यांची मातृभाषाच हिन्दी आहे) परीक्षेत उत्तम प्राविण्य मिळवून मागे टाकले आहे.

या विषयांव्यतिरिक्त सर्वांगीण विकासासाठी चित्रकला/गायन/नृत्य यापैकी एक विषय निवडावा लागतो. मुस्लिम विद्यार्थ्यांना 'इस्लाम' धर्मविषयक अभ्यास करावा लागतो. हा विषय शिकवताना प्रत्येक विद्यार्थिनीने दुपट्टा किंवा स्कार्फ वापरून डोकं झाकून घ्यायचं असतं. इतर धर्माच्या विद्यार्थिनी यावेळी 'Moral Science' मध्ये कसं वागावं, मोठ्यांना कसा मान द्यावा, राष्ट्रीय संपत्तीचा मान राखून कसं वागावं वगैरे गोष्टींचा अभ्यास करतात.

Physical Exercise सर्वांच्या आवडीचा विषय. यावेळी मुलींना टेबलटेनिस, बास्केटबॉल, वॉलीबॉल, ॲथेलेटिक्स, खोखो, उंच उडी, लांब उडी, पोहोणे, वेटलिफ्टिंग, डिसकसथ्रो,

जॅवलीनथ्रो, शॉटपट, बुद्धिबळ, क्रिकेट व इतर मैदानी खेळ खेळता येतात. दरवर्षी आंतरशालेय स्पर्धांत भाग घेऊन पुढे भारतात जाऊन Naional level वर खेळायची संधी मिळते.

शाळेच्या वेळेनंतरही काही उपक्रम राबवले जातात. यात Quiz, Drama त्याबरोबर १०वी ते १२वीच्या विद्यार्थिनी ५वी ते ९वीच्या अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थिनींना अभ्यासात मदत करतात. ही मदत विनाशुल्क केली जाते. आपणही समाजाचे काही ऋण लागतो ही भावना अशा प्रकारे जोपासली जाते. नवीन ॲडमिशन घेतलेल्या मुलींना आपणहून मदत करण्यात हुशार विद्यार्थिनी मनापासून खुश असतात. १२वीच्या विद्यार्थिनींसाठी workshops, seminars आयोजित केले जातात. त्यासाठी त्या त्या विषयात प्राविण्य मिळवलेल्या सन्माननीय व्यक्तींना आमंत्रित केले जाते. पंचतारांकित हॉटेलमधील मॅनेजर्सना बोलावून 'टेबल मॅनर्स'चे खास प्रशिक्षण दिले जाते. शाळेत वर्षभर काही ना काही कारणाने जे काही कार्यक्रम आयोजित केले जातात त्या सर्वांचे सूत्रसंचालन विद्यार्थिनीच करतात. शिक्षिका नेहमीच पडद्याआड असतात. त्यामुळे सभाधीटपणा, वक्तृत्व, प्रसंगावधान वगैरे गुण जोपासले जातात, आत्मविश्वास वाढतो. पालकवर्गाशी सतत संपर्क साधला जातो व त्यात विद्यार्थ्यांच्या विकासाला प्राधान्य कसे देता येईल याचा सकारात्मक विचार केला जातो.

सहलीचा आनंद मुलांबरोबर मोठ्यांनाही लुटता येतो. पूर्वी सहली या नेहमी दुबईतल्या दुबईत असत. पण आता दरवर्षी एक परदेश सहल आयोजित केली जाते. मलेशिया, सिंगापूर, इजिप्त, अमेरिका, केनिया या ठिकाणच्या सहलींना पालकमंडळी भरभरून प्रतिसाद देतात. काहींना याचे कारण विचारले तर पालक म्हणतात, ''मॅडम, आम्ही सर्वांनी जर या ठिकाणी जायचे म्हटले तर परवडत नाही, पण एका मुलीला पाठवायचा खर्च आम्हाला नक्कीच परवडतो.'' प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शाळेतच एक रात्र राहायची योजना असते. यावेळी असं दिसून येतं की, छोट्या छोट्या मुली आपल्या मैत्रिणींबरोबर एक अख्खी रात्र राहायला मिळणार, गप्पागोष्टी करायला मिळणार, रात्रीचे जेवण एकत्र करता येणार म्हणून खूश असतात. पण मुलींच्या आयांना मात्र त्यांच्याशिवाय रात्र काढायची म्हणून चैन पडत नाही. मग त्या उगीचच ''राहशील नं माझ्याशिवाय नीट? आठवण काढून रडणार तर नाहीस ना?'' वगैरे शंका काढत बसतात!

शालेय वर्ष एप्रिल ते मार्च असं असतं. पण अत्यंत कडक उन्हाळ्यामुळे जुलै व ऑगस्ट मध्ये ६० दिवसांची उन्हाळी सुट्टी मिळते. तेव्हा बरेचसे पालक मुलांबरोबर भारतात आपल्या नातेवाईकांना, मित्रमैत्रिणींना भेटायला येतात. डिसेंबरमध्ये १० दिवसांची नाताळची किंवा हिवाळी सुट्टी मिळते. मार्चच्या पहिल्या आठवड्यात वार्षिक परीक्षा झाल्यावर नवीन वर्षाच्या सुरुवातीआधी सुमारे २०-२५ दिवसांची सुट्टी मिळते. ज्या पालकांना भारतातील पावसाळा आवडत नाही असे पालक मग मार्चच्या सुट्टीत भारतात येतात.

दर तीन-चार वर्षांनी शाळेच्या युनिफॉर्मचा रंग बदलला जातो. अशावेळी सर्व मुलांना जुने युनिफॉर्म्स फेकून न देता एका मोठ्या खोक्यात गोळा करायला सांगतात. हे सर्व युनिफॉर्म्स भारतातील खेडेगावात जाऊन तिथल्या गरीब वस्तीतील शाळांमध्ये, अनाथाश्रमांमध्ये वाटले जातात. याचबरोबर पेन्सिली, जुने चष्मे, पुस्तके वगैरे गोष्टीही पाठवल्या जातात. वीज व पाणी यांचा अपव्यय कसा टाळावा याचे प्रशिक्षण अगदी बालवर्गापासून दिले जाते. या गोष्टी कशा जपून वापराव्या हे घरी जाऊन ही लहान लहान मुले आपल्या आईवडिलांना शिकवतात.

शाळा सोडून जाताना मुलांच्याच नाही तर आईवडिलांच्या डोळ्यांतही अश्रू दाटलेले दिसतात. आपल्या मुलीच्या प्रगतीमध्ये शाळेचा वाटा सिंहाचा आहे, असं दिलखुलासपणे कबूल करतात. शाळा सोडून जाताना प्रत्येक विद्यार्थिनीकडे किमान एक तरी सर्टिफिकेट असतेच, जे ती अभिमानाने दाखवते व फाईलला लावते.

शालेय शिक्षणाबरोबर स्वच्छतेचे धडेही दिले जातात. ही स्वच्छता वैयक्तिक तर असतेच, पण सार्वजनिकही असते. शाळा सुटल्यावर प्रत्येकजण आपलं डेस्क स्वच्छ आहे नं याची खात्री करून घेतं. वर्गात, कॅरिडॉरमध्ये कुठे कागद, कचरा पडलेला दिसला तर विद्यार्थिनी स्वतःहून, कोणी सांगायच्या आधीच, तो उचलून डस्टबिनमध्ये टाकतात. वॉशरूमची स्वच्छताही खूप वाखाणण्याजोगी असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुलींना भारतातील शाळेत जायला आवडत नाही.

अशा काही अपवादात्मक गोष्टी सोडल्या तर भारतीय शाळांत व दुबईतील शाळांत फारसा फरक नाही. दर आठवड्याला एकदा तरी 'जन गण मन' बरोबर दुबईचेही राष्ट्रीय गीत म्हटले जाते व जन्मभूमिबरोबरच कर्मभूमिलाही वंदन केले जाते.

# प्रवास....प्रिंटिंग प्रेस ते फोटोग्राफर

**दुबईतील एका प्रसिद्ध वर्तमानपत्राच्या प्रिंटिंग प्रेसची जबाबदारी लीलया पेलणारे, ट्रॅव्हल व टूर्सच्या कारभाराची धुरा वाहणारे, जगप्रसिद्ध लोकप्रिय असलेल्या क्रिकेट या खेळाच्या आंतरराष्ट्रीय मॅचेसचे छायाचित्रण करून, जागतिक कीर्तीच्या खेळाडूंच्या खेळातील अविस्मरणीय क्षण आपल्या कॅमेऱ्यात टिपणारे क्रीडा वार्ताहर म्हणून प्रसिद्ध असलेले असे हे चौफेर व्यक्तिमत्त्व म्हणजे दिलीप खेडेकर!....आपल्या कॅमेऱ्यातून आठवणींची रिळे उलगडताना....!**

वेळ दुपारची होती. जेवण आटोपून वर्तमानपत्र वाचायला सुरुवात करणार, तेवढ्यात माझ्या मोबाईलची घंटा वाजली. 'हॅलो!' मी म्हटलं. पलीकडून आवाज आला 'मी मेघना वर्तक बोलतेय. नमस्कार!' मी, 'नमस्कार! आज कशी काय आठवण काढली?' मेघना 'ग्रंथाली या मराठी साहित्यासाठी वाहिलेल्या संस्थेतर्फे दुबईतील जीवनावर 'इ' दिवाळी अंक काढायचे ठरले आहे. त्यासाठी दुबईतील तुझे जीवन प्रिंटिंग प्रेस, क्रीडा पत्रकार व फोटोग्राफर म्हणून अनुभव या विषयी तुझ्याकडून माहिती हवी आहे लेखासाठी.' मी... 'बरं प्रयत्न करतो.'

मी 'हो' म्हटले व विचार करत करत भूतकाळात रमून गेलो. आठवणींचा एक एक पदर उलगडत गेला...! मी भूतकाळात जाऊन बोलत होतो व मेघना मला मधूनच वर्तमानाची जाणीव करून देत होती.

प्रत्येकाच्या आयुष्यात काहीकाही तारखा महत्त्वाच्या असतात. माझ्या आयुष्यात ०७-०७-१९७७ ही तारीख महत्त्वाची ठरली. माझ्या आयुष्याला







दिलीप खेडेकर
info@siddheshtours.com




वेगळे वळण लावणारी! याच दिवशी आईवडील व सर्व मित्रपरिवाराचा निरोप घेऊन मी अळी Indiaच्या विमानाने प्रथमच परदेशगमनासाठी उड्डाण केले.

सुमारे तीन तासांनंतर आमच्या विमानाची चाके दुबई विमानतळाच्या धावपट्टीला टेकली व मी एकट्यानेच नव्हे तर माझ्यासारख्या पहिल्यांदा विमान प्रवास करणाऱ्या अनेकांनी देवाचे आभार मानले. विमानाच्या दाराजवळ शिडी लागल्यावर विमानाचे दार उघडले व गरम वाऱ्याचा झोत विमानात शिरला. त्याचक्षणी मनात म्हटले 'देवा कशाला इथे आलो? याच विमानाने मायदेशी परत जावे!' असाही विचार त्याक्षणी मनाला चाटून गेला.

वास्तविक मुंबईतील टाटा प्रेसमधील चांगली नोकरी सोडून दुबईला येण्याची काही आवश्यकता नव्हती. पण जे जे स्कूल ऑफ आर्टमधील माझे काही मित्र दुबईला आले म्हणून मीही यायचे ठरवले.

दुबई विमानतळावरील सर्व सोपस्कार आटोपून मी बाहेर पडलो तेव्हा बिशू वैती व विजय राव हे कॉलेजमधील मित्र स्वागतासाठी हजर होते. त्यांच्या शेजारीच माझ्या नावाचा फलक घेऊन 'इजान' नावाचा कंपनीचा सुपरवायजर मला नेण्यासाठी आला होता. कंपनीत पोचेपर्यंतच्या १५-२० मिनिटांच्या गप्पात त्याने माझी कुंडली, धर्म, शिक्षण, कामाचा अनुभव इ. काढण्याचा प्रयत्न केला. कंपनीत बहुसंख्य भारतीय व ३-४ जण मराठी असल्याने रुळण्यास वेळ लागला नाही. सकाळी ८ ते १ व दुपारी ४ ते ७ या नवीन कामाच्या वेळा अंगवळणी पडल्या.

दोन महिन्यातच दुबईतील महाराष्ट्र मंडळाच्या पहिल्या गणेशोत्सवाची संधी मला मिळाली. दुबई इंडियन स्कूलच्या पटांगणात हा उत्सव साजरा झाला. एका बाजूला गणपतीची आरास आणि लागूनच कार्यक्रमासाठी रंगमंच. अगदी मुंबईला आल्यासारखे वाटले. नवीन ओळखी झाल्या.

एका गोष्टीमुळे मुंबईत नसल्याचे जाणवत होते. ते म्हणजे सकाळच्या चहाबरोबर हातात वर्तमानपत्र नव्हते. असणार तरी कसे? त्यावेळी U.A.E.त वर्तमानपत्रच नव्हते. साप्ताहिकाच्या स्वरूपाचे Recorder नावाचे बातमीपत्र मिळायचे. सायक्लोस्टाईल प्रिंटिंग केलेले! आणि त्यावरूनच की काय आमच्या प्रिंटिंग प्रेसच्या मालकाच्या डोक्यात वर्तमानपत्राच्या कल्पनेने घर केले व Gulf Newsची पूर्वतयारी सुरू झाली.

टाटा प्रेसमधील Web-Offset printing मधील माझा अनुभव लक्षात घेऊन या प्रॉजेक्टसाठी माझी नेमणूक करण्यात आली. लंडनहून आलेल्या इंजिनीअर्स बरोबर Machine Installationची संधी मला मिळाली व वर्तमानपत्राचा पूर्ण set up करण्यासाठी ६ महिन्याच्या करारावर Advertising, marketing, Editorial production इ. डिपार्टमेंटसाठी ब्रिटिश टीम आली होती. या सर्वांशी सुदैवाने माझे चांगले सूत जमले.

पहिल्या दिवसाच्या प्रकाशनाचा दिवस जसजसा जवळ येत चालला तसतसा संपादकीय व इतर खात्यांमधील हालचालींना वेग येऊ लागला. माझ्या मशिनवरसुद्धा छपाईच्या चाचण्या सुरू झाल्या. दुबईच्या शेख महंमदचे वडील शेख राशिद उद्घाटनासाठी येणार होते. शेख आल्यावर मशिनचे बटण दाबून सुरुवात कोण करणारा यावर चर्चा सुरू झाली. प्रेसच्या मालकाने ब्रिटिश मॅनेजमेंटला सांगितले तुम्हीच ठरवा. आणि मॅनेजमेंटने ही जबाबदारी माझ्यावर सोपवली. ३० सप्टेंबर १९७८ ला ही सुवर्णसंधी मला मिळाली. याच दिवशी रात्री Tim Edgar या संपादकाने पार्टी ठेवली होती. त्यात मी एकटाच भारतीय पत्रकार होतो.

सुरुवातीला Gulf News हा पेपर Tabloid size मध्ये




छापला जात असे. परंतु त्याचवेळी सुरू झालेले Khaleej Times हे वर्तमानपत्र मोठ्या आकाराचे होते. जाहिरातदारांना हे गैरसोईचे व्हायला लागले व त्यामुळे GN ला आकार बदलावा लागला.

दिलीप खेडेकर बारीकसारीक आठवणीत अगदी दंग होऊन गेला होता. तो सांगू लागला, एक दिवाळीच्या पुरवणीचा किस्सा! १९७९ च्या दिवाळीच्या वेळी Gulf News ने दिवाळीसाठी खास पुरवणी काढायचे ठरवले. त्यावेळी मेधा पाटील नावाची स्त्री जाहीरात विभागात Advertising प्रमुख म्हणून कामाला होती. तिने जाहिराती गोळा केल्या व १२ पानी पुरवणी तयार झाली. छपाई होण्यापूर्वी संपादकीय विभागात मी पाने तपासायला गेलो तेव्हा पुरवणीच्या पहिल्याच पानावर 'केरळातील मुस्लिम समाज' हे आर्टिकल पाहिले व माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

आमचे पाकिस्तानी मॅनेजर ताज लोधी यांच्याकडे याबद्दल मी नाराजी व्यक्त केली. पहिल्या पानावरचा मजकूर बदलला नाही तर मी ही पुरवणी छापणार नाही. मला नोकरीवरून काढलेत तरी चालेल, असे त्यांना ठणकावून सांगितले. यावर लोधी साहेबानी मला डोकं थंड ठेवण्याचा सल्ला दिला व म्हटले तू ह्यात काय मदत करू शकतोस ह्याचा विचार कर!

पुरवणीच्या चौथ्या पानावर खुशवंत सिंग ह्यांचा चांगला लेख होता. तो आपण पहिल्या पानावर घेऊ असे सांगितले. आक्षेपार्ह लेख काढून टाकल्यावर ती जागा कशी भरणार असे त्यानी मला विचारले. मी ती जबाबदारी स्वीकारली. दिवाळीची ग्रिटिंग्ज, रोषणाईचे, भाऊबिजेचे फोटो आणले. जागा भरली. ती पुरवणी छापली!

दुसऱ्या दिवशी पाकिस्तानी डेप्युटी एडिटरने ती पुरवणी पाहिली व त्याचे डोकेच फिरले. कारण त्याने जाणूनबुजून तो आक्षेपार्ह लेख टाकलेला होता व मी त्याला केराची टोपली दाखवली होती.

अशा प्रकारचे अनुभव गाठीला बांधत माझा दुबईचा प्रवास चालू झाला होता. दिलीप सांगू लागला... १९८० साली आमचे मशिन बाजूच्या जागेत हलवायचे होते. लंडनच्या कंपनीने त्यासाठी खूप खर्च सांगितला. माझ्या पाकिस्तानी मॅनेजरने मला विचारले, दिलीप, आप ये काम कर सकते हो क्या? एका इलेक्ट्रिशियनला घेऊन मी ४ दिवसात हे काम पूर्ण केले. हे जेव्हा माझ्याबरोबर काम केलेल्या Bill Miller या प्रेस मॅनेजरला कळले तेव्हा त्याने मला अबुधाबीला Al Wahada News Paperच्या ऑफिसमध्ये बोलावले. तो अबुधाबीला Gulf News पेक्षा मोठे मशिन बसवायला



लंडनहून आला होता. त्याने मला दुप्पट पगाराची offer दिली व अशा प्रकारे १ जानेवारी १९८१ रोजी मी अबुधाबीला नवीन कंपनीत रूजू झालो. माझी वरात दुबईहून अबुधाबीला पोहोचली.

या कंपनीत सर्वांत मोठी अडचण भाषेची आली. कारण सहकारी सर्व लेबेनान, इजिप्त, सिरिया अशा इतर अरब राष्ट्रांतले होते. आणि अरबी भाषेतच बोलायचे. पण माझी हा अडचण केरळातील दोन हेल्पर माझ्याबरोबर होते त्यांनी दूर केली. त्यांना ही भाषा अवगत होती. त्यांच्याजवळ मी अरबी भाषा बोलायला शिकलो. या कंपनीत आधीसारखीच रात्रपाळी होती, पण कामाचा ताण कमी होता. सकाळी झोप झाली की मला माझा फोटोग्राफीचा छंद जोपासायला वेळ मिळत असे. याच वेळी Market Research कंपनीचे पार्ट टाईम कामही मिळाले व पैसेही चांगले मिळू लागले.

अशाप्रकारे माझे बस्तान बऱ्यापैकी बसले व येथूनच माझ्या आवडत्या छंदासाठी फोटोग्राफीसाठी मी वेळ देऊ लागलो. फोटोग्राफी ज्याच्या रक्तात भिनली तो दिलीप फोटोग्राफीवर अगदी दिलखुलास बोलू लागला. म्हणाला... आणि इथूनच पुढे माझा फोटोग्राफीचा छंदही वाढीस लागला.

अबुधाबीच्या इंडियन हायस्कूलच्या कार्यक्रमासाठी माझे काही मित्र भारतातून आले होते. त्यावेळी त्याना भेटायला म्हणून मी गेलो तेव्हा त्या मित्रानी त्या मॅनेजरशी माझी फोटोग्राफर म्हणून ओळख करून दिली. तिथले सेल्स मॅनेजर निवृत्त झाले त्या निरोप समारंभाचे फोटो मी काढले व तेव्हापासून अबुधाबी एअर इंडियाच्या ऑफिसमध्ये मला फोटोग्राफर म्हणून ओळखू लागले.

अबुधाबीच्या मॅनेजरना एकदा भेटायला घरी गेलो. तेथे पाकचा माजी कर्णधार आसिफ इक्बालची भेट झाली. मी संदीप पाटीलच्या षट्कार मासिकासाठी फोटोग्राफी करतो असे त्याना सांगितले व विचारले मला शारजा स्पर्धेच्यावेळी प्रेस पास मिळेल का? त्याने म्हटले संदीपचे पत्र आण, तुला पास नक्की मिळेल. १९८३ साली मला पहिल्यांदा press-pass मिळाला; आणि सीमारेषेजवळ बसून फोटो काढण्याची संधी मिळाली. यानंतर शारजातील प्रत्येक मॅचला मी जाऊ लागलो. फोटोग्राफर म्हणून बस्तान बसू लागले.

इकडे १९८५ नंतर Gulf News चा पसारा वाढत होता. विक्रम व्होरा हे नवीन संपादक म्हणून आले होते. नवीन नवीन मोठी मशिन्स येत होती. त्या installation साठी माझी नेमणूक होत होती, पण पगार वाढ होत नव्हती. म्हणून अखेर १९९४ मध्ये Gulf News मध्ये राजीनामा दिला व मुंबईला परतलो.

या दरम्यान माझी पत्नी आशाश्री हिचा Emirates Airlines मध्ये जॉब चालू होता. माझी फोटोग्राफी जोरदार चालू होती. त्याचवेळेस नव्या मुंबईत मी एक 'Ashadeep Tours & Travel' हे ऑफिस सुरू केले. १९९७ साली १२ जणांचा पहिला ग्रूप दुबईला आणला. पण त्या काळात नव्या मुंबईत टेलिफोनच्या एवढ्या अडचणी होत्या की, ते ऑफिस बंद करावे लागले.

Tour कंपनीचा अनुभव सांगताना दिलीपला आठवण झाली एका प्रसंगाची. १९९७-९८ साली कॅनडामध्ये सहारा कपचे भारत-पाकिस्तान यांचे क्रिकेटचे सामने होते. १५ जणांच्या टूरचे पॅकेज होते. दिल्लीला Visa साठी माझा मित्र सर्व पासपोर्ट घेऊन कॅनडाच्या दूतावासात गेला. पण ग्रूप Visa नाकारला गेला. कारण त्या ग्रूपमध्ये ५/६ माणसे पटेल या नावाची होती. पटेल नावाच्या माणसाना कॅनडाने Visa देणे बंद केले होते. कारण त्या आधी पटेल नावाचे खूप पर्यटक तिथे गेले; पण ते पुन्हा भारतात परत आलेच नाहीत.

यानंतर Gulf News मध्ये माझ्या प्रेसच्या अनुभवामुळे Production Department ला Shift Manager म्हणून ऑफर दिली.

माझे फोटोग्राफीचे काम जोरात सुरू होते. साधारणतः १॥ वर्षे Emirates Airlines च्या Training Center च्या assignments मला मिळाल्या. तसेच Dubai Duty Free चे कामही चालू आहे.

फोटोग्राफी बद्दल सांगताना दिलीप भरभरून बोलू

लागला. फोटोग्राफी हा छंद digital camera येण्यापूर्वी फार महागडा होता. पण म्हणतात ना हौसेला मोल नसते आणि त्यामुळेच माझा छंद जोपासत राहिलो. फोटोग्राफीची पुस्तके वाचून ज्ञान वाढवत राहिलो, निरनिराळे प्रयोग करत राहिलो.




माझ्याकडून सर्वात जास्त फोटोग्राफी झाली असेल तर ती क्रिकेटची! जरी मी गल्लीपुरतेच क्रिकेट खेळलो असलो तरी फोटोग्राफी मात्र विश्वचषकाची सुद्धा केली. १९८३ मध्ये संदीप पाटीलच्या षटकार पाक्षिकातर्फे शारजा स्टेडियमचा प्रेस फोटोग्राफीचा परवाना मिळाला. Net practice मध्ये खेळाडूंचे जवळून फोटो घेता आले. सीम रेषेवर बसून खेळातील महत्त्वाचे क्षण टिपण्यातील आनंद काही औरच आहे.

शारजा क्रिकेट मैदानावर क्रिकेटचे नामवंत पत्रकार द्वारकानाथ संझगिरी यांच्याशी तसेच लोकसत्तेचे क्रीडापत्रकार विनायक दळवी तसेच षटकारचे उमेश आठलेकर, संजय कऱ्हाडे अशा मुंबईच्या नामवंत पत्रकार व छायाचित्रकार यांच्याशी ओळख झाली व त्याचे मैत्रीत रुपांतर झाले. जीवनाच्या प्रवासात असा मित्रपरिवार मिळणे ही आयुष्यातील मोठी कमाईच होय.

शारजा क्रिकेटची छायाचित्रे लोकसत्ता, लोकप्रभा, साम ना, Mid-Day, Afternoon मध्ये छापून येऊ लागली. या योगाने पत्रकारांबरोबरच क्रिकेट खेळाडूंच्याही ओळखी झाल्या. अजित वाडेकर, दिलीप वेंगसरकर, किरण मोरे, चंद्रकांत पंडित, प्रविण आमरे, विनोद कांबळी, आगरकर व सचिन तेंडुलकर असा जगप्रसिद्ध खेळाडूंकडून त्यांच्या काढलेल्या फोटोंची प्रशंसा ऐकली व मन धन्य झाले.

हरभजनसिंग शारजात जेव्हा पहिल्यांदा मॅच खेळला तेव्हा मी त्याचे Action Photo काढले. ते पाहून तो एवढा खूश झाला व म्हणाला, ''आप मुझे मेरे फोटो दे सकते हो, पैसे बताओ, मै पैसे दे दूँगा।'' मी त्या म्हटले, ''पैसे की बात छोडो....आपको अच्छे लगे है तो आप लेलो।'' त्याचा प्रसन्न झालेला चेहेरा हाच माझी कमाई होती. तसेच अहमदाबादला दक्षिण आफ्रिकेबरोबरचा कसोटी सामना आपण ३॥ दिवसात जिंकला. दुसऱ्या डावात श्रीनाथने ६ गडी बाद केले. त्यावेळचे टिपलेले क्षण पाहून त्याने दिलेली दाद हीच माझी पावती होती.

शारजात U.A.E. चा क्रिकेट संघ खेळला. त्यात




एकमेव अरब खेळाडू होता. तो म्हणजे संघाचा कर्णधार सुलतान झरवानी. भारताबरोबर झालेल्या सामन्यात त्याने आपल्या गोलंदाजीवर पहिली आंतरराष्ट्रीय विकेट घेतली ती सचिन तेंडुलकरची! झरवानीच्या चेंडूवर यष्टिरक्षकाने सचिनचा झेल घेतला होता, तेव्हा सचिनने मागे वळून पाहिले तो क्षण....त्याच्या चेहऱ्यावरचे ते भाव व झेल घेतल्यावर झरवानी हवेत झेपावला तो क्षण मी माझ्या कॅमेऱ्यात बंदिस्त केला. ती छायाचित्रे मी झरवानीला दिली तेव्हा तो खूपच खूश झाला. त्याने मला १००० दरहॅम बक्षिस दिले.

सचिन तेंडुलकरचे लग्न झाले तेव्हा मी मुंबईतच होतो. लग्नाच्या दिवशी ८०-१०० फोटोग्राफर हॉलच्या बाहेर ठाण मांडून बसले होते. मीही त्यातीलच एक होतो. लग्नविधी पार पडल्यावर सचिन व अंजली आमच्यासमोर आले. दोघांचे चेहेरे गंभीर होते. थोडा तो हसो यार....काही फोटोग्राफरनी मागणी केली....एवढ्यात एक फोटोग्राफर काहीतरी बोलला....व दोघेजण दिलखुलास हसले व माझ्या कॅमेऱ्याने ते क्षण टिपले. दुसऱ्या दिवशी प्रेस व टीव्ही चैनलवाल्यांसाठी पार्टी होती, त्यावेळी तो 'हसरा फोटो' सोनेरी फ्रेममध्ये घालून त्यांना दिला.

१९९२ साली ऑस्ट्रेलियात झालेल्या विश्वचषक साम न्याचे सिडनी येथील चित्रण मी केले. त्यावेळी Tele lens ची आवश्यकता होती. त्यावेळी मी दुबईहून हॉंगकॉंगला गेलो. Lens विकत घेतली व सिडनीला गेलो.

१९९६ साली भारतात झालेल्या विश्वचषक सामन्याच्या चित्रणाची संधी मिळाली. कलकत्त्यातील उद्घाटन सोहळा, बंगलोरचा भारत-पाक सामना व कलकत्त्यातील उपान्त्य फेरीतील सामना ही त्याची वैशिष्ट्ये होती. लोकप्रभा साप्ताहिक व सामना वर्तमानपत्रात दिलीप खेडेकर या नावाखाली फोटोंचा पाऊस पडला होता. 'सचिन विरुद्ध शेन वॉर्न' या लोकप्रभेच्या Cover Story साठी माझेच Action Photo छापण्यात आले होते.

आठवणीचे रीळ उलडगून दिलीप अनुभव सांगत होता.... दुबई स्टेडियम, अबुधाबी स्टेडियम....त्यांचे भूमिपूजन, उद्घाटन सोहळे यांना कॅमेऱ्याच्या चौकटीत त्याने बंदिस्त केले आहे.

सचिन तेंडुलकरच्या कसोटी क्रिकेटमधील शेवटच्या सामन्याचे चित्रण, त्याचे फोटो काढण्याचे भाग्य लाभले. बोलताबोलता या सामन्याच्या आठवणीतही दिलीप भावविवश झाला. उत्तम खेळाडू, त्याहीपेक्षा अधिक एक सत्शील माणूस म्हणून सचिनची जी ख्याती होती, त्या आठवणींनी दिलीप सद्गदित झाला. सचिनच्या आठवणीतून बाहेर पडत दिलीपने पुन्हा संभाषणाचा धागा पकडला व तो सांगू लागला....

क्रिकेट व्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय गोल्फ व टेनिस सामन्यांचे तसेच दुबईतील Air Shows चेही छायाचित्रण केले. १९९० साली जेव्हा कुवेत-इराक war सुरू झाले तेव्हा द्वारकानाथ संझगिरी व विनायक दळवी यांच्या आग्रहावरून या युद्धाचे अरब अमिरातीत काय पडसाद उमटतात, याच्यावर अनेक लेख मी लोकसत्तेला लिहून पाठवले.

महाराष्ट्र मंडळाच्या स्मरणिकेत तसेच विश्व साहित्य-संमेलनाच्या कार्यक्रमात फोटोग्राफर, पत्रकार म्हणून माझा सहभाग होता. तसेच गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमच्या Maha-Biz ह्या संमेलनाच्या स्मरणिकेतही माझा सहभाग होता.

आता सध्या सिद्धेश टूर्स या नावाने सुरू केलेल्या पर्यटन व्यवसायाचे काम चालू आहे व तो सर्वांगांनी वृद्धिंगत व्हावा यासाठी....

दिलीपला मध्येच थांबवत मी म्हटले....यासाठी आम्हा सर्वांच्या तुला खूप खूप शुभेच्छा! मुद्रण व्यवसायात शिरून, त्यातूनच पत्रकारिता, पर्यटन व्यवसाय व फोटोग्राफर म्हणून स्थान मिळवलेस. अनेक प्रसिद्ध व्यक्तींच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण तुझ्या कॅमेऱ्याने टिपले; जे भविष्यातील सर्वांना आनंद देतील. पैशाबरोबरच त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे गोड वाणीने तू अनेक माणसे जोडलीस, अनामिक नाते निर्माण केलेस, असे हे तुझ्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू पुढील पिढीला मार्गदर्शक ठरतील!

# दुबई - एक आध्यात्मिक दृष्टीकोन

**आधुनिक सौंदर्याने नटलेल्या सजलेल्या दुबईत अध्यात्म? हो कारण जिथे मराठी माणूस आहे.... जिथे मराठी मन आहे....तिथे आध्यात्म हे येणारच. कारण मराठी संस्कृतीचा पायाच आध्यात्म आहे. ज्यांच्या स्वानुभवातून जीवनाचे सार सांगितले, मानवतेची विश्वधर्माची, अद्वैताची शिकवण दिली अशा थोर संतांची परंपरा म्हणजे आमची मायबोली मराठी. अशा या मायबोलीच्या साहित्याची.... त्यातील आध्यात्माची ओळख दुबईतील दासबोध समूह रसिकांना करून देतो. दररोजच्या तणावपूर्ण जीवनातून आनंदाचा मार्ग दाखवतो....वाळवंटातही हिरवळ फुलवतो.**

### दुबईची यशोगाथा

दोन दशकांपूर्वी दुबई हे आखाती देशातील एक लहानशी बाजारपेठ म्हणून ओळखली जात होती. जागतिक नकाशावर त्याची फारशी ओळख नव्हती. मागील दशकात दुबईच्या वाढत्या विकासाचा आलेख इतका उंच गेला की, तो एक जागतिक आश्चर्याचा विषय झाला आहे. हा विकास समाजाच्या विभिन्न अंगांमध्ये उदाहरणार्थ कला, साहित्य, शिक्षण, आरोग्य वगैरे क्षेत्रातही दिसून येतो. ह्या सर्व क्षेत्रात विकासाचा उच्चांक कसा गाठता येईल याची जणूकाही या ठिकाणी ओढ / स्पर्धा निर्माण झाल्यासारखी भासते.

### समाजातील सांस्कृतिक विविधता

बराचशा देशाचे लोक दुबईमध्ये वर्षांनुवर्षे अस्थायी नागरिकत्व (non-resident) घेऊन राहात आहेत. जगामध्ये अशा प्रकारच्या शहरांमध्ये (international cities) दुबईचा क्रमांक बराच वरचा आहे. म्हणून येथील समाजात सांस्कृतिक विभिन्नता भरपूर आढळते. पण ही विभिन्नता अस्तित्वात असूनही ह्या ठिकाणी सर्वसाधारणपणे सहकार्यता, शांतता, सुरक्षितता आढळते. जगभर अशांततेचे वातावरण दृष्टीपथात येत आहे आणि त्या पार्श्वभूमीत येथील समाजात शांतता नांदणे हे एक सुखावह आहे, ती एक जमेची बाजू आहे.

### अध्यात्मिक संस्कृती

भारतात ज्याला आम्ही आधुनिक संप्रदायांच्या नावाने ओळखतो, त्या त्या संप्रदायांची उपासना ह्या ठिकाणी भारतीय समाजात प्रचुरतेने पाहण्यास मिळते. योगासन / प्राणायाम नियमितप्रमाणे करणारे समूह बरेच पाहण्यात येतात, पण त्याशिवाय इस्कॉन, स्वाध्याय, आर्ट ऑफ लिविंग, विपःशना, राधा स्वामी सत्संग, ईश्वरीय ब्रह्म कुमारी संस्था, स्वामी नारायण संस्था, सत्य साईबाबा उपासना, संत कलावती आई, संत अनिरुद्ध बापू व संत नाना धर्माधिकारी ह्यांचे उपासनासमूह ही पाहण्यात येतात. दुबईमध्ये ह्या साधना कृष्णमंदिर, शिवमंदिर, कम्युनिटी सेंटर, गुरूद्वारा किंवा व्यक्तिगत मोठ्या जागेमध्ये होताना दिसतात. गणपती उत्सव, कृष्ण जन्माष्टमी, महाशिवरात्री हे उत्सव वरील मंदिरात, तर



**डॉ. किशोर निमखेडकर**
kishor555@hotmail.com



गुरुनानकजींचा उत्सव गुरूद्वारात संपन्न होतो. ह्या शिवाय वरील ठिकाणी दररोज त्यांच्या पद्धतीप्रमाणे भजन, पूजन, कीर्तन, नामस्मरण उपासनाही चालत असतात. लहान मुलांना आपल्या संस्कृतीबद्दल माहिती हवी म्हणून संस्कार वर्गही चालवले जातात व त्यात प्रतियोगिता वगैरे ठेवून, त्यांना त्यात आवड व उत्साह निर्माण व्हावा याची दखल घेतली जाते. तसेच मोठ्या प्रमाणावर दिवसभर चालणारे सांस्कृतिक सोहोळे, अयाप्पा पूजा, अध्यात्म संगीत, कीर्तन व प्रवचन स्वरूपातही पाहण्यात येतात. बऱ्याच वर्षापासून विपःशना उपासनेचे दहा दिवसांचे वर्ग वर्षातून दोन वेळा इथे संपन्न होत आहेत.

गणपती उत्सव हा महाराष्ट्र मंडळातर्फे दुबईत मागील चाळीस वर्षांपासून संपन्न होतो आहे. मागील काही वर्षांपासून तो येथील कम्युनिटी सेंटरमध्ये होतो. रोज पाच दिवस पूजा, आरती व विविध सांस्कृतिक कार्यक्रम करून साजरा केला जातो व शेवटच्या दिवशी त्याचे बोटीने अरबी महासागरात विसर्जन केले जाते.

इतरही पुष्कळ ठिकाणी घरोघरी वैयक्तिक स्वरूपात मोठ्या मोठ्या आकाराच्या गणपतींची स्थापना केलेली पाहण्यात येते आणि दर्शनाच्या निमित्ताने एक दुसऱ्याची भेट होऊन उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आढळते. समुद्रावरही व्यक्तिगत किंवा सामूहिक गणपती विसर्जनासाठी बोटी घेऊन जाण्यास तयार असतात, जणू हा उत्सव त्यांच्या व्यवसायात भर पाडतो. ओनम, दिवाळी, होळी हेही सण पारंपरिक रीतीने साजरे केले जातात. होळीचे रंग मात्र एखाद्या विशिष्ट जागेमध्येच खेळले जातात.

मानवाला आपल्या समाज संस्कृतीच्या व्यतिरिक्त जीवनात राहता येणे कठीण असते. आपण आपल्या समाज संस्कृतीत वावरत नसू तर, जीवनात काहीतरी कमी आहे हे नेहमी जाणवते. येथे भारतीय समाज मोठा असल्याने तसे जाणवत नाही. दुबई भारताजवळ दोन तासांच्या हवाई उड्डाणावर असल्याने आपण आपल्या देशापासून दूर आहोत ही जाणीव तीव्रतेने भासत नाही.

### दासबोध अभ्यासवर्गाची ओळख

बऱ्याच वर्षांपासून वेदांताची आवड असणारी काही मराठी मंडळी अभ्यासाच्या दृष्टीने आठवड्याच्या सुट्टीमधे एकत्र येत होती, पण ह्यात नियमितपणा २००१ सालापासून आला. ह्याच वेळेस दासबोध ग्रंथाचा अभ्यास सुरू झाला. तो जवळ जवळ १२ वर्षं चालला आणि म्हणूनच या वर्गाला 'दासबोध अभ्यासवर्ग' हे नाव सहजरित्या प्राप्त झाले. २००१ सालापासून प्रत्येक शुक्रवारी दुपारी ११.३० ते १ हा अभ्यासवर्ग होतो.

ज्ञानसत्र - एखाद्या साधकाच्या व्यक्तिगत मोठ्या हॉलमध्ये ही बैठक संपन्न होते. सुरुवातीला नामघोष व संतांचे नमन करून एक किंवा दोन साधक अभ्यासाचे प्रतिनिधित्व करतात. आपले विचार मांडताना विषयाला धरून साधकाला साधनेला उपयुक्त असणाऱ्या विचारांवर / मुद्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. सर्व साधकांना मनमोकळेपणाने आपले विचार प्रकट करण्याची मुभा असते. शेवटी शंकराचार्यांच्या आत्मशटकाच्या प्रस्तुतीत (चिदानंद रूपं शिवोहं शिवोहं...) वाणी विराम पावते व ध्यानात त्याचे रूपांतरण होऊन 'ॐ पूर्ण मद...' उद्घोषात अभ्यासवर्गाची सांगता होते.

हा क्रम अव्याहत मागील १३, १४ वर्षांपासून चालू आहे. दासबोध ग्रंथाचा अभ्यास झाल्यावर प्रामुख्याने श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचा अभ्यास सध्या चालू आहे. संतवाङ्मयाचा अभ्यास सुद्धा संतांच्या विशेष तिथीला अनुसरून केला जातो. महाराष्ट्रातील काही संतांनी वेळोवेळी या ठिकाणी भेट देऊन ह्या अभ्यासवर्गाला आशीर्वाद देऊन मार्गदर्शन केले आहे. संत डॉ. श्री.द. देशमुख यांचा वाटा मार्गदर्शनात फार मोठा आहे. इतर संत श्री. सुनीलजी चिंचोलकर, गुरुवर्य शंकर अभ्यंकर यांचेही मार्गदर्शन या वर्गाला लाभले आहे. ह्या संतांच्या मार्गदर्शनाने ह्या अभ्यासवर्गाला एक दिशा मिळाली व एक निश्चित स्वरूप प्राप्त झाले. या वर्गात असलेले मराठी साधक हे बहुतांश महाराष्ट्र मंडळ दुबईचे सभासद असल्यामुळे व मंडळाबरोबर सहभागी होऊन अध्यात्मिक कार्यक्रम केल्यामुळे, जणूकाही ही मंडळाची एक स्पिरिच्युअल विंग आहे असा भास होतो.

### दासबोध अभ्यासवर्गाचा उद्देश (तत्त्वज्ञानाचा मागोवा)

प्रत्येक जीव सुखासाठी धडपडत असतो. इच्छा किंवा

वासना मनुष्याला स्वस्थ बसू देत नाही. आयुष्यभर वासनेच्या मागे लागून त्याची पूर्तता करण्याकरिता मनुष्य जीवाचा आटापीटा करतो. कधी ती पूर्ण होते, तर लागलीच नवीन वासना निर्माण होऊन सतत काहीतरी कमी आहे, अभाव आहे असे वाटत राहते. वासना हा रोग आहे, आपण रोगी आहोत, हे आपले आपल्याला कळत नाही.

मानवी जीवन अपूर्ण असल्याने कितीही ते पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तरी ते अपूर्णच राहणार. पूर्णत्वाचे स्वरूप (खरा मी कोण?) समजले तरच पूर्ण समाधान प्रगट होते.

मन जणू एक आरसा आहे व ह्या आरशावर सतत विचार-विकारांची धूळ चढत असते. सद्‌गुरूंचे, संतांचे सान्निध्य, त्यांचे मार्गदर्शन, संत वाङ्मय, दासबोध, ज्ञानेश्वरी अशा ग्रंथांचे वाचन ही ह्या मनरूपी आरशावरची धूळ झाडण्यास मदत करतात.

प्रयत्नांच्या सातत्याने मनातले अनावश्यकविचार व विकार कमी होत जातात. त्यापासून एकप्रकारची अलिप्तता निर्माण होते व जीवाला स्वतःमधल्या आनंदाच्या उगमाची अनुभूती येण्यास सुरुवात होते. आपल्या उपासनेत तो डुंबू लागतो व प्रेम आणि शांतता व्यवहारात डोकावू लागतात.

दासबोध अभ्यासवर्गाचा प्रवास हा वरील वृत्तान्ताला अनुसरून चाललेला आहे. या अभ्यासाने साधकाला जीवनाच्या वास्तवतेबद्दल पुष्कळ समज येते. त्याच्या व्यवहारात साधनेत अनुकूल बदल होतो. प्रपंचात राहून ही साधना करणाऱ्या साधकाचे जीवन वरच्या पातळीवर जाते व त्याच्या सहवासाने समाजाच्या इतर माणसांचे जीवनसुद्धा काही अंशी उंचावते. हा प्रत्यक्ष अनुभव ह्या वर्गातून मिळतो.

प्रारब्धाने प्राप्त झालेल्या प्रपंचाच्या मर्यादा न सोडता हा अभ्यास करून व त्याला प्रत्यक्ष जीवनात आणून स्थूल संसारमय दृष्टी (सूक्ष्म) शुद्ध चैतन्य स्वरूप (to experience Divinity) करण्याचा प्रयत्न करणे.

विचारांची देवाण-घेवाण, उत्सव, सोहोळे आयोजित करून पोषाक वातावरण निर्मिती करणे व नवीन येणाऱ्या पिढीला जीवनातून उत्पन्न होणाऱ्या तत्त्वज्ञानाची ओळख करून देणे हे दासबोध अभ्यासवर्गाचे उद्दिष्ट / लक्ष्य आहे.

लिखा लिखी नही, देखा देखी की बात।
दुल्हा दुल्हन की शादी हुई, फीकी पडी बरात॥



# कविता

१९७६ च्या जून महिन्यात अशोक व मेघना वर्तक या पतीपत्नींनी दुबईच्या वाळवंटात पहिले पाऊल ठेवले. बघता बघता ३८ वर्षांचा कालखंड लोटला. दुबई हीच कर्मभूमी झाली. ह्या दीर्घ कालावधीत बाळबोध, साधीसुधी दुबई कशी बदलत गेली....आधुनिकतेने कशी नटली सजली ह्याचे काव्यरूपात वर्णन करून, अखेरीस ज्या दुबईने अनंत हस्ते सुखसमृद्धीचे माप पदरी टाकले त्या दुबईला ही काव्यरूपी भावफुलांची माला अर्पून कृतज्ञता व्यक्त केली आहे.... मेघना वर्तक यांनी!

## दुबई....३८ वर्षे!

७६च्या जून मासी पाऊल ठेविले परदेशी
स्वप्न उद्याचे उरी घेऊनी दुबईच्या ह्या वाळवंटी

तऱ्हेतऱ्हेच्या कथा ऐकिल्या दुबई शहरासंबंधी
पाय खेचण्या सल्ले दिधले हितचिंतक अन् शत्रूंनी

''नाही पाणी' 'नाही लोणी'; कशास जाता परदेशी?
सुरक्षितही नाही दुबई, परतुनी फिराल माघारी;''

निश्चय केला, मनी ठसविला, मार्ग परतीचा बंदची केला
काटेरी या वाटेवरती, खडतर प्रवास सुरू जाहला

नाही इमारती, नाही रस्ते, चहूबाजूला वाळूचवाळू
नाही बगीचा, नाही सावली, आधार द्याया कुणीही नाही

एकमेका साथ देऊनी कष्ट साहिले जोडीने
सुखदुःखाचे क्षण वेचियले, तीन मुलांच्या साक्षीने

बघता बघता दिन हे सरले, ३८ वर्षे होऊनी गेली
कर्मभूमी ही दुबई झाली, सुखसमृद्धी तिनेच दिधली

वाहतुकीचे साधन नव्हते, बसेस किंवा मेट्रोही
'अभ्रा' नामक 'तरी' बोटही, करी सेवा 'डेरा दुबई'

'बर' दुबई, 'डेरा' दुबई, असती जुळ्या बहिणी-बहिणी
इकडून तिकडे जाण्यासाठी, खाडी खालुनी टनेल जाई

क्लॉक टॉवर, फ्लेम टॉवर, ट्रेड सेंटरचा उंच टॉवर
दुबईचे हे गौरव असती, लँड मार्क हे प्रसिद्ध होती

नव्हता क्यू नव्हत्या रांगा, तिकिटांसाठी नव्हता दंगा
तेलाच्या ह्या देशामध्ये, पेट्रोलची वाही गंगा

शुभ्रधवल तन्दुरावरी, असे 'अगाळ' शिरावरी
नाकावरती असे नकोडा, काळा बुरखा पेहराव जरी

नमाज पडण्या जाती मशिदी, नित्यनेमे शुक्रवारी
रोझे ठेवूनी पूर्ण मासभरी, आदर दाविती अल्लाप्रति

निसर्गाची कृपा नव्हती, वाळवंटावर दुबईच्या
शुष्क ओसाड वाळू चहूकडे, पर्जन्याच्या धारा नव्हत्या

ग्रीष्म ऋतूचे चार मास हे, आसमंत वणवा भासे
तप्तभूमी ही पायाखाली, सूर्यकिरण हे डोईवरी

उदयम केला उंटावरूनी, कष्ट साहिले अरबी जनांनी
सागरातूनी मोती शोधिले, ओंजळ भरूनी सुखही मिळाले

नव्हता पैसा, नव्हते शिक्षण, परी जगण्याची जिद्द ही होती
संकटांशी टक्कर देऊनी, निसर्गावर मातची केली

राजा इथला असे शेख हा, मिळे राज्य हे परंपरेने
सोने करूनी या संधीचे, भूषण ठरले या देशाचे

खिजगणतीतही नाव नव्हते, उपेक्षित ही दुबई जरी
अग्रभागी नाव झळकले, जगताच्या ह्या नकाशावरी

श्रेय असे जरी अरबी जनांना, आणिक त्यांच्या संस्कृतीला
राज्यकर्त्यांच्या दूरदृष्टीला, सामावण्याच्या वृत्तीला

जो तो आपुला धर्म पाळतो, बंधन नाही कुणावरी
पेहेरावाची सक्ती नाही, आदर ठेवू संस्कृतीप्रति

अनेक देशी, अनेक वर्णी, अनेक धर्मी भाषिकही
एकमेका समजुनी घेती, गुण्यागोविंदे इथे नांदती

विविध तऱ्हेच्या चालीरीती, मानवाचे स्वभाव असती
स्वातंत्र्य असे अबाधित जरी, दुबईमध्ये समरस होती

ईश्वराची किमया न्यारी, अमिर बनविले तेलाने
प्रगती केली योग्य दिशेने, मार्ग आखुनी दूरदृष्टीने

नव्हत्या शाळा, महाविद्यालय, अशिक्षित ही सारी जनता
शिक्षणाचे मर्म जाणुनी अग्रभागी स्थान प्रगतीला

स्वकष्टाने प्रयत्न करूनी, कण रगडिले वाळूचे
तेल त्यातुनी गळुनी आले, आदर्श ठेविला जगापुढे

चिमुकल्या रोपट्याचा, बघता बघता वृक्ष झाला
वटवृक्षाच्या सावलीत ह्या, मिळे निवारा घरकुलांना

छोटीशी ही दुबई अमुची, चेहरामोहरा तिचा बदलला
असे वाटते कुठे हरवली, वाळूमध्ये जाऊनी लपली!

नव्या जुन्याचा संगम साधुनी, नवे लेणे दुबई ल्याली
पर्यटकांचे लक्ष्य वेधुनी, आकर्षण हे त्यांचे ठरली

वाळू जाऊनी रस्ते आले, नागमोडी वळणांचे
मक्तुम ब्रीज, गरूद ब्रीज, जंगल पसरे नवीन ब्रीजचे

सेकंड इंटरचेंज, थर्ड इंटरचेंज, एक्झिट त्यावरी वसलेले
एक्झिट घेऊनी इथुनी तिथुनी, दुबईभर हा प्रवास घडे

स्थापत्य आणि कलेचा, संगम म्हणजे 'बूर्ज खलीफा'
दुबईचे ह्या भूषण होऊनी, जगतामधी श्रेष्ठची होई

टोवेरची ह्या रांग लागली, स्पर्श करती गगनाला
नेत्रदीपक कलाकृतींनी, शोभा आणिली दुबईला

रंगसंगती सुरेख साधुनी, झालर केली रस्त्यांना
तऱ्हेतऱ्हेची फुले पाहुनी, रिझवित अपुल्या नेत्रांना

हिरव्या गर्द मखमालीचे, बगिचे पसरती जागोजागी
वाळवंटाचे रूप बदलले, नंदनवन हे खरे जाहले

निशा येता काळोख पसरे, दुबईचे हे रूप पालटे
चांदण्यांचा सडा शिंपिते, सकल दुबई चमचम करते

रेड लाईन्स, ग्रीन लाईन्स, मेट्रोच्या ह्या अनेक शाखा
तनूमधे या रूधीर धावे, दुबई मध्ये मेट्रो धावे

सागरामधी उभे राहिले, 'बूर्ज अल अरब' हॉटेल हे
गौरवस्थान दुबईचे हे, आकर्षण हे पर्यटकांचे

पाम वृक्षाची प्रतिकृतीही, चितारली सागरामधी
कल्पकतेने रसिकतेने, व्हिले बांधिले शाखांवरी

फन सिटी, मीडिया सिटी, हेल्थ सिटी स्पोर्टस सिटी
इंटरनेट सिटी, नॉलेज सिटी, श्रेष्ठ आहे दुबई सिटी

दुबई मॉल, इमिरेट्स मॉल, इब्नबतुता वापी मॉल
मॉलची संस्कृती आली, दुबईचे रूप बदलून गेली

सिटी सेंटर, मझाया सेंटर, खलीज सेंटर, ओअयसिस सेंटर
शॉपिंगचे सेंटर दुबई झाली, पर्यटकांचे 'लक्ष्य' ठरली

हवाई जहाज इमिरेट्सचे, झेप घेई आकाशी
बघता बघता पंख पसरले, नाते जडले जगताशी

नाही कचरा, नाही प्रदूषण, दंगे, धोपे, चोऱ्यामाऱ्या
नाही प्रचार, नाही इलेक्शन, संथ शांत हे इथले जीवन

वीज, पाणी मुबलक आहे, नाही कशाची कमतरता
दुबईच्या ह्या वाळूमध्ये लाभे जीवा शांतता

आधुनिकतेने नटली सजली, नाही विसरली अपुली संस्कृती
भल्या पहाटे बांग होई मशिदीतल्या मिनारातुनी

परिस्थिती जी दिधली ईशाने, सामोरे जे हसत मुखाने
दिधली शिकवण ही दुबईने, आयुष्याचे केले सोने

स्वच्छतेची महती कथली, लहान-थोरा सर्वा पटली
मंदिरापरी स्वच्छ असावे, घरकुल अपुले शहरही अपुले

अतिथींचे स्वागत करण्या, दुबईकर हे तत्पर असती
आदरतिथ्य करण्यासाठी दरह्यामचा हिशोब न करती

संस्कारांची अशी शिदोरी दिधली आम्हा दुबईने
वर्धन करूनी जतन करण्या तत्पर राहू एकदिलाने

शून्यातुनी हे विश्व निर्मिले, खडतर प्रवास खरोखरी
प्रगती झाली दुबईची साक्षीदार जरी असू आम्ही

ह्याची देही, ह्याची डोळा, प्रगतीचा इतिहास पाहिला
सार्थ अभिमान वाटे, खारीचा हातभार लाविला

अनंतहस्ते कमलाकराने, दुबई पदरी माप टाकते
ओसांडूनी ही ओंजळ वाही, उणे जीवनी काही नाही

भावफुलांची अर्पुनी माला, व्यक्त करितो कृतज्ञता
निर्मात्याचा वरदहस्त हा, वाळवंटावरी सदा असू द्या

meghana.sahitya@gmail.com

महाराष्ट्र मंडळ - दुबईला, परदेशातील या माहेरघराला यंदा ४० वर्षे पूर्ण होत आहेत. गेली ३८ वर्षे आमचे मंडळाशी नाते जडले आहे. या प्रदीर्घ काळात अनेक अनुभव आले, अनेक आठवणी मनात घर करून राहिल्या. त्या शब्दांकित करण्याचा प्रयत्न केलाय, मेघना वर्तक यांनी...!

## चाळीशी, - महाराष्ट्र मंडळाची

मागं वळून बघताना मन कसं भरून आलं
कारण माझ्या लक्षात आलं, मंडळ चाळीशीचं झालं ॥१॥

चाळिशीत पदार्पण केले, महाराष्ट्र मंडळ दुबईने
आठशेच्या घरात सभासद गेले, एका हॉलमध्ये राहिनासे झाले ॥२॥

वाळवंटात लावलेल्या रोपट्याचा, बघता बघता वटवृक्ष झाला
काही पारंब्या जमिनीत गेल्या, स्वतःलाच वटवृक्ष समजू लागल्या ॥३॥

गुजराथी असो, कन्नड असो, सर्वांनाच आपली सावली दिली
महाराष्ट्राच्या मोठ्या मनाची, परदेशातही जाणीव दिली! ॥४॥

नवा खेळ, नवी विट्टी, नवीन कमिटी आली गेली
मागच्यांशी स्पर्धा करता, स्वतःची कला दाखवून गेली! ॥५॥

काही महारथी फारच हौशी, 'तख्त' सोडायला तयार नसती
काही फक्त टीका करती, काठावर बसून तीर मारती! ॥६॥

'तन-मन-धन' आपुले अर्पुनी, 'निःशब्द' कार्य काही करती
पुलंच्या 'नारायणाची' पदोपदी आठवण देती ॥७॥

काही नेहमी बॅक स्टेजला, काही 'फक्त' स्टेजवरी
व्यक्ती तितक्या प्रकृती असती, त्यातच दिसती चमत्कृती! ॥८॥

पण तरीही सर्वांना सामावून घेत, चाळीस वर्षे पार पडली
दुबईच्या ह्या माहेरघराची मराठी मनाला ओढ लागली! ॥९॥

चाळीस वर्षांच्या कालखंडात, अनेक उन्हाळे आले गेले
माहेरघरच्या मायेमुळे, चटके त्याचे विरून गेले ॥१०॥

नाट्य, संगीत, साहित्यातील अनेक दिग्गज दुबईत आले
कला अपुली सादर करून, रसिक मनांना रिझवून गेले ॥११॥

भीमसेन जोशींच्या दैवी सुरांनी, आकाशाला गवसणी घातली
मुक्ता बर्वेच्या 'फायनल ड्राफ्टने' रसिकांची मने जिंकली ॥१२॥

पाच दिवसांचा गणेशोत्सव, मराठी संस्कृतीचे अस्सल प्रतीक
लहान-थोर सर्व जमती, आरत्या आवर्तनात दंग होती ॥१३॥

बालमनांचे धागे जुळती परदेशातही मराठीशी
नाते जपण्या मायबोलीशी, वाट चालती वारकरी ॥१४॥

सुवर्ण जयंती, हीरक जयंती, शताब्दी होवो मंडळाची
परदेशस्थ पांथस्थांना सावली मिळो ह्या वटवृक्षाची! ॥१५॥

२०१२ मध्ये दुबईत दुसरे 'विश्व मराठी साहित्य संमेलन' आले. दुबईचे महाराष्ट्र मंडळ....परदेशातील माहेरघर....आमंत्रितांचे स्वागत करण्यासाठी, मायबोली मराठीचा झेंडा वाळवंटात उभारण्यासाठी सज्ज झाले होते....त्याचे वर्णन काव्यात्मक रूपात....मेघना वर्तक यांच्या शब्दांत -

## विश्व मराठी साहित्य संमेलन - दुबई!

सोनियाचा दिन उगवला, वाळवंटी मोगरा फुलला
संमेलनाची झुळूक आली, बकुळीचा गंध भरूनी गेली ॥१॥

मायबोली ही अमुची मराठी, म्या पामरे काय वर्णावी महती
साहित्याने नटुनी-थटुनी, रसिक मनांशी नाते जोडी ॥२॥

इवलेसे रोप, महाराष्ट्राच्या माती रुजली पाळे भारतभूमी
पादाक्रांत करी सातसमुद्रही, फुलवी हिरवळ वाळवंटी ॥३॥

मराठी मनांची हाक ऐकुनी, मंडळाची ह्या स्थापना झाली
मराठीची आस, महाराष्ट्राचा ध्यास, झेंडा उभारीला वाळवंटी! ॥४॥

दिन सरले, मास सरले, वर्षे सरली, कळले नाही
तीन तपांचा प्रवास करूनी, मंडळ अमुचे देई सावली! ॥५॥

महाराष्ट्र मंडळ दुबईचे हे परदेशातील माहेरघर हे
दारी उभारूनी गुढ्या-तोरणे, विश्वसंमेलना सज्ज जाहले ॥६॥

थोर वारसा आम्हा लाभुनी, वरदहस्त हा सरस्वती
साहित्यातील दिग्गज येती, संमेलना शोभा देती ॥७॥

प्रथम वंदुनी गजाननाला, स्मरूनी अपुल्या महाराष्ट्रा
भगवा झेंडा अटकेपारही, रूप आठवू शिवराया ॥८॥

संमेलना साक्षी ठेवूनी, शपथ घेऊ या एकमुखा
ज्ञान-तुकोबा कळसाचे हे तेज पसरू या दशदिशा ॥९॥





## चिंता, गाळीव रेती!

३० वर्षांचा प्रदीर्घ काळ....दुबईत वास्तव्य करून, आता मायदेशी परतले खरे पण ते शरीराने....त्यांचं हळवं मन अजून मागेच दुबईतच रेंगाळतं आहे. दुबईच्या वाळूशी जमलेले त्यांचे नाते अतूट आहे व म्हणूनच त्यांच्या 'चिंता' व 'गाळीव रेती' ह्या कवितांतून ह्या वाळूची....दुबईच्या सुरक्षिततेची चिंता डोकावते....व म्हणूनच ते म्हणतात....भवती ठिणग्या....येथ न याव्या....वादळी लाट शमून जाव्या.


**प्रसाद पाठारे**
prasad.p.pathare@gmail.com


### चिंता

बघता या वाळूवर येथे पहुडली स्वप्ननगरी ही धुंद
पाऊल अन् दृष्टी खिळलेली, पण मनी मायदेशीचे बंध.

•

सोनवर्ख या क्षितिजावरचा रंग बदलतो इंद्रधनूचा
आणि उजळतो हळूच अपुला घर परिसर सह्याद्रीतळीचा.
तारुण्याच्या भरात नगरी लिहीत आहे इतिहासावर
अपुल्य वैभवशाली बखरी, गर्व उफाळून यावा वर वर.

•

जाळीत चिंता एक अंतरी... भवती ठिणग्या... येथ न याव्या
शांत निजेच्या रात्रित साऱ्या वादळी लाटा शमून जाव्या.

### गाळीव रेती

इथे चाळणीतून ही धरती
गेली पसरून गाळीव रेती!

•

दैनंदिनीतून जरी न उसंत
सांजरंग झिरपती निवांत
अविश्रांत श्रम... घामेजून तन
मन शिणलेलं निजतं शांत.

स्वप्न उद्याचं क्षितिजावरती
खुलवत जाते गाळीव रेती.

•

ओसाडावर तवंग हिरवा
इमारतींचा नभी गवगवा
मानवी मती इथे परजते
संपत्तीचा फुलवा झुलवा.

जगभर वेचून रत्नं मोती
वैभव रचते गाळीव रेती.

•

अशांततेचं रिंगण भवती
सोसत हसते गाळीव रेती!




**नीतिन खानापूरकर**
nitinkhanapurkar@yahoo.com


### पैलतीर

दिसे पैलतीर तिथे वाळवंट
सुखरूप ठेवो, विनंती भगवंत

निघाला विठू मागे ठेऊन वीट
अंतरी सले मातीची एक खंत

जीवन-प्रवास गोडी अवीट
ना सखे, ना सोबती तूच एक अनंत !..

आठवणींची आता असे सोबत
विसरू नको मला, परतेपर्यंत

झेप घेतो गरूड आकाशात
भेट आपली आखातातील स्वप्नात !..


# दुबई आणि मी

**दुबईत येणारी सर्वजण, एक दोन वर्ष दुबईत राहायचे, पैसा साठवायचा थोडाफार व परत जायचे, या विचाराने येतात! पण दुबईत एकदा पाऊल टाकले की ते दुबईचेच होतात....वर्षे उलटतात.... आयुष्य सरते! दुबई त्यांची कर्मभूमी बनते....पण ह्यापाठीमागे काय रहस्य आहे....दुबईच्या वाळूत काय गूढ लपले आहे की सर्वांचे पाय ह्या वाळूतच आपोआप स्थिरावतात......ह्या लेखात, रहस्य उलगडले आहे गिरीश शिरसाळकर यांनी!**

कुणाचे अन्नोदक किंवा दाणापाणी कुठे लिहिलेले आहे याबद्दल नियतीचे काही नियम आहेत का, हे मला माहीत नाही. पण माझे अन्नोदक मात्र या आखाती दुबईत असेल असे मला स्वप्नातसुद्धा कधी वाटले नव्हते.

आर्किटेक्ट झाल्यावर, ३६ वर्षांपूर्वी फक्त दोनच वर्षांसाठी म्हणून मी दुबईमधे काम पत्करले. आर्किटेक्चरला असताना मधे एक वर्ष मी युरोपची हवाही चाखली होती. जर्मनी आणि हॉलंडचा सुंदर अनुभव हा ऐन स्वप्न बघायच्या वयात घेतलेला. तेव्हा 'दुबई ती काय असणार?' असा विचार मनात होता. दुबईचा उपयोग फक्त स्प्रिंग बोर्डसारखा करायचा आणि दोन वर्षांनी वेस्ट बाऊंड व्हायचे हे मनाशी पक्के ठरविलेले. सुरेखाला म्हणजे माझ्या प्रेयसीलाही असेच सांगून ह्या वाळवंटात आलेलो. दोन वर्षांनी लग्न, मग पुढे वेस्टला प्रस्थान, ही मनाशी बांधलेली खूणगाठ.

सगळे ठरविल्याप्रमाणे झाले तर मग नियतीची करामत ती काय? असा मी १९७८ साली जो दुबईला आलो तो इकडेच चिकटलो! पुढचे वर्ष शेवटचे, त्याच्यानंतरचे तर अगदी नक्की; असे म्हणत वर्षेच्या वर्षं उलटून गेली. नंतर नंतर जायचेही मनातून काढून टाकले. ४ वर्षांने स्वतःची प्रॅक्टीस चालू केली आणि मग उसंतच नव्हती. मधे सुरेखाशी लग्न झाले तेही दुबईतच. ते दुबईत वैदिक पद्धतीने झालेले पहिले वहिले लग्न १९८० साली. एका मित्राच्या वयस्क वडिलांनी कन्यादान केले. गुजराथी पुरोहिताने लग्न लावले. त्यांच्यामधे अंतरपाट व मंगलाष्टक नसतात. त्यामुळे आमच्या मराठी मित्रांचे काही समाधान झाले





गिरीश शिरसाळकर
shirsalkars@gmail.com



नाही. लगेच तात्पुरता अंतरपाट बनवून जेवढ्या जमतील तेवढ्या मंगलाष्टका 'शुभ मंगल सावधान' म्हणून मला सावध करण्यापर्यंत व शेवटी 'तदेव लग्नं...' करून शहनाई चौघड्याची कॅसेट लावण्यापर्यंतचे सगळे सोपस्कार केले. तर असो... असा मी पाकीटाला स्टॅम्प चिटकावा त्याप्रमाणे दुबईला घट्ट चिकटलो!

मध्यंतरीच्या काळात दुबई वाढतच होती. सगळ्या दिशेने प्रगती. रस्ते, इन्फ्रास्ट्रक्चर, सोशिओ इकॉनॉमिकल उत्कर्ष. शाळा आल्या. पंचतारांकीत हॉस्पिटल्स, वातानुकुलीत बसेस आणि आता मेट्रो. बघता बघता इथे उंटांचे रूपांतर मर्सिडीज बेंझ, बीएमडब्ल्यूमधे झाले. हळूहळू वाळवंटाचे नंदनवन झाले. विलक्षण झपाट्याने, बघता बघता ही नगरी लंडन, पॅरीस, न्यू यॉर्कच्या पातळीला जाऊन पोहोचली. युरोपला वास्तव्यासाठी गेलो नाही पण युरोपच इकडे आले! युरोपच काय अमेरिकाही इथे अवतरली! दुबई टुरिस्ट आकर्षण म्हणून जगाच्या नकाशावर झळकायला लागली. इथल्या रहिवाशांनाही ओळख पटू नये इतक्या वेगाने दुबई बदलली व आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजू लागली.

सुरुवातीला भारतातून येणाऱ्यांना ही नगरी भारतापेक्षा



## 'आब्रा'

'आब्रा' म्हणजे काय हे समजायला थोड्या प्रस्तावनेची जरूरी आहे. दुबई एक विलक्षण नगरी आहे. मी जेव्हा इकडे आलो (१९७८) त्यावेळी इथे ७५% वाळवंटच होते. गाड्या, रस्ते खूपच कमी होते. लंडन, पॅरीस, चिकॅगो वगैरे प्रसिद्ध शहरांमध्ये नदी हा प्रमुख भाग आहे; ज्याच्या भोवती ही शहरे वसलेली आहेत. त्याप्रमाणे दुबईमधे दळणवळणाची मुख्य वाहिनी होती (आहे) ती म्हणजे इथली खाडी (दुबई क्रीक म्हणून प्रसिद्ध). दुबई शहर हे ह्या क्रीकमुळे विभागले गेले आहे.

एका बाजूला 'देअरा' ('डेरा टाकणे' ह्याचा अपभ्रंश) आणि दुसरी बाजू 'पार दुबई'. आणि ह्या क्रीक मधून इकडून तिकडे बोटीने जाण्याची जी व्यवस्था आहे त्याला म्हणतात 'आब्रा'.

लहान वल्ह्याच्या होड्या व बाकड्यासारखी बसण्याची व्यवस्था असलेल्या मोटारबोटी ह्यात बसून देअरातून पार दुबई किंवा पार दुबईतून देअराला अतिशय कमी वेळात आणि कमी खर्चात जाता येते.

जवळ जवळ पहिले एक वर्ष माझे प्रवासाचे साधन हेच होते. गाडी आल्यानंतर सुद्धा अजूनही काहीवेळा नोस्टालजियासाठी मुद्दाम हून 'आब्रा'ने जावेसे वाटते. कारण तो एक सुखद अनुभव होता. त्याबद्दलची त्यावेळी सुचलेली ही कविता.

आब्र्यामध्ये हेलकावे
लहानगी वल्ह्याची होडी
आणि टुर्रकन जाई
मोटारबोटीची फेरी ऐटीने
होडीची संथ लय
धिम्या एकतालात अस्थाई
ॲन्टीक वय
त्याला साजेशी संथाई
मोटारबोटींची द्रूत चाल
मुरींगसाठी वळताना
एक सुरेखशी हरकत
नवीन तऱ्हा, नवीन पद्धत
वेळेची बचत
देतात बरकत
होडीत कलंदर दिवाणा
बोटीत बिलंदर ससाणा
होडी आपल्याच तंद्रीत जाणारी
भान विसरून गाणारी
दोन्ही सुंदरतेचे वेगवेगळे पैलू
नेती पैलतीराला

- गिरीश शिरसाळकर

इतकी पुढारलेली असेल, इतकी स्वच्छ असेल, दळण-वळण इतकं शिस्तबद्ध असेल, स्त्रीदाक्षिण्य असलेली असेल अशी कल्पना नसल्यामुळे ते आश्चर्यचकीत व्हायचे. इथे मॅनमेड का होईना पण रस्त्याच्या दुतर्फा एवढी झाडे, फुले, लॉन पाहून सगळ्यांना एक दृष्टीसुख मिळते. रस्त्यावर घाण टाकणारे आणि पचापचा पान कुठेही थुंकणारे तेच भारतीय इथे आल्यावर क्षणात कसे काय सुधारतात हे एक कोडे आहे! इथल्या शासकीय कडक शिस्तीचा हा परिणाम असावा. पण ह्यातून आपण काही शिकतो आहोत असे वाटत नाही, हे खेदपूर्वक म्हणावे लागते. कारण भारतात गेल्यावर जुन्या सवयी 'ये रे माझ्या मागल्या' म्हणत परत अंकुरतात.

दुबई ही एक प्रकारे 'मायानगरी' आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. इथे ९९ टक्के व्यवहार व्यापारी (commercial) उद्देशाने होतात. परकीय प्रत्येकजण इथे येतो तोच मूळात पैसे कमविण्याच्या उद्देशाने येतो आणि लोकसंख्येच्या जवळ जवळ ८० टक्के लोक परकीय आहेत आणि फक्त २० टक्के वतनी. जगातल्या सगळ्या बाजारपेठा इथे आहेत. उत्तम बंदरे बांधल्यामुळे व भौगोलिक दृष्ट्या दुबई खरोखरच मध्य पूर्वेत असल्यामुळे जगातला पूर्वेकडील माल पश्चिमेकडे आणि पश्चिमेकडील माल पूर्वेकडे जाताना इथल्या भाऊच्या धक्क्यावरून जातो आणि दुबईला प्रचंड प्रमाणात आवक मिळवून देतो.

टुरिस्ट लोकांसाठी म्हणून इथे वॉटरस्पोर्टस्, डेझर्ट सफारीज् मोठे मोठेच नव्हे तर 'वर्ल्ड बिगेस्ट' वगैरे मॉल्स, चक्क इनडोअर स्कीईंगची व्यवस्था, पंचतारांकीतच नव्हे तर सप्त तारांकीत हॉटेल्स, शिवाय समुद्रात जगप्रसिद्ध 'जुमेरा पाम' हे खजुरवृक्षाच्या आकाराचे बांधलेले जगातले आठवे आश्चर्य, जगातली सर्वात उंच इमारत 'बूर्ज खलिफा'ही इथेच. किती म्हणून किती सांगू! ह्या छोट्याशा दुबईत सगळे जग सामावले आहे. जगातले कुठलेही काहीही इथे मिळतेच, वस्तूच नव्हे तर जगातले खाण्याचेही सर्व प्रकार येथे मिळतात. मग भारतातील खाण्याचे अगदी उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतचे सर्व प्रकार इथे मिळणारच हे काही सांगायला नको. कारण परकीयांपैकी ७५% इथे भारतीयच आहेत. 'व्यवसायात गती नाही' अशी छाप असणाऱ्या महाराष्ट्रीय



मंडळींनी सुद्धा इथे महाराष्ट्रीयन पदार्थांची रेस्टॉरन्टस् उघडली आहेत. तेथे चक्क थालीपीठ, साबुदाणा खिचडी पासून अगदी पु.ल. फेम 'आळूचे फदफदे' देखील मिळेल.

कदाचित दुबईतून लवकर गेलोही असतो - भारतात किंवा अमेरिकेत. तसे पर्यायही उपलब्ध होते. पण इथे राहणाऱ्या भारतीयांना एक फार मोठा दिलासा आहे. तो म्हणजे इथे आपल्या संस्कृतीला आम्ही मुकत नाही. शिवाय दुबईचे सर्वात चांगले काय असेल तर भारत विमानाने फक्त अडीच तासावर आहे. एवढ्या वेळात तुम्ही भारतातल्या जवळ जवळ सगळ्या प्रमुख शहरांना जाऊ शकता. सगळ्या प्रदेशातले भारतीय असल्यामुळे आपले सगळे सण साजरे होतात. प्रत्येक जण आपापली संस्कृती जपण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असते. भारतातले उत्तम कलाकार आपली कला सादर करण्यासाठी येथे सतत येत असतात.

दुबई हे एक कडबोळे आहे आणि सतरा पगड देशातले लोक इथे राहातात. त्यामुळे 'मोअर दी मेरी' म्हणतात तसे त्या त्या देशात न जाता, त्यांचे कार्यक्रम इथे पाहायला मिळतात.





तुमचे मूल इथे जन्मले तरी. दर तीन वर्षांनी रेसीडेन्स व्हीसाही नवीन घ्यावा लागतो. ह्याच कारणासाठी इथे 'सेन्स ऑफ बिलाँगींग' येत नाही. आपण कायम परके आणि अस्थिर. Insecure. मग तुम्ही कोट्यधीश असा किंवा काहीही. त्यामुळे बऱ्याच वेळा इथली प्रगती कृत्रिम, कचकड्याची वाटते. तकलादू वाटते.

असे सर्व असूनसुद्धा जगभरातले इतकेजण इथे राहतात. म्हणजे नक्कीच काहीतरी इंगित असणार. तर ते म्हणजे इथे अजून तरी आयकर नाही. त्यामुळे जगभरातले लोक इथे Investment करतात आणि

उत्तम स्टेडियम्स असल्यामुळे IPL सारख्या क्रिकेट मॅचेसही होतात. असं ऐकलं आहे की, दुबईत १४६ भाषा बोलल्या जातात! आहे की नाही गंमत! मला वाटते अमेरिकेनंतर किंवा त्यापेक्षा जास्त 'मेल्टींग पॉट' दुबई असावी.

हे सगळे खरे असले, इथे सर्वांनी आपला उत्कर्ष साधला हेही खरे असले; तरी प्रत्येक नाण्याला दुसरी बाजूही असतेच. प्रत्येकाचे इथले अनुभव त्याच्या त्याच्या नोकरी व्यवसायाप्रमाणे चांगले असतीलच असे नाही. काहींना खूप खस्ता खाव्या लागल्या आहेत, वाईट अनुभव आले आ-हेत. अर्थात हे भारतातही होऊ शकते. शिवाय, एकदा परदे-शी येऊन नशीब काढायचे ठरविल्यावर ही मानसिक तयारी ठेवायला देखील लागते. पण भारतातआपत्ती येणे वेगळे आणि इथे येणे वेगळे. शेवटी आपण इथे परके आहोत हे कधीही विसरून चालत नाही. नव्हे विसरताही येत नाही. कितीही वर्षं इथे राहिले तरी अमेरिकेप्रमाणे वा इतर बऱ्याच देशांप्रम णे इथली 'नागरिकता' (सिटीझनशीप) मिळत नाही. अगदी



काही सेव्हींग करू शकतात. परंतु हल्ली दुबईसुद्धा इतकी महाग होत चालली आहे की काही सेव्हींग करणे सर्वसाधारण लोकांना आता दुरापास्त होत चालले आहे.

व्यक्तिगत बरे-वाईट अनुभवही खूप आहेत. त्याबद्दल लिहिणे तितकेसे संयुक्तिक होणार नाही. आपलीच आणि दुबईची टिमकी तरी किती वाजवणार! शेवटी आपण भारतीय आहोत, 'संध्या-छाया भिवविती हृदया' अशी वेळ जवळ आल्यावर एक ना एक दिवस मायदेशी परत जायचे आहे. कसाही असला तरी तो 'आपला' देश आहे. मी नेहमीच सुट्टीवर वा कामासाठी भारतात जातो त्यावेळी, पोल्यूशन भरपूर असूनसुद्धा आपण 'मोकळा श्वास घेतो' असे वाटते. डोक्यावरचे टेन्शन विमानतळावर पाय ठेवताच पळून जाते. परदेशी माणसाची अवस्था नेहमीच 'ना घर का, ना घाट का' अशी असते. पण शेवटी घर ते घरच, आपले घर, आपली माणसे, चांगले वाईट पण सारे आपलेच. गीतेत म्हटल्याप्रमाणे 'स्वधर्मे निधनं श्रेय। परधर्मो भयावहः॥

शिवाय 'नमो' आपला देश आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमान वाटेल असा करतील अशी आशा वाटते.

दुबईने दिले खूप, शिकविलेही खूप कठीण असले, कष्ट असले, आपल्या माणसांपासून दुरावा असला, तरी 'देशाटन करावे' असा उपदेश समर्थ रामदासही देतात. शीखांच्या गुरूग्रंथातही नशीब काढायला व अनुभवांतून शिकायला देशभ्रमण करायला सांगतात. मला इतकेच म्हणायचे आहे की, कितीही झाले तरी आपली नाळ तुटू देऊ नये. मग बाकी सारे पावेल.

हरि ओम तत् सत्.

# दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन!

**मार्च २०१० मध्ये दुबईमध्ये दुसरे मराठी विश्व साहित्य संमेलन पार पडले. या विश्व साहित्य संमेलनाची धुरा आपल्या खांद्यावर समर्थपणे पेलणाऱ्या व यशस्वी करणाऱ्या संजीवनी सुजय पाटील! साहित्य संमेलनाचे वर्णन त्यांच्याच शब्दात!**

### अविस्मरणीय अनुभव

नमस्कार मंडळी! मी सौ. संजीवनी सुजय पाटील!

दुबई महाराष्ट्र मंडळाची कार्यकर्ती! गेली अनेक वर्षं दुबईला वास्तव्य असल्याने महाराष्ट्र मंडळाचे कार्य करणे हाच छंद. महाराष्ट्र मंडळाचे कार्य वेगवेगळ्या स्तरावर केल्यानंतर अध्यक्षपद स्वीकारण्याचा योग आला आणि मी तो आनंदाने स्वीकारला. गेल्या ३५ वर्षांच्या महाराष्ट्र मंडळाच्या कारकिर्दीतही कोणत्याही महिलेने अध्यक्षपद स्वीकारले नव्हते. त्यामुळे ही जबाबदारी घेताना थोडी काळजी ही होतीच!

जरी स्त्री ही वेगवेगळ्या स्तरांवर जगांत काम करत असेल, तरीही ती जेंव्हा प्रतिनिधित्व करते त्यावेळेस अजाणतेपणे समाज तिची परीक्षा घेत असतो. हा अनुभव प्रत्येक स्त्री प्रतिनिधीला येत असेल ह्यात शंकाच नाही. आणि हा अनुभव मलाही प्रखरतेने आला. खरंतर सामाजिक कार्य हे मला नवीन नव्हतं! माझे वडील कै. गजानन वर्तक हे राष्ट्रीय सेवादलाचे कार्यकर्ते आणि नंतर शिवसेनेची स्थापना झाल्यावर माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्यासमवेत शिवसेनेचे कार्य करण्याचा बहुमान त्यांना लाभला! त्यामुळे शिवसेनेच्या अनेक प्रचारांना - कार्यक्रमाला लहानपणापासूनच मी वडिलांबरोबर जात असे! शिवसेना प्रमुखांचे भाषण तेव्हा फारसे कळत नसे, पण त्यांचं वक्तृत्व मात्र रुजून गेलं! धाडसीपणाने आपलं मत मांडण्याची शैली कशी असावी ह्याचा परिणाम थोडाबहुत अंशी माझ्या मनावर






संजिवनी पाटील
sanjivani_v@hotmail.com



झाला आणि माझ्या दुबईतील कार्यात त्याचा मला निश्चितच फायदा झाला आणि माझ्या कार्यात भविष्यातही होईलच! म्हणूनच का होईन मी महाराष्ट्र मंडळाची अध्यक्ष होण्याची जबाबदारी घेतली!

घेतलेले कार्य पूर्णपणे यशस्वीपणे तडीस नेणे आणि त्यात आपले नाव रुजवणे ह्याचीच सवय. त्यामुळे अध्यक्षपदी असताना कोणाशीही तुलना न करता, सच्चेपणाने कार्य करावे असेच ठरविले! कार्यक्रमाची आखणी करायला सुरुवात केली आणि अशातच महाराष्ट्र मंडळाचे माजी अध्यक्ष श्रीकांत जोशी आणि राजाराणीचे अभिजीत पाटील स्वतः भेटावयास आले आणि त्यांनी विश्व साहित्य संमेलनाची कल्पना दिली. ह्या आधी प्रथम विश्व साहित्य संमेलन अमेरिकेत झाले होते आणि दुसरे दुबईत व्हावे असे विचार मांडले गेले.

साधारणपणे परदेशातील मंडळांत साहित्य, कला ह्या कार्यक्रमांची किंवा काही सामाजिक कार्य करण्याची आखणी होते. परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावरची जबाबदारी निदान आखाती देशात घेतली गेली नव्हती. विचार समोर आल्यानंतर जणू काही मला चैतन्य आले. रात्रीची झोप गेली! जर विश्व साहित्य संमेलन आपण दुबईत घडवू शकलो तर ही एक इतिहासातील बातमी होऊ शकते! दुबई महाराष्ट्र मंडळाचं नाव नक्कीच जगभर पसरू शकतं ही एकच निर्मळ भावना मनात निर्माण झाली आणि मी स्वतःच निश्चय करून ती मनात रुजवली! समोरच्याला आपले प्रांजळ मत सहजपणे पटवून देण्याची माझ्या वडिलांची शैली माझ्यात असल्याने, महाराष्ट्र मंडळाचे विश्वस्त आणि कमिटी मेंबर्स यांना मी समजाविण्यांत सहजपणे यशस्वी झाले आणि त्या उभारीमध्ये मी साहित्य मंडळाचे अध्यक्ष माननीय ढाले-पाटील यांना होकाराचे पत्र पाठवून दिले.



आणि हां हां म्हणता ही बातमी टीव्हीवर बातम्यांमध्ये, पेपरांमध्ये पसरली! आणि त्या वेळेस मला कल्पना आली की, मी केवढा मोठा शब्द दिला आहे! मनातील भावना ही दुबई महाराष्ट्र मंडळाचे नाव विश्वात व्हावे अशीच स्वच्छ होती; पण त्यासाठी मला केवढा मोठा तराजू पेलावा लागणार आहे याची कल्पना मला mediaने दिली!!

कोणतेही मोठे कार्य म्हटलं की कार्यकर्ते हे महत्त्वाचे घटक नुसत्या एका प्रतिनिधिने किंवा चार-पाच मंडळींनी होण्यासारखं हे कार्य नव्हतं! तर अनेक मंडळींची गरज यावेळेस भासणार होती. त्यासाठी मदत म्हणून अनेक मंडळी समोरून आली आणि चार-पाच मंडळींची संख्या शेकडो कार्यकर्त्यांवर गेली! सर्वजण 'संजीवनी ताई कोणतेही काम सांगा, जबाबदारी द्या. आम्ही आनंदाने स्विकारू. तुम्ही आपणा सर्वांतर्फे दिलेला शब्द आहे. तो खरा करण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत तुमच्याबरोबर राहू ही हमी कित्येक तरुण मुलांनी-मुलींनी दिली. आणि मला तेव्हा समजले की केवढे मोठे कार्य आहे आणि माझे हात असंख्य आहेत! कधी कधी वाटलं कुठून आली ही सर्व मंडळी? ह्यांना इतकं प्रेम माझ्याबद्दल, मंडळाबद्दल आणि आपल्या मराठी भाषेबद्दल आहे याचा अभिमान मला वाटला.'

आणि बोलता बोलता संमेलनाची तयारी जोरदार सुरू झाली. विश्व साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद माननीय मंगेश पाडगांवकर यांनी स्वीकारून आमच्या आमंत्रणाचा मान राखला. याबद्दल मुंबई महाराष्ट्र मंडळ कायमच ऋणी राहील! ढाले-पाटील व साहित्य मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी चांगलेच सहकार्य केले!

कोणत्याही मोठ्या उपक्रमाचा विडा उचलणे हे सोपं असतं, पण तो निभावणं कठीण! त्यासाठी बहुमूल्य गरज असते आर्थिक मदतीची. आर्थिक मदतही आम्हाला भरभरून झाली. प्रायोजकांना सांभाळून कार्यक्रमाची सूत्रं सांभाळणं किती कठीण असतं याचा पूर्ण अनुभव आम्हाला आला. विश्व साहित्य संमेलनासाठी अनेक प्रायोजक (Sponsors) पुढे आले. काहींनी मदत केल्यामुळे त्या बदल्यात बरीच आव्हाने केली तर काही मोठ्या प्रायोजकांनी कुठे खर्च कराल हेही न विचारता एका सच्च्या कार्यासाठी पैसे दिले. अमराठी प्रायोजक स्वतःहून पुढे आले. खरंतर मराठी साहित्याचा आणि त्यांचा काहीही संबंध नव्हता. पण केवळ एक स्त्री

प्रतिनिधित्व करून दुबईसारख्या ठिकाणी १००-२०० मंडळी साहित्यिक आमंत्रित करून संमेलन केलं जातंय याचा त्यांनाही अभिमान वाटला!

भारतात होणारे साहित्य संमेलन आणि आखाती देशात होणारे संमेलन यांत खूप फरक आहे. आखाती देशांत साहित्यिकांना आमंत्रित करताना खूप परमिशन्स घ्याव्या लागतात. त्यासाठी महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष जबाबदार असतात. जसजसे कार्य पुढे जाऊ लागले तसतसे मीडियाचे प्राधान्य वाढू लागले आणि अखेर संमेलनाची वेळ जवळ आली. नेहमीप्रमाणेच काही प्रायोजकांचे वर्चस्व, मीडियाचे वर्चस्व ह्या सर्वांचा समतोल सांभाळणे कठीण झाले. अनेक मान्यवरांना आमंत्रित केले गेले. कार्यक्रमाची आखणी झाली. राजकीय नेतेही कार्यक्रमास उपस्थित होते. माननीय मुख्य कविजींचा संदेशही मिळाला. उपमुख्यमंत्री छगन भुजबळ साहेब स्वतः उपस्थित राहिले. अनेक मान्यवर संमेलनात हजर होते. ग्रंथदिंडी-लेझीम ह्या गजरात उद्घाटन झाले आणि संमेलनाला सुरुवात झाली. कार्यक्रम रंगू लागला आणि प्रायोजकांचा मानसिक प्रहारही वाढू लागला आणि खरंतर सर्व सांभाळणे मला स्वतःला खूप कठीण होतं. मीडियाचा प्रवाह कार्यकर्त्यांवर होऊ लागला. तेही मला काही प्रश्न विचारून भंडावून सोडत होते. काहींना मदत करण्यास नकार दिला. अशावेळी प्रतिनिधी म्हणून माझे मानसिक स्थैर्य शाबूत असणं अत्यंत गरजेचं होतं.

ह्या प्रसंगात योग्य मार्ग दाखवत आणि माझ्याकडून योग्य वाक्यं बोलली जाणं फारच गरजेचं होतं. 'हे मानसिक स्थैर्य आणि धैर्य मला दे' हीच आळवणी मी प्रत्येक क्षणी परमेश्वराकडे करीत होते आणि वडिलांना प्रार्थना करीत होते. वडील पुढारी असल्याने, माझ्या ठिकाणी ते असते तर त्यांनी काय निर्णय घेतला असता? असा विचार करतच मी निर्णय घेत गेले!


अनेक साहित्यिक आलेले होते. पुस्तके प्रकाशित झाली. अनेक विषयांवर चर्चासत्रं झाली आणि जणूकाही कशाचीही पर्वा करायची नाही आणि हे कार्य निर्विघ्नपणे पार पाडायचेच ठरवले. आमंत्रित केलेली आणि स्वतः हून आलेली मंडळी होती. त्यांना माझे दडपण दिसायचे. त्यांची काळजी मी व माझ्या सर्व कार्यकर्त्यांनी घेतली. मंडळाचे




विश्वस्त माननीय उदयशंकर बोलन, सेक्रेटरी राऊत आणि सर्व कमिटी मेंबर्स सावली सारखे माझ्याबरोबर होते. खरंतर सर्व कार्यकर्ते आणि सर्व प्रायोजक इतके आहेत की, कोणाचे नाव राहिल्यास अपमान होईल. म्हणूनच मी उल्लेख करत नाही. पण ज्या सर्वांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सहभाग घेतला त्यांची मी जन्मोजन्मीची ऋणी आहे. सम्मेलनाच्या आनंदाचे क्षण आले. कार्यक्रमाची सांगता करताना 'झाशीची राणी' म्हणून उल्लेखून माझा बहुमान केला गेला आणि आनंदाश्रूंनी मन भरून आले. मनामध्ये वादळ असतानाही समोर आलेल्या आपल्या पाहुण्यांना काही कळू नये याचा अतोनात प्रयत्न त्यांनी पाहिला. अनुभवला. पण आम्ही सर्वांनी मिळून आलेल्या सर्व मंडळींना मान देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

'आजपर्यंत अशा स्तराचे साहित्य संमेलन बघितले नाही, अनुभवले नाही' असे उद्गार सर्व साहित्यिकांकडून ऐकले आणि धन्य धन्य झाली ही दुबई! साहित्यिकांची पाऊले लागली आमुच्या ठाई!! असे झाले! आणि आम्हा सर्व दुबईवासियांचे हृदय अभिमानाने भरून आले!

असा हा सर्व भावनांचा संमिश्र अनुभव परमेश्वराने माझ्या ओंजळीत टाकला ह्याने मी धन्य झाले! असे अनुभव! अशी जबाबदारी मला नेहमीच घेण्याची संधी परमेश्वराने दिली तर मी आनंदाने स्वीकारेन!



धन्यधन्य झालो आम्ही होऊन भारतीय! जपत आहोत परदेशातही मायबोली मराठी!! साहित्य संस्कार आम्ही सर्व जपतोय मराठी!! परदेशातही झेंडे झळकवू आम्ही नेहमीच.

मराठी!! आम्ही मराठी!!!

जयहिंद! जय महाराष्ट्र!

# शिखर मराठी साहित्याचे...!

**मार्च २०१३ मध्ये दुबईमध्ये दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन कविवर्य मंगेश पाडगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या संमेलनाच्या निमित्ताने 'अक्षरांचा श्रीमंत सोहळा' ही स्मरणिका काढण्यात आली व तिचे संपादन शैलेंद्र साठे यांनी केले. या संमेलनाची आठवण म्हणून सर्व आमंत्रितांस महाराष्ट्र मंडळ दुबईतर्फे परदेशातील माहेराची आठवण म्हणून मानचिन्ह देण्यात आले. ह्या मानचिन्हाची निर्मिती कशी झाली....'शिखर विश्व मराठी साहित्याचे' या घोषवाक्याचा उगम कसा झाला....हे निर्माते शैलेंद्र साठे यांच्याच शब्दात!**

मार्च २०१२ मध्ये दुबईमध्ये दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन, महाराष्ट्र मंडळ दुबई....परदेशातील माहेरघरी पार पडले. सोनियाचा दिवस उगवला आणि जणू वाळवंटात मोगरा फुलला. संमेलनाची झुळूक आली व वातावरणात बकुळीचा गंध भरून गेली. अध्यक्षस्थान भूषविले सुप्रसिद्ध कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी! संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक मान्यवर साहित्यिक संमेलनासाठी दुबईत आले. गजाननाला वंदन करून साहित्य संमेलनास सुरुवात झाली व अतिशय दिमाखात कार्यक्रम पार पडला.

दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन दुबईत पार पडले व त्याच्या अनेक अविस्मरणीय स्मृती मनात कायमच्या घर करून राहिल्या. त्यातील एक म्हणजे संमेलनाच्या निमित्ताने काढलेली, शैलेंद्र साठे यांनी संपादित केलेली स्मरणिका - 'अक्षरांचा श्रीमंत सोहळा'! खरोखरच नावाप्रमाणे ही स्मरणिका म्हणजे साहित्याच्या श्रीमंत सोहळ्याचे दर्शनच होय. सुप्रसिद्ध साहित्यिकांचे दर्जेदार साहित्य, त्यांची भाषाशैली, त्यांच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेचे दर्शन घडवणारे वैचारिक मंथन, मध्येच एका हळुवार कविमनाने उलगडलेले भावविश्व आणि या सर्वांची मांडणी, रंगसंगती व त्याला साजेलसे मुखपृष्ठ. खरोखर ही स्मरणिका म्हणजे अक्षरांचा श्रीमंत सोहळाच होता!

दुसरी स्मृती म्हणजे, संमेलनाची आठवण म्हणून परदेशातील माहेराकडून सर्व साहित्यिकांना एक मानचिन्ह भेट म्हणून देण्यात आले. दुबईचे गौरवस्थान असलेली जगातील सर्वोच्च इमारत 'बूर्ज खलिफा' रेखांकित करून त्यावर संमेलनासाठी आलेल्या सर्वांची नावे कोरून, अतिशय सुंदरतेने व सुबकतेने नटलेले हे मानचिन्ह! ह्याची संपूर्ण संकल्पना शैलेंद्र साठे ह्यांचीच होती.



शैलेंद्र साठे

shailendra-tdc@yahoo.com

स्मरणिका व मानचिन्ह या दोन अविस्मरणीय अशा संमेलनाच्या स्मृती आठवत असताना मनात विचार आला की, शैलेंद्रला या कल्पना कशा काय सुचल्या, त्यापाठी त्याची काय भूमिका होती, हे समजून घेऊन आपल्या ग्रंथालीच्या इ-दिवाळी अंकात छापून जगभरच्या वाचकांपर्यंत पोहोचवायलाच हवी आणि म्हणूनच मी त्याला फोन लावला.

मी- 'हॅलो शैलेंद्र, मी मेघना वर्तक बोलतेय.'

त्याच उत्साहात पलीकडून आवाज आला, 'बोला मेघनाताई काही विशेष?' मी म्हटले, 'मुंबईत मराठी साहित्याला वाहिलेली ग्रंथाली ही एक संस्था आहे. यंदा ४० वे वर्ष आहे त्यांचे! ग्रंथालीतर्फे यंदा दुबईच्या जीवनावर 'इ-दिवाळी अंक' काढत आहेत व त्याचे संपादन मी करत आहे. विश्व साहित्य संमेलनासाठी तू केलेली स्मरणिका व मानचिन्ह लहानथोर सर्वांनाच अतिशय आवडले. संमेलनाध्यक्ष कविवर्य मंगेश पाडगावकरांनी सुद्धा आपल्या समारोपाच्या भाषणात मुद्दाम उल्लेख केला...

आणि म्हणूनच या दोन कलाकृती तयार करण्याची कल्पना तुला कशी काय सुचली, त्यामागची तुझी भूमिका काय होती याचे दर्शन जगभरच्या इ वाचकांना व्हावे यासाठी तुला मुद्दाम फोन केला.' आणि अक्षरशः मला अधिक बोलायची संधी न देता खळखळ वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे शैलेंद्र बोलत गेला व मी ऐकत गेले....


विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या 'शिखर विश्व मराठी साहित्याचे' ह्या मानचिन्हाच्या कल्पनेबद्दलचा प्रवास...

एक कलाकार या नात्याने परदेशात राहून

महाराष्ट्र मंडळ दुबईकरता अनेक मराठमोळ्या कल्पना हळूवारपणे मला रुजवता आल्या व त्या लोकांपर्यंत पोहोचल्या. त्याना आवडल्या हे समाधान फार मोठे आहे.

मी गेली ११ वर्षे महाराष्ट्र मंडळ दुबईचा सदस्य आहे. मला नेहमीच मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि महाराष्ट्राबद्दल आस्था व अभिमान आहे. ५ वर्षांपूर्वी स्मरणिकेचे संपादन करीत असताना महाराष्ट्र मंडळ दुबईला परिभाषिक करण्याचा विचार मनात आला व 'महाराष्ट्र मंडळ दुबई - परदेशातील माहेरघर' हे नाव सुचवल्यानंतर त्याला सर्व सदस्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सोहोळ्यात संमेलनाध्यक्ष मंगेश पाडगांवकर ह्यांनी केलेला विशेष उल्लेख, ही मला मिळालेली फार मोठी पावती आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये एका सदस्याच्या नात्याने काम करत असताना विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेचे संपादन करण्याचा योग आला. हे खरे आव्हानात्मक व फार जबाबदारीचे काम होते. पण हे करण्याची मजा काही औरच होती. योजनेप्रमाणे आमंत्रित साहित्यिकांची ओळख व माहिती संकलीत करण्याच्या निमित्ताने सर्व साहित्यिकांशी संवाद




साधण्याचा योग आला. प्रथमच सर्वांना लिहिण्यास विषय दिले व सर्वांनी भरभरून लिहिले. त्याचप्रमाणे गेल्या काही वर्षांतील महाराष्ट्र मंडळाच्या पूर्व अध्यक्षांनी मांडलेली मते ही महाराष्ट्र मंडळ दुबईच्या ३७ वर्षांच्या यशस्वी वाटचालीची साक्ष देणारी आहेत. ह्या स्मरणिकेच्या नावाबद्दल विचार करताना मला चटकन सुचलेले नाव म्हणजेच 'अक्षरांचा श्रीमंत सोहळा!' ह्या नावाच्या कल्पनेप्रमाणेच सोहोळा रंगला व अक्षरांची श्रीमंती घेऊन आलेल्या साहित्यिकांचे मंडळाच्या सर्व सदस्य व रसिकांनी उत्साहाने साहित्य दिंडीच्या रूपात स्वागत केले.

संमेलनास आलेल्या सर्व आमंत्रितांकरिता महाराष्ट्र मंडळ दुबईतर्फे परदेशातील माहेराची आठवण म्हणून एक खास मानचिन्ह देण्याचे ठरले व मी कामाला लागलो. काही वेगळे करायची फार इच्छा होती व त्यातूनच ही कल्पना जन्माला आली. कल्पना साकारताना काही विचार मनात आले...

वाळवंटी देशात दुबई येथे होणारे संमेलन म्हणून चित्ररूपात दिंडी ही उंटावर दाखवण्याची कल्पना सुचली आणि त्याला दिलेले घोषवाक्य 'विश्व मराठी साहित्य दिंडी यंदा दुबईत परदेशातील माहेरघरी' इथूनच या संमेलनाची दृश्य स्वरूपात जगाला संकेत-स्थळाद्वारे ओळख झाली. त्यावरही उत्तम प्रतिसाद मिळाला व उत्साह द्विगुणीत झाला.

हे संमेलन दुबईसारख्या वैभवसंपन्न शहरात भरत आहे, ह्याची जगाला ओळख पटवून देण्यासाठी नुकतेच थाटामाटात जगासमोर आलेल्या बूर्ज खलिफाचा (जगातील सर्वात उंच इमारत) उल्लेख कुठेतरी करून घेता येईल हा विचार मनात घर करून गेला.

आणि अशा अनेक विचारांच्या गोंधळातूनच आज दृश्य

स्वरूपात आलेल्या मानचिन्हाच्या कल्पनेचा जन्म झाला.

साहित्य संमेलनाची परंपरा गेल्या साठ वर्षांपेक्षा जास्त आहे व त्या संमेलनात सामिल झालेले थोर साहित्यसेवक व रसिक ह्यांनी मराठी भाषा व साहित्य हे किती प्रगल्भ व उच्च दर्जाचे आहे हे वेळोवेळी सिद्ध केले आहे. तोच दर्जा अजून उंचावायचा असेल तर आपल्याला विश्व मराठी साहित्य संमेलनाला 'विश्व शिखर साहित्य संमेलन' संबोधण्याचे साहस करता येईल का आणि ते योग्य आहे का? नंतर 'शिखर' हा शब्द बराच वेळ डोक्यात घोळत राहिला व बूर्ज खलिफा डोळ्यांसमोर ठेवता घोषवाक्य सुचले. 'शिखर विश्व मराठी साहित्याचे' आणि लगेच वेळ न दवडता रेखांकन सुरू केले. करताकरता साहित्यिकांच्या नावानेच आपण हे शिखर हुबेहूब उभारू शकतो ही कल्पना सुचली व लगेच सर्व थोर साहित्यिकांची नावे संकलीत करून विश्व मराठी साहित्याचा शिखर उभारण्यास सुरुवात केली. नंतर विचार केला असता त्यात साहित्य सेवकांची नावे व दुबईतील आमंत्रित साहित्यिकांच्या नावाचीही भर घातली. मग विचार आला की, ह्या अक्षरांच्या श्रीमंत सोहोळ्यासाठी एखाद्या लग्न सोहोळ्यासारखे हातभार लागलेल्या सर्व कार्यकर्त्यांची व स्वयंसेवकांची नावे घालण्यात काय हरकत आहे? आणि ती मी आवर्जून घातली. म्हणून संपूर्ण सोहोळा लक्षात घेता बूर्ज खलिफा म्हणजे 'शिखर विश्व मराठी साहित्याचे' यामध्ये सर्व ज्येष्ठ साहित्यिकांची नावे आणि आजूबाजूच्या इमारतीत साहित्य सेवक व संमेलनातील स्वयंसेवक ह्यांची नावे घालून आरेखन पूर्ण केले.

मानचिन्हास विश्व मराठी साहित्य संमेलन व महाराष्ट्र मंडळ दुबई लोगो व संमेलनाध्यक्ष मंगेश पाडगांवकर व महाराष्ट्र मंडळ दुबईच्या अध्यक्षा संजीवनी पाटील यांची हस्ताक्षरे संलग्न करता मानचिन्हाला संपूर्णत्व प्राप्त झाले व अशी ही कालबाह्य निर्मिती सर्वांना देण्यात आली. त्याचे होणारे कौतुक ही माझ्यासाठी अभिमानास्पद गोष्ट होय. हीच माझी कमाई आहे!

एवढे सर्व झरझर बोलून शैलेंद्र एकदम थांबला... कारण तो भावविवश झाला होता... मी त्याला फक्त एवढेच म्हटले, अरे तुझ्या लेखाशिवाय 'ई दिवाळी अंक' अपुरा राहिला असता!

कारण हे मानचिन्ह म्हणजे महाराष्ट्र मंडळाचा गौरव आहे, दुबईचा गौरव आहे!

Planning a Dubai tour?
Is it a trip with family?
Looking for personalised service?

YES, IT'S POSSIBLE
With your budget
Only with


Siddhesh Tours

Contact : info@siddheshtours.com
Mobile : +919967179245, +919421854730

# यालाच म्हणतात का... 'वसुधैव कुटुंबकम्!'



दुबईत मुलीने तिच्या घरी गणपतीचे मखर केले व मला बघायला बोलावले. मनात विचार आला... अरे, ही छोटीशी अनघा एवढी मोठी कधी झाली व हे सर्व शिकली कधी?... मग लक्षात आले, आपण पूर्वी गणपती आला की मखर करायचो तेव्हाच तर ती शिकली, कळत-नकळत. आज ती तिच्या मुलींसमोर करतेय, उद्या तिच्या मुली त्यांच्या मुलींसमोर! ह्यालाच तर संस्कृती म्हणतात. संस्कार संस्कार म्हणजे दुसरे काय आहे? ह्या रीतीरिवाजांच्या संस्कारांचे पुढील पिढीत अभिसरण होते.



अशा प्रकारच्या सर्व संस्कारांशी दुबईतील मराठी मनं जोडली गेली आहेत. हे दुबईतील सांस्कृतिक जीवन आहे. गेली ३६ वर्षे आमचे दुबईत वास्तव्य आहे. पण असं वाटतच नाही की, दूर कुठे परदेशात येऊन पडलो आहोत, आपल्या माणसांपासून दूर संस्कृतीपासून दूर! याउलट मराठी संस्कृती, भारतीय संस्कृतीची जोपासना इथे होतेय. दुबईच्या वाळवंटातील वाळूलाही जशा संस्कृतीची सवय झालीय!

दुबईचे महाराष्ट्र मंडळ हे 'परदेशातील माहेरघर' आहे. रुसवेफुगवे, सुखदुःखं एखाद्या कुटुंबाप्रमाणे येथे वाटली जातात. माहेरची सावली मंडळाच्या छत्राखाली मिळते. साधारणतः प्रत्येक महिन्यात एकतरी कार्यक्रम असतो. त्यामुळे मनोरंजन तर होतेच, पण त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे, अनेक मराठी माणसे एकत्र भेटतात, सहवास होतो, आपलेपणा वाढतो, नवीन आलेल्यांना - कुटुंबाना सामावून घेतले जाते.

इथे ५ दिवसांचा गणेशोत्सव असतो. पूर्वी इथे गणपती-मूर्तीपूजा सार्वजनिकरित्या करायला बंदी होती. घरगुती स्वरूपात करू शकत होतो. गाडीत देवाचा छोटा फोटोही लावता येत नव्हता. भारतातून गणेशाची मूर्ती आणायची म्हणजे एक दिव्यच होते. कस्टमचे अनेक सोपस्कार करावे

लागत. तसेच गणेश विर्सजनही येथील बीचवर लपतछपत करावे लागे.

पण आता कालानुरूप येथील रीती बदलल्या आहेत. आता येथील सुपरमार्केट मधून अक्षरशः शेकडो मूर्ती विकायला ठेवल्या आहेत. मराठी लोकांप्रमाणेच इतर जातीय सिंधी, गुजराथी, पंजाबी, केरळी ही लोकंही मोठ्या प्रमाणावर गणपती आणतात. पूजेचे सर्व साहित्य फुले, तुळशी, बेल, दुर्वा सर्व मिळते. महाराष्ट्र मंडळात झांजांच्या गजरात सकाळ संध्याकाळ आरत्या होतात. प्रसाद वाटले जातात.

गणपतीच्या दिवसात जर मुसलमान लोकांचे रोझे सुरू होत असतील तर प्रसाद वाटला जात नाही. त्या धर्माचा आदर केला जातो. सामूहिक सहस्रावर्तने होतात. २००-२५० मराठी माणसे जमतात. आवर्तनांचे मंगल घोष आकाशातील देवदेवतांना वाळवंटात येण्याची विनंती करतात. साश्रू नयनांनी येथील बीचवर गणेशाचे विसर्जन होते.

लहानथोर सर्व भक्तगण या कार्यक्रमात सहभागी होतात व आपली परंपरा, संस्कृती याच्याशी पुढील पिढीची नाळ जोडली जाते.

गणपतीप्रमाणे दिवाळी उत्सवही दिमाखात साजरा होतो. अख्खी दुबई दिव्यांच्या माळांनी चमचमत असते. इथे भारतीयांचे प्रमाण खूप असल्याने आपले सण प्रकर्षाने लक्षात येतात. आकाश कंदील, दिव्यांच्या माळा, रांगोळ्या, पणत्यांच्या रांगांनी घरे सुशोभित होतात. तऱ्हेतऱ्हेचे



फराळाचे पदार्थ बनवले जातात, एकमेकांकडे दिले जातात. खरं तर या सर्वांमुळे भारतीयच नव्हे तर इतर देशीय नागरिकही जवळ येतात. एवढे वर्ष एकत्र रहात असल्यामुळे मैत्री असते. साहजिकच सुखदुःखात एकमेकांना बोलावले जाते. एकमेकांच्या संस्कृतीची वैशिष्ट्ये वाटली जातात. घरी दिवाळीच्या पार्ट्या होतात.

दिवाळीच्या आठ दिवस आधीपासून इंडियन मिठाई फरसाणाची दुकाने बंद असतात. गिऱ्हाईकांसाठी दुकानात फक्त मिठाया बनवल्या जातात. gift रॅपिंग होऊन आकर्षक boxes मध्ये बांधल्या जातात. रेस्टॉरन्टच्या अख्या वर्षाचा धंदा या आठ दिवसांत होतो. नवीन वर्षाचे स्वागत उत्साहात



होते. फक्त नसतात इथे फटाके! लवंगी माळा, डांबरी फटाके, ॲटमबॉम्ब या सर्वांना इथे बंदी आहे. फुलबाज्या, भुईनळे मात्र कोठे कोठे दिसतात व नसते ती पानपट्टी. दिवाळीचे जेवण झाले की वरती खायला पानपट्टी मिळत नाही, कारण इथे बंदी आहे, पण म्हणूनच इथे रस्ते, कोपरे पिचकाऱ्यांनी भरलेले दिसत नाहीत.

महाराष्ट्र मंडळाची 'दिवाळी पहाट' असते. भारतातील प्रसिद्ध गायक-गायिकांचा कार्यक्रम असतो. रांगोळी, आकाश कंदील यांची स्पर्धा होते. रीतीरिवाजांची मुलांनाही माहिती होते.

येथे इंडिया क्लब आहे. ५० वर्षांपेक्षा अधिक जुना. त्यांच्या तर्फे सुद्धा अनेक सण साजरे होतात. इथे फक्त मराठी भाषिकच नव्हे; तर सिंधी, गुजराथी, पंजाबी, केरळी, ख्रिश्चन सर्व जातींची माणसे भेटतात. होळी, रंगपंचमी साजरी होते. रंगात नाहून निघणारी रंगपंचमी, आणि होळी पेटवून पूजा केली जाते. गोकुळाष्टमी साजरी होते. नवरात्रात गरबा नऊ दिवस असतो, बंगाली लोकांची दूर्गापूजा, केरळींचा ओनम, ख्रिश्चनांचा ख्रिसमस साजरा होतो.

मुसलमानांचा देश असल्यामुळे रमझान इद व बकरी इद साजरी होते. रमझानमध्ये शाळा, ऑफिसेसचे timing बदलते. कामाची वेळ कमी असते. सर्वकडे भरपूर फळफळावळ विकायला असते. भाव पण कमी होतात. रोझा सुटायच्या वेळी व नंतर तासभर तरी रस्ते ओस असतात, ट्रॅफिक नसतो. घराघरांतून, हॉटेलमधून इफ्तार सुहूर पार्टी असते. मुस्लिम लोक त्यांच्याकडेही इतर धर्मियांना बोलावतात. त्यामुळे चालीरीतींची देवाणघेवाण होते.

बर दुबईत एक अतिशय पुरातन शिवमंदिर आहे. तिथे महाशिवरात्र होते. तसेच श्रीकृष्ण मंदिर आहे. तिथे गोकुळाष्टमीचा सण उत्साहात साजरा होतो. शिखांचे गुरुद्वारही आहे. इथे महाराष्ट्र मंडळात मंगळागौरीचा खेळ खेळला जातो. तसेच नवरात्रीत भोंडलाही होतो. संकष्टीला अनेक मराठी घरात चतुर्थीचे उपवास होतात. तसेच, कित्येक घरांतून सायंकाळी शुभंकरोतीचे शब्दही कानावर पडतात.

सणवारांबरोबर इतरही सांस्कृतिक कार्यक्रम होतात. भारतातून नामवंत कलाकार येतात. त्यांचे गाण्याचे, वादनाचे कार्यक्रम, नकला, कथाकथन असे कार्यक्रम होतात. आंतरराष्ट्रीय क्रिकेट व टेनिस, फुटबॉल ह्या खेळांचे नियोजन होते. अशाप्रकारे सांस्कृतिक - सामाजिक जीवन संपन्न होत आहे.

एकमेकांच्या कलेची देवाणघेवाण होते. जगप्रसिद्ध गानकोकिळा लता मंगेशकर, आशा भोसले यांच्या कार्यक्रमाला एवढी गर्दी व्हायची, की तिकीटे मिळायची नाहीत. त्यावेळी पाकिस्तानी लोकं हॉलमध्ये खाली-जमिनीवर बसून गाणे ऐकायला तयार असायची.

अनेक जाती, भाषा, धर्म, देश यांची मिसळ म्हणजे दुबई आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेली ही लोकं दुबईच्या छत्राखाली गुण्यागोविंदाने नांदत आहेत. या प्रदीर्घ वास्तव्यात एकमेकांच्या चालीरीती, सणवार, सुखदुःखं यात मिसळून गेली आहेत. दुःखाच्या प्रसंगीही तेवढ्याच आत्मीयतेने, जिव्हाळ्याने सहभागी होतात. बाहेरच्या जगात कोणत्याही प्रकारचे स्थित्यंतर झाले तरी त्याचे पडसाद इथे उमटत नाहीत. भारतात माहिती नसते एवढी माहिती इथे जगाबद्दल होते. जग जवळ येते. माणसे जवळ येतात. कुटुंब जोडली जातात. मनं जुळली जातात. यालाच मग 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणतात का? सर्व बंधना पलीकडचं फक्त एकच नातं...माणुसकीचं...!



# उंच माझा झोका....!

**२१व्या शतकातील स्त्री, पत्नी, माता व अल आदिल समूहाची आर्थिक सल्लागार म्हणून धुरा वाहाणारी वंदना धनंजय दातार हिने आपल्या कार्यक्षेत्रात घेतलेली भरारी खरोखर उल्लेखनीय आहे. तिने सांगितलेले उद्योगधंद्यातील अनुभव, खाचखळगे ह्यातून नवीन पिढीला नक्कीच बरेच काही शिकण्यासारखे आहे.**

**वर्तमानपत्रात** बातमी वाचली की, दुबई स्थित 'अल आदिल' या समूहाचे मालक धनंजय दातार यांच्या सुपुत्राचा व्रतबंध आकाशात - हवाई जहाजात संपन्न! आणि मला आठवण झाली 'अलिबाबा व चाळीस चोर' या गोष्टीची. लहानपणी 'अरबी देशातील सुरस कथा' या पुस्तकातील अलिबाबाची गोष्ट मी वारंवार वाचायचे. त्यातील 'तिळा तिळा दार उघड' या मंत्राने गुहेचे दार उघडायचे व समोर जडजडावाने दागिन्यांनी भरलेले खजिने दिसायचे. त्यावेळी वाटायचं किती साधा सोपा 'तिळा तिळा दार उघड' हा मंत्र....व इतक्या सहजगत्या, भरपूर पैसे मिळतात; फार सोपे आहे पैसे मिळवणे!

जेव्हा ही व्रतबंधाची वार्ता लोकांनी वाचली तेव्हा सहाजिकच सर्वांच्या भुवया उंचावल्या गेल्या....किती खर्च आला असेल....अरब देशात आरामात पैसे मिळतात....झाड हलवलं की पैसे! हौसेला मोल नसते हेच खरे!

पण ही हौस पूर्ण करण्यासाठी लागणारा पैसा हा कधीही सहजगत्या मिळत नाही. त्यापाठीमागे असते मेहनत, चिकाटी, जिद्द व तपश्चर्या! अनेक वर्षांची ही तपश्चर्या केली आहे; वंदना व धनंजय दातार या दांपत्याने.

१९८४ साली कै. महादेवराव दातार यांनी 'बर दुबई'त छोटेसे किराणा मालाचे दुकान टाकले व पिठाची गिरणी सुरू केली. खरं म्हटलं तर हा धंदा गुजराथी मारवाडी करतात. दुबईतपण व महाराष्ट्रातपण! पण महादेवरावांनी - एका मराठी माणसाने त्या काळात हे धैर्य दाखवले व जिद्दीने या क्षेत्रात उडी घेतली. त्यांचाच सुपुत्र अल आदिल या उद्योग समूहाचा शिलेदार. मसाला किंग म्हणजेच धनंजय दातार. जिद्द, चिकाटी, मेहनत हे वडिलांचे गुण धनंजयमध्येही उतरले. उद्योगाचा भार त्यांनी आपल्या खांद्यावर घेतला व बघता बघता वटवृक्षाप्रमाणे अल आदिलच्या शाखा यू.ए.ई.त पसरल्या व आता इतर आखाती देशात त्याची पाळेमुळे पसरत आहेत.

आज अल आदिलची २६ सुपरमार्केटस्, २ पिठाच्या गिरण्या, २,३ मसाला फॅक्टरी दुबई, शारजाह, अजमान येथे पसरल्या असून; मुंबईमध्ये 'मसाला किंग एक्सपोर्ट लिमिटेड' या नावाने एक शाखा आहे व आता यू.एस.ए., यू.के., कॅनडा, टांझानिया, इटली, स्वित्झर्लंड, केनिया अशा अनेक देशांमध्ये पंख पसरायचे ठरवले आहे.



**मेघना वर्तक**
meghana.sahitya@gmail.com

या उद्योग समूहाच्या रथाचे सारथ्य करतेय वंदना दातार. ज्यावेळी जय

दातार उद्योग क्षेत्रात लढत होता तेव्हा वंदना रथ हाकण्याचे कार्य करत होती. हे कुरुक्षेत्रावरील युद्ध नव्हते, तर दुबईच्या उद्योगधंद्यातील लढाई होती. प्रत्येक कर्तबगार पुरुषाच्या पाठी स्त्री-पत्नी उभी असते असं म्हणतात. जय-वंदनाच्या उदाहरणाने परत एकदा हे लक्षात आले.




अल आदिलची आर्थिक सल्लागार म्हणून वंदना काम करते. तिने finance मध्ये MBA केले आहे. तिला मी म्हटले - तुझ्या दृष्टिकोनातून आदिलबद्दल, तसेच एक आर्थिक सल्लागार म्हणून या धंद्यातील खाचाखोचा, बारकावे सांग ना....!

जणू माझ्या विचारण्याची वाट पाहात असणारी वंदना उत्साहाने, ओघवत्या भाषेत आपले विचार मांडू लागली. 'अल आदिल ही सुप्रसिद्ध सुपरमार्केटची साखळी आहे. इथे आम्ही ८५० पदार्थ विकतो. डाळी, मसाला, लोणची, वेगवेगळी पिठे, दररोजच्या जेवणात लागणारे अनेक पदार्थ इथे मिळतात. आमच्या गिरणीतच पिठे दळली जाऊन पॅक होतात व ती मोठमोठी हॉटेल्स, दुबई ड्यूटी फ्री केटरिंग कंपनीज, हॉस्पिटल्स् व अर्थातच घराघरांतून जातात. सर्व पदार्थ 'पिकॉक ब्रँड' या नावाने विकले जातात.

अलगोज व दुबई इन्व्हेस्टमेंट पार्कमध्ये आमचे manufacturing unit आहे. तसेच मुंबईतही आहे. तीन कामगार घेऊन धंद्याला सुरूवात केली व आज ५०० प्रत्यक्ष कामगार आहेत व ३७५ कामगार अप्रत्यक्षपणे काम करतात.'

वंदना पुढे सांगू लागली - 'आज तुम्हाला अल आदिलचे एवढे मोठे साम्राज्य उभे राहिलेले दिसतेय. पण वादळाच्या अनेक तडाख्यांतून ते तावून-सुलाखून बाहेर पडले आहे. 'चढउतार' हा धंद्याचा अविभाज्य भाग आहे. आणि त्यामुळेच प्रतिकूल परिस्थितीतही पाय घट्ट रोवून उभे राहिले पाहिजे. कोणत्याही धंद्याचे सर्वात मोठे सूत्र - ब्रीदवाक्य आहे - 'never give up!' अडथळ्यांवर मात करण्यातच खऱ्या उद्योगपतींची कसोटी आहे.'

'माझ्या दृष्टिकोनातून 'भांडवल' हा कोणत्याही धंद्याचा महत्त्वाचा भाग आहे. धंद्याची सुरुवात करण्यापूर्वी बेरिज वजाबाकी, खाचखळगे यांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. कोणत्याही अभ्यासाशिवाय केलेला धंदा हा बंद करायची वेळ येऊ शकते.'

ऽधंद्याची सुरुवात ही नवजात अर्भकाप्रमाणे असते. माता आपल्या बाळाची जशी काळजी घेते तशीच सुरुवातीला धंद्याची काळजी घ्यावी लागते. कोणताही धंदा हा एका रात्रीत मोठा होत नाही. त्याला कमीतकमी ३-४ वर्षे तरी जावी लागतात. धंदा करणे म्हणजे फार मोठा लांबचा प्रवास आहे. भांडवलाचा योग्य विनियोग हे सर्वांचे मूळ आहे. बहुतेक आंतरराष्ट्रीय धंद्याचे दैनंदिन अवलोकन होते व नफ्यातील काही भाग हा पुढच्या गुंतवणुकीसाठी राखून ठेवला जातो.

धंदा सुरू करताना धोका पत्करण्याची तयारी हवी. धंदा व्यवस्थित चालू लागला, की तेव्हाच त्याचा विस्तार करण्याचा धोका घेणे आवश्यक आहे. त्यावेळी जर अपयश आले तरी हार मानू नका. कारण अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. सहनशीलता, चिकाटी व निश्चय हे गुण तुमच्यात असतील तर यश तुमच्यामागे येईल!'

वंदना म्हणते, 'मी स्वतः स्वयंपाक करते. त्यामुळे मला स्वयंपाकात लागणाऱ्या सर्व गोष्टींची खोलवर माहिती आहे. आपल्या दोन मुलांना वाढवताना घरचे आर्थिक व्यवहार बघतानाच पतीच्या उद्योगाच्या tours ही करते. माता व पत्नी या दोन भूमिका निभावतानाच धंद्याची नाळ हेरली व दुबईतील गिऱ्हाईकांशी या नाळेनेच नाते जोडले.'

घरगुती अनुभव व धंद्यातील अनुभव यांची सांगड घालत पडद्यामागून वंदनाचे काम चालते. हळूहळू उगवत नंतर आकाश प्रकाशमान करणाऱ्या सूर्याप्रमाणे वंदनाने ४ वर्षांत

Al Adil trading co. LLC
(SUPERMARKETS • FLOUR MILLS • SPICES INDUSTRIES)
THE HOME OF INDIAN FOOD STUFF
Peacock



आदिल ग्रुपचे नाव आकाशाला भिडवले आहे. आदिल ग्रुपचा अर्थव्यवहार सांभाळणारी वंदनासारखी स्त्री विरळाच! आज ती विश्वासाने सांगते की, '४०% पासून सुरूवात करून आता ६०-७०% पर्यंत खर्चात बचत होऊ शकतेय. मालाची खरेदी हा या आमच्या धंद्यातील सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. वंदनाने मोठ्या धडाडीने व खुबीने तज्ज्ञांच्या सहाय्याने मुंबईमध्ये हा भाग सांभाळला आहे. आज ८०० हून अधिक पदार्थ मिळवून त्यांचे पॅकिंग होऊन U.A.E. मध्ये शिपिंग केले जाते.'

ह्यातील काही पदार्थ आम्ही आमच्या व भागिदारांच्या शेतात पिकवतो. त्यातील काही पदार्थ organically पिकवले जातात. आमच्याकडे साखर, तांदूळ, गहू असे अनेक organic food items आहेत. जे कोणत्याही प्रकारच्या केमिकल्स व खतांशिवाय पिकवले जातात. Export करायच्या पदार्थांचे पुन्हा जरुरीप्रमाणे टेस्टिंग केले जाते व नंतर ship ने पाठवले जातात.'

धंद्यातील बारिकसारिक खुबी सांगताना वंदना म्हणते, 'मी अगदी grass root पासून, अथ पासून कामाला सुरूवात केली. धान्य स्वच्छ करणे....निवडणे, पाखडणे....ते व्यवस्थित रॅकवर लावणे....व अगदी एक पैसा आला तरी कसा वाचवता येईल ते बघते. कारण एक एक पैसा तर प्रॉफीट वाढवतो....थेंबे थेंबे तळे साचे हे खरं आहे ना?'

'आमचा धंदा हा food stuff चा आहे. माल खराब होण्याची शक्यता असते व म्हणून मी गिऱ्हाईकांच्या संपर्कात राहाते. त्यांच्या आवडी-निवडी, महत्त्वाच्या गोष्टी सणावारांसाठी लागणाऱ्या वस्तू जाणून घेते. त्यांचा अभ्यास करते. त्यामुळे पदार्थ फुकट जाण्याचे प्रमाण कमी आहे.'

'आता आम्ही आर्थिक व्यवहाराचे मध्यवर्ती ऑफीस केले आहे. तिथे बसून आजूबाजूला काय चालले आहे यावर लक्ष ठेवता येते.'

आज अनेक उल्लेखनीय अशा पुरस्कारांनी अल आदिल विभूषित झाले आहे. दुबई ड्यूटी फ्री, फ्लाईट केटरिंग पुरस्कार २००३, जुमेरा हॉस्पिटॅलिटी पुरस्कार २००३, दुबई वर्ल्ड ट्रेड सेंटर २००४, दुबई इंटरनॅशनल एअरपोर्टचा पर्यावरण पुरस्कार, दुबईच्या महर्षी आयुर्वेद या संस्थेचा लाईफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार २००९, कमर्शिअल पुरस्कार २०१०, राष्ट्रीय उद्योग रत्न पुरस्कार २०१०, मॅन्युफॅक्चरिंग CEO of the year in Dubai हा २०१४ चा पुरस्कार....असे अनेक पुरस्कार मिळाले. या अल आदिल उद्योग समूहाचा कणा आहे धनंजय. व कंपनीच्या यशामध्ये जयचा वाटा फार मोठा आहे....वंदना अभिमानाने सांगत होती. जयच्या मते धंदा लहान असू दे वा मोठा, समाधानी कस्टमर्स हेच यशाचे पहिले लक्षण आहे. नवीन, तरुण रक्ताला धनंजय दातार यांचा सल्ला आहे की, महत्त्वाकांक्षी व्हा, स्वप्न घेऊन या व या स्वप्नपूर्तीसाठी मेहनत घ्या....यश तुमचेच आहे.

धनंजय दातार या यशाचे सर्व श्रेय आपली पत्नी वंदना हिला देतात. ते म्हणतात, 'वंदना ही सारथी आहे. या उद्योगरुपी रथाचे सारथ्य ती करतेच. रथाला दिशा दाखवण्याचे महत्त्वाचे काम सारथी करतो व म्हणूनच वंदना ही यशाची खरी शिल्पकार आहे.'

पण मला असं वाटत की, यशाचे दावेदार अनेक असतात. धनंजय-वंदना हे दांपत्य आपल्या यशाचे श्रेय स्वतःकडे घेत नाहीत तर एकमेकांना देतात. त्यांच्यातील ह्या परस्परांतील सामंजस्याच्या भावनेतच यशाची गुरुकिल्ली आहे.

# त्यांना काय वाटतं?

**मराठी माणसाच्या नजरेतून दुबई, तेथील बरेवाईट अनुभव यांचा आढावा घेत असतानाच मनाच विचार आला की दुबईतील स्थानिक लोकांना आपल्याबद्दल काय वाटत असेल व त्यांच्या आपल्याकडून काय अपेक्षा असतील? योगायोगानेच प्रतिथयश स्थानिक व्यक्तीची मुलाखत घेण्याची संधी आली. गप्पांच्या ओघात त्यांनी मांडलेले विचार नक्कीच वाचनीय आहेत.... मार्गदर्शक आहेत!**

१९७९ चा मार्च महिना होता तो. मी माझ्या बाळाला, अमेयला घेऊन मुंबईहून दुबईला आले होते. तो अगदी छोटा सव्वा महिन्यांचा होता. आम्ही नवीन घरात राहायला आलो होतो. दोन मजली बिल्डिंग होती. आम्ही पहिल्या मजल्यावर राहायचो. वरच्या मजल्यावरच बिल्डिंगचा मालक, आमचा अरबाब राहायचा. मुंबई-पुण्यातील एखाद्या कुटुंबासारखंच एक कुटुंब होतं त्याचं! आमचा मालक, त्याची बायको, तीन मुलगे, दोन मुली, आईवडील व त्या मालकांचे दोन भाऊ! वरचा आख्खा मजला त्यांचाच होता.

आम्ही तिथे नवीनच होतो. अमेय लहान होता. एक दिवस पहाटे अडीच-तीनची वेळ असेल तो खूप रडायला लागला. काही केल्या थांबत नव्हता. काय करावे काही सुचत नव्हते. मुंबईहून निघताना आईने दिलेल्या सर्व सूचना आठवत होते; त्याचं रडणं थांबावयाचा प्रयत्न करत होते. आता शेवटी पहाटे त्याला डॉक्टरांकडे घेऊन जायचे ठरले व तेवढ्यात दारावर बेल वाजली. आता ह्यावेळी कोण आलं त्यात? मन जरा धास्तावलेच!

दार उघडलं व पाहिलं तर आमच्या मालकाची आई....वय वर्षे ६० च्या पुढे. त्या पुढे झाल्या व मोडक्या तोडक्या हिंदीत व बऱ्याच खाणाखूणा करून त्यानी बाळ का रडतंय हे विचारलं. बाळाचा आवाज ऐकून त्या खाली आल्या होत्या. येताना हातात कसल्या तेलाची बाटली घेऊन आल्या होत्या. तेल हातावर घेऊन त्यानी बाळाच्या पोटावर लावले व अक्षरशः दहा मिनिटात बाळ शांत झोपी गेले!

त्यांनी माझ्या खांद्यावर थोपटले व खुणाखाणा करून सांगितले, काही लागले तर सांगत जा, काळजी करू नकोस, आम्ही वरतीच आहोत. आणि तत्क्षणी आमच्यात एक अनामिक नातं निमर्णि झालं,- 'आजी व नातीचं!' आपल्याकडे जशी अनुभवी आजी तिच्या बटव्यातील घरगुती औषधं काढून देते त्याचीच आठवण झाली मला! त्यावेळी जे नाते निर्माण झाले ते आजतागायत तसेच आहे. आज आजी या जगात नाहीत, आम्ही दुसरीकडे रहायला गेलो, अरबाबही त्याच्या मोठ्या vila त गेला. त्याचा व्यवसाय खूपच मोठा झाला. पण जात, धर्म, देश, पैसा या कोणत्याही गोष्टी या नात्याच्या आड आल्या नाहीत. आजींचा मुलगा म्हणजेच आमचा मालक, त्याचे नाव अब्दुल्ला अब्दुल वहीद व माझे पती अशोक मित्र झाले व आज ३५ वर्षे झाली ही मैत्री अबाधित आहे. इतकेच नव्हे तर त्याची मुळे पुढच्या पिढीपर्यंत पोहोचली आहेत. आमच्या मुलां-नातवंडानी नात्याची वीण घट्ट केली आहे.

आम्ही जेव्हा आमच्या मालकाला या अरबी मित्राला सांगितले की, ग्रंथाली नावाची मुंबईत मराठी साहित्यासाठी काम करणारी संस्था आहे, ती 'इ' दिवाळी अंक यंदा दुबईच्या जीवनावर काढत आहे. त्यावेळी त्याला आश्चर्यमिश्रित कौतुक वाटले व दुबईविषयी, भारतीयांविषयी त्याची मतं हवी आहेत, विचार हवे आहेत हे ऐकून तो उत्साहाने बोलू लागला...



**अब्दुल्ल अब्दुल वहीद**

मी त्याला मला जे प्रश्न विचारायचे होते ते लिहून दिले. त्याने मुलाखतीचे स्वरूप येऊ न देता गप्पांच्या ओघात भूतकाळ व वर्तमानाची सांगड घालत आलेले विचार प्रगट केले, सल्ले दिले!

माझं नाव अब्दुल्ला अब्दुल वहीद. आई-वडील, बायको, मुलं, भाऊ



असं आमचं एकत्र कुटुंब! लहानपण खूप अगदी गरिबीत गेले असे नाही, पण आताप्रमाणे खूप श्रीमंतीत गेले नाही. गरिबीची झळ आम्हा मुलांना कधी लागली नाही, पण आमच्या आईवडिलांनी त्यांच्या पिढीनेच खूप हलाखीचे दिवस काढले आहेत. भात व मासे हे त्यावेळी जेवण होते, ते पण पोटभर मिळत नसे. भट्टी पेटल्याप्रमाणे हवामान असलेल्या ह्या रखरखीत वाळवंटात कसल्याही सुखसोई नव्हत्या. नाही रस्ते, दळणवळणाची साधने नाही, एसी नाही, फ्रीज नाही ना पाणी! पण असे असले तरी माणूस माणसाला ओळखत होता, एक जवळीक होती!

माझे शालेय शिक्षण दुबईतच झाले. त्यावेळी दुबईत फक्त अरबी शाळा होत्या. त्यांची स्थिती ही काही खास नव्हती. साहजिकच कॉलेज शिक्षणासाठी मी जवळच भारतात मुंबईला आलो. तिथल्या आमच्या नातेवाईकांकडे राहून मी शिक्षण पूर्ण केले. सेंट झेवियर्स कॉलेजमधून कॉमर्स क्षेत्रात मी accounts मध्ये महाविद्यालयीन डिग्री घेतली. graduate झालो. तेव्हा मी नातेवाईकांकडे एकटा रहात होतो. पण आईवडिलांना कसलीही काळजी वाटत नव्हती. १९७०-७५ चा काळ होता तो. भारतात राजकीय वातावरण अस्थिर नव्हते. त्यावेळी दुबईचे नाव फारसे कोणाला माहीतच नव्हते. कॉलेजमध्ये माझे मराठी, गुजराथी, सिंधी, पंजाबी असे अनेक जातींचे मित्र होते. मला आठवतंय सणावाराला व एरवीसुद्धा आम्ही एकमेकांच्या घरी जात असू. नवरात्र, गणपती ह्याला पण जात होतो. तिथे जो प्रसाद मिळायचा त्याची वाट बघत असायचो. भारतीय संस्कृती व आमची संस्कृती मिळतीजुळती आहे. एकत्र कुटुंब, मोठ्यांना मान देणे इ. रीतीरिवाज... त्यामुळे सर्व घरांत मिसळून जायला वेळ लागला नाही. आजही कोणाचे आईवडील, कोणाची भावंडे आठवतात. त्यांनी प्रेमाने आमच्यासाठी राखून ठेवलेले खाद्यपदार्थ आठवतात, कधी बरे नसताना केलेली शुश्रूषा आठवते. आता पाठी राहिल्या त्या हृद्य आठवणी!

आरामात शिक्षण झाले, कसलेही टेन्शन नाही, चिंता नाही.

पण तेच आता गेली काही वर्षे जागतिक स्तरावरचं वातावरण बदललेलं आहे. टेररिस्ट, हायजॅकिंग, धर्मद्वेष, बॉम्बस्फोट....सर्व वातावरणच गढूळ झाले आहे. आज भारतात जातांना डोक्यावर टेन्शन असते, पूर्वीचा मोकळेपणा राहिला नाही. कायम भीतीचे सावट! पळवापळवी....बॉम्बस्फोट!

बोलता बोलता मध्येच आमच्या मित्राने आम्हाला आठवण दिली. अमेयचे, तुमच्या मुलाचे २००८ डिसेंबरमध्ये मुंबईला ताज हॉटेलमध्ये लग्न होते. आमचा १५ जणांचा ग्रूप येणार होता लग्नाला. विमानाचे बुकिंग झाले होते. सर्व तयारी झाली होती व २६ नोव्हेंबरला ताज हॉटेलच्या बिल्डिंगमध्येच भयानक बॉम्बस्फोट झाले. सर्व परिस्थिती लक्षात घेऊन नाईलाजाने आम्हाला आमचे येणे कॅन्सल करावे लागले. तुम्हाला वाईट वाटले, तसेच आपल्या मित्राच्या आनंदात या अशा कारणामुळे आपण सहभागी होऊ शकत नाही म्हणून आम्हालाही खूप वाईट वाटले. अर्थात ती कसर नंतर तुमच्या मुलीच्या अश्विनीच्या लग्नात सहभागी होऊन आम्ही भरून काढली. सर्वात समाधान ह्याचे वाटते की, कितीही राजकीय धार्मिक स्थित्यंतरे झाली पण त्याचा परिणाम आपल्या मैत्रिच्या नात्यावर कधीही झाला नाही.

मी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून दुबईत आलो व British Bank of Middle East ह्या बँकेत clerk म्हणून कामाला सुरुवात केली. आता ही बँक 'HSBE' म्हणून ओळखली जाते. इथे मी ३० वर्षे काम केले व मॅनेजर म्हणून काम करत असताना स्वेच्छेने रिटायर्ड झालो. बँकेत असतानाच मी Real Estate चा व्यवसाय सुरू केला तेव्हा हळूहळू जगाच्या कानाकोपऱ्यांतून माणसे दुबईत यायला सुरुवात झाली होती. त्यामुळे अनेक nationalities च्या लोकांशी संबंध आला.

भारतीय कामगारांविषयी विचाराल तर सर्वसाधारणपणे चांगले लोक! Problems निर्माण करत नाहीत. त्यांचे रुटीन काम करतात पण नवीन ideas त्यांच्यापाशी नाहीत. स्वतः हून पुढाकार घेऊन काही चांगले करायचा पण प्रयत्न करत नाहीत. त्याना जे काही मिळते त्यात ते समाधानी असतात. कदाचित भारतात त्यांना तेवढे पण मिळत नाही व म्हणूनच

घरदार सोडून वर्षानुवर्षं ते इथे येऊन राहतात व अधिक महत्त्वाकांक्षा न ठेवता जे मिळताहे त्यात समाधानी असतात.

एखादा कधी वाईट अनुभवही येतो. आमची family सर्व भारतात नैनितालला गेलो होतो. तिथल्या हॉटेलमध्ये काम करणारी एक बाई आम्हाला भेटली. साधारण ४०/४५ वर्षांची! खूप रडली, कुटुंबाची कहाणी सांगितली. मुलांची जबाबदारी. घरात अन्नाचा कण नाही. माझ्या पत्नीने दया येऊन तिला दुबईत आणले. Visa इत्यादी सर्व खर्च आम्ही केला. आमच्या घरात आणखीही आठ-दहा नोकरचाकर आहेत. सर्वांसारखी राहायची सोय, जेवणखाण दिले. आठ दिवसांच्या आत तिने भारतात परत जायचा ध्यास घेतला. किती समजावून सांगितले तरी ती ऐकायलाच तयार नव्हती. शेवटी पुन्हा विमानाचे तिकीट वगैरे काढून तिला परत पाठवले. पुन्हा ४ महिन्यांनी फोनवर फोन! माझ्या पत्नीने दया येऊन तिला पुन्हा आणण्याचा प्रस्ताव मांडला. घरात कोणीच तयार नव्हते. पण अखेर पत्नीच्या आग्रहाखातर सर्व खर्च करून, तिला पुन्हा आणले. १५ दिवसातच पुन्हा सर्व नाटक! ह्यावेळी मात्र पत्नीनेच मन घट्ट केले व तिला परत पाठवले. त्यानंतर मात्र कानाला खडा!

यामुळे होते काय की, एका माणसाच्या वागण्यामुळे सर्वच भारतीयांबद्दल मत खराब होते. त्यांचे स्वतःचे तर नुकसान होतेच, पण ते इतर बांधवांचे पण नुकसान करतात. अशी उदाहरणे जेव्हा घडतात, तेव्हा वाटते इतर nationalities ची लोकं बरी!

या देशाच्या प्रगतीत भारतीयांचा मोठा वाटा आहेच. पण त्याचबरोबर हे पण सांगावेसे वाटते की, त्यांनी नुसते टेबलवर्क करायचे. बाकी इतर काही शिकायचे नाही. थोडक्यात, फक्त पाट्या टाकायचे काम करायचे. ऑफिस संपले की नंतर त्याच्याशी आपला काही संबंध नाही ही वृत्ती ठेवू नये. दरहॅम convert करून बरेच रुपये गोळा करायचे हा दृष्टिकोन ठेवू नये. नवीन नवीन गोष्टी आत्मसात कराव्यात. त्यासाठी लागेल ती मेहनत करावी. मिळणाऱ्या संधीचा फायदा घ्यावा, त्यातून स्वतःचा पण विकास होईल व या देशाचाही!

दुबई हा प्रगतीशील देश आहे. त्यामुळे संधी हात जोडून उभ्या आहेत. त्यासाठी तुमच्यात aspiration हवे; पण हे खेदाने म्हणावे लागते की, भारतीयांमध्ये हे कमी दिसते. आज सुदैवाने दुबईत अशी अवस्था आहे की, हव्या तेवढ्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळेच स्थानिक लोकांच्या संधी कमी होऊन दुबईत असुरक्षितताही नाही; इतर देशांप्रमाणे, ज्यांची मेहनत करायची तयारी आहे त्या सर्वांना हा देश कोणताही भेदभाव न करता सामावून घेऊ शकतो.

स्थानिक लोकांच्या हक्काचे निमित्त करून, त्यांच्या भावना भडकावून त्या निमित्ताने स्वतः सत्ता काबिज करणे किंवा स्वतःचा फायदा करून घेणे अशा प्रकारांना दुबईत थारा नाही. या उलट नवीन पिढीला आमचे सांगणे आहे की, 'स्वतः मेहनत करा, स्वतःत तेवढी कुवत आणा. तुमचा मार्ग तुम्हीच तयार करा.'

गेल्या काही वर्षात दुबईत जी विलक्षण आश्चर्यकारक प्रगती झालीय, त्याबद्दल आम्हाला असं वाटतंय की, ही प्रगती अतिशय वेगात झाली आहे. कोणतीही सुधारणा झाली, की ती समाजात रुळायला काही काळ जावा लागतो. जसं खाल्लेलं पचण्यासाठी थोडा वेळ द्यावा लागतो. त्याचप्रमाणे प्रगतीचे आहे. हीच प्रगती थोडी slow, आस्तेआस्ते झाली तर ती लोकांच्या अंगवळणी पडेल. शेख राशिद असताना प्रगतीला सुरुवात झाली, पण ती हळूहळू होती. एखाद्या वावटळीप्रमाणे झंझावाती प्रगती पाहून तिच्या स्थैर्याबद्दल भीती निर्माण होते.

पूर्वी संध्याकाळी रस्त्यावर एक चित्र ठिकठिकाणी दिसायचे. रस्त्यावर कोपऱ्यात चटया टाकून, दिवसभराची कामे आटोपून अरबी लोकांचे ग्रूप हुक्का पीत किंवा सुलेमानी पीत गप्पा मारीत बसलेले दिसायचे. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण होत असे, जवळीक निर्माण होई, आपलेपणा वाटे. पण जसजशी दुबई समृद्ध झाली, सर्व अरबी लोकांकडे अमाप पैसा आला, छोटे अरबी व्हीले जाऊन मोठे राजवाडे आले, लक्ष्मी पायाशी लोळण घेऊ लागली तसा आता लोकांच्यात तुटकपणा जाणवतोय. नवीन पिढीने तर जन्मापासून सुबत्ता पाहिली आहे. अहंभाव निर्माण झालाय. गरजे पुरते बोलायचे. एकमेकांची गरज वाटेनासी झाली आणि म्हणूनच वाटते की ही प्रगती digest होऊ दे!

आज सर्व gulf countries मध्ये दुबईची प्रगती अधिक झाली आहे. तिचे स्थान वेगळे आहे. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे दुबईच्या राज्यकर्त्यांची दूरदृष्टी. पुढील १०-२० वर्षांत कशाची गरज लागेल, काय अडचणी येतील हे आधीपासूनचे हेरून पूर्वनियोजित व्यवस्था केली. दळणवळणाची साधने, रस्ते, एअरपोर्टस्, पोर्ट, टेलिफोन लाईन्स् यांची व्यवस्था केली. त्याबरोबर सरकारचा openess



- उदारमतवादी धोरण. सर्वांना दिलेले स्वातंत्र्य, कोणतेही taxes नाहीत, सुरक्षितता निर्माण होईल - लोकांना विश्वास वाटेल असे कायदेकानून! इतर जगभर कोणत्याही गोष्टी घडल्या तरी त्याची झळ, परिणाम दुबईत दिसत नाहीत.

तुम्ही सर्वांनी, भारतीयांनी या गोष्टीचा अनुभव घेतलाच आहे. जेव्हा भारतात बाबरी मस्जिद प्रकरण झाले तेव्हा वातावरण तप्त होते, परंतु बॉम्बस्फोट झाले त्यावेळी दुबईत वातावरण शांत होते. एकाही भारतीयाला त्रास सहन करावा लागला नाही. इथे सरकारी हेरयंत्रणा अतिशय सशक्त आहे. समाजाच्या वेगवेगळ्या घटकात जाऊन, माहिती काढून संरक्षण वाढवले जाते. पोलीस खात्याने आता 'Alamin' या नावाने नवीन खाते उघडले असून, कोणलाही असुरक्षित असे काहीही आढळले, तर इथे तक्रार नोंदवल्यास ताबडतोब दखल घेऊन उपाययोजना केली जाते. यामुळे या देशात राहताना लोकांच्याही मनात विश्वास निर्माण होतो. आज अनेक जाती, धर्म, भाषा, देशांचे लोक दुबईत शांततेने नांदत आहेत. त्याचे श्रेय नक्कीच सुरक्षा यंत्रणेला द्यावे लागेल.

आज जगभरची लोकं दुबईत राहात आहेत, त्याचा परिणाम स्थानिक लोकांवर फार मोठ्या प्रमाणात झाला आहे. स्थानिक लोकांचे विचार progressive झाले आहेत. पण त्याचबरोबर काही मुल्ला type लोकं अधिक कट्टर झाली आहेत. त्यांच्या मते, 'तुम्ही शिक्षण घ्या, इतर लोकांचे जे काही चांगले आहे ते शिका. पण त्याचा परिणाम आपल्या संस्कृतीवर नको. कपडेलत्ते, आचारविचार हे उथळ होऊ देऊ नका. विचार बुरसटलेले ठेवू नका. पण आधुनिकतेच्या नावाखाली संस्कृती विसरू नका.'

नवीन पिढी शिक्षणासाठी उत्सूक आहे. त्यासाठी सरकार सर्वतोपरी सहाय्य करीत आहे. आज इंग्रजी भाषेचा अभ्यास झालाच पाहिजे. पण तो इस्लामी भाषेशी फारकत घेऊन नाही. चांगल्या गोष्टी आत्मसात करा. शिक्षणाबरोबर संस्कृती सांभाळा, अंधानुकरण नको.

मुलांच्या शिक्षणाइतकेच महत्त्व मुलींच्या शिक्षणालाही दिले आहे. आजची दुबईतील अरबी स्त्री आमूलाग्र बदलली आहे. स्वतंत्र झाली आहे. खऱ्या अर्थाने ती स्वतःच्या पायावर उभी आहे. तिच्यात आत्मविश्वास निर्माण झाला आहे. आज दुबईत ऑफिसेस, बँका, एअरपोर्ट्स, टॅक्सी ड्रायव्हर, जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्या काम करताना दिसतात. मोठे उद्योगधंदे सांभाळायला सुरूवात केली आहे. तसेच राजकारणातही त्या भाग घेऊन लागल्या आहेत. स्वतः शिकून पुढच्या पिढीला पण शिकवून तयार करत आहेत. अरबी स्त्रीने आमूलाग्र बदलायलाच हवे असे आम्हाला वाटते. सौदी अरेबियात अजूनही बायकांना गाडी चालवायला बंदी आहे. खरं म्हटलं तर धर्मात असे सांगितलेले नाही. पण अजून काही देशात बायकांना स्वातंत्र्य नाही. दुबईत मात्र स्त्रीजीवन पूर्ण बदलले आहे.

पूर्वी समाजात स्त्रियांचे प्रमाण जास्त होते. त्यांना उदरनिर्वाहाचे साधन नव्हते. त्यांना शिक्षण नव्हते व म्हणून त्यांना संरक्षण मिळावे या हेतूने ३-४ बायका करायची पद्धत अस्तित्वात आली. पण आता मात्र हे दृश्य दिसत नाही.

प्रत्येक समाजात जे नियम, रीतीरिवाज बनवले जातात ते त्या त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीनुरूप तयार होतात. जर हे नियम, या प्रथा नसत्या तर या स्त्रिया कोठे गेल्या असत्या? त्यांचे काय झाले असते? लग्नामुळे त्यांना संरक्षणाची भिंत तरी लाभली!

अरबी स्त्रियांचा पोशाख, बुरखा पद्धती ही सुद्धा संरक्षणासाठी आहे. आज अनेक जाती धर्मांची माणसे दुबईत आली आहेत. कित्येक देशातील स्त्रियांचे पोशाख योग्य नसतात. त्यांना एक सांगावेसे जरूर वाटते की, आमच्या सरकारने तुमच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर कोणतेही बंधन घातलेले नाही; पण त्याचबरोबर तुमचेपण कर्तव्य आहे की, दुसऱ्यांच्या संस्कृतीचा आदर करणे, त्यांना मान देणे.

दुबईत यायची इच्छा असलेल्या भारतीयांना मी सांगेन, महत्त्वाकांक्षी व्हा, आत्मविश्वास निर्माण करा, मेहनतीची तयारी ठेवा. संधी तुमच्यासमोर आहेत. येथे येताना येथील भाषा, संस्कृती, रीतीरिवाज यांची माहिती करून घ्या, शिका. म्हणजे आपोआप तुम्ही येथील समाजजीवनात मिसळून जाल. तो समाजही तुम्हाला आपलं म्हणेल. ही दुबई तुम्हाला परकी वाटणार नाही. आपलीच वाटेल. ही वाळू आपली वाटेल. ही भूमी आपली वाटेल!...

ashdub12@yahoo.com